THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY

<u>अनौपचारिक</u>

मुलाखती

यशवंत गोपाळ जोशी

६ जुलै] किंमत १॥ रुपया. [१९४२

प्रकाशक—
विद्याधर हरि दामले
मालक नवीन किताबखाना, पुणें २ व मुंबई ४.

मुद्रक—
लक्ष्मण सखाराम केळकर
ज. स. लिमिटेडचा प्रेस, सदाशिव पुणें २

श्री. यशवंत गोपाळ जोशी
यांचीं पुस्तकें

लघुकथा

१	पुनर्भेट भाग १ ला (द्वितीयावृत्ति)	१-८-०
२	पुनर्भेट भाग २ रा (द्वितीयावृत्ति छापत आहे)	१-४-०
३	पुनर्भेट भाग ३ रा	१-४-०
४	पुनर्भेट भाग ४ था	१-४-०
५	पुनर्भेट भाग ५ वा	१-४-०
६	पुनर्भेट भाग ६ वा	१-४-०
७	पुनर्भेट भाग ७ वा (छापत आहे)	१-८-०
८	तुळशीपत्र	१-८-०

नाटकें

९	भोळा शंकर	१-०-०
१०	संगीत श्रीमुखांत	०-१२-०
११	बोलका सिनेमा	०-८-०

कादंबरी

१२	हिरकणी (शिल्लक नाहीं)	
१३	होमकुंड (पूर्वार्ध)	२-०-०
१४	होमकुंड (उत्तरार्ध-छापत आहे)	२-८-०
१५	श्रीकांत	१-०-०
१६	त्रिदोष	१-०-०
१७	पडसाद	२-८-०
१८	साहित्यिकांची सफर	१-८-०

अर्पण पत्रिका

माझे स्नेही,

श्री. दि. वि. काळे

संपादक सह्याद्री यास,

दुपारी, संध्याकाळीं, पुन्हा सकाळीं, आणि आज, उद्यां, परवा, पुन्हा उद्यां-प्रत्येक महिन्याची मुलाखत हातीं पडेपर्यंत क्वचित् स्वतः व पुष्कळ वेळेला माणसे पाठवून ओळीनं माझ्याकडून अनौपचारिक मुलाखती लिहून घेण्याच्या त्यांच्या 'शांत-सत्याग्रहाबद्दल' त्यांची मुलाखत घेण्याच्या भरीस न पडतां हे पुस्तकच त्यांस

अर्पण

— य. गो. जोशी

" अनौपचारिक मुलाखती " या पुस्तकांत प्रसिद्ध झालेल्या मुलाखती " सह्याद्री " मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाल्या आहेत. सह्याद्रींत अशा अनौपचारिक मुलाखती कशा येऊं लागल्या याचे त्यावेळीं कित्येकाना विनाकारणच आश्चर्य वाटले. तसेच या पुस्तकाचे प्रकाशन आम्ही पत्करलेले पाहूनही कित्येकास आश्चर्याचा धक्का बसण्याचा संभव आहे. सह्याद्रीनें–आपले ब्लॉक या पुस्तकांत घालण्याकरितां दिल्याबद्दल त्यांचे आभारी आहोत.

पुणें शहर
ता. ४–७–४२


—विद्याधर हरि दामले

अनुक्रमणिका

चंद्रज्योत ! : : [प्रस्तावना] : १

ओ ऽहो ! आजचा दिवस केवढा भाग्यवान ! आज आम्ही आम्हांला कल्पना नसतांनासुद्धां एका नवीनच दालनांत 'विक्रमांकाचा उच्चांक' प्रस्थापित करीत आहोंत. म्हणजे काय ? आमचे ती. यशवंत गोपाळ जोशी (यांस आम्ही 'भाऊ' म्हणतों) यांच्या एका नवीन पुस्तकास आज आम्ही प्रस्तावना लिहीत आहोंत !

हा 'विक्रमांकाचा उच्चांक' आम्ही अशाकरिता म्हणत आहोंत की, आज आमचं वय फक्त पांचशें-एकवीस दिवसांचं आहे ! (म्हणजे किती वर्षं महिने होतात तें वाचकांनीच जरूर पडल्यास पाहावें—आम्हास त्याचा अंदाज लागत नाही !) येवढ्या थोड्या वयांत आम्ही प्रस्तावना लिहावी अशी आमच्या ती. भाऊंच्या मनात कशी कल्पना आली तें येथं विस्तारपूर्वक सांगत नाही—पण सांगतों !



एक दिवस भाऊंनीं आम्हांस विचारलें "माझ्या पुस्तकास तूं प्रस्तावना लिहिशील काय रे?"

घरांत नासधूस करण्यांत आम्ही फार पटाईत झालों आहोंत. पुस्तकांचीं पहिलीं पानें टरकावण्यांत तर आमचा हातखंडा आहे. घरीं पुस्तकांचाच धंदा असल्यामुळें मी रोज एक दोन तरी पुस्तकें फाडतों आणि घरचा धंदा म्हणून ती.' भाऊंनाहि तें परवडतें.

एक दिवस चेष्टेने ती. भाऊ म्हणाले, 'हा पोर वाङ्मयांत बरेंच बंड करणार असें दिसतें—हा नक्की पुरोगामी लेखक होणार—माझ्या पुस्तकांना तूं प्रस्तावना लिहिशील काय रे ?'

तीच कल्पना आमच्या मनांत भरली—अन् काय म्हणतांतना, 'ईश्वराची करणी आणि नारळात पाणी' अगदी तसें झालें ! आम्हांस वयानुरूप लिहितांवाचतां येत नसल्यामुळे प्रस्तावनेची कल्पना आमच्या मनातच पालवली आणि ती. भाऊंच्या "अनौपचारिक मुलाखतीच्या" भावी आगामी पुस्तकास आम्ही प्रस्तावना लिहिण्याचें मनातल्या मनांत ठरविलें. आणि एक दिवस सकाळीं आमच्या भगिनी ती. शाताताईची पाटी-पेन्सिल घेऊन आम्ही आपल्या रेघोट्यांच्या अभिनव पण सनातन लिपींत प्रस्तावना लिहून काढली.

ती. भाऊंनीं तें जाणलें आणि वडिलांच्या कृपाप्रसादें त्या आम्ही कल्पिलेल्या आणि रेघोट्यांनीं लिहून काढलेल्या प्रस्तावनेचें आज हे, प्राकृत मराठींत झालेलें रूपांतर, प्रियवाचक, आपल्या वाचनांत येत आहे !

येवढी प्रस्तावना केल्यानंतर—ज्या पुस्तकास आम्ही प्रस्तावना लिहिणार आहोंत, तें पुस्तक (आमच्या प्रिय वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल की) आम्ही बिलकुल वाचलेलें नाही. कारण की आम्हांस अद्याप वाचतांच येत नाही ! आणि आमच्या वडिलांच्याच काय पण एकंदर मराठी वाङ्मयाबद्दलची आमची रसिकता अद्याप उमलावयाची आहे—जागी व्हावयाची आहे ! तरीहि विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहायचें आम्ही मनावर घेतलें हें आमचें वैशिष्टय !

आज, खरें सांगावयाचें म्हणजे आम्हांस जर खरें कशांत समाधान वाटत असेल, देशोन्नति वाटत असेल, समाजकारण वाटत असेल तर तें

आम्हांस वेळच्या वेळीं 'ब्रु[1]' मिळणें, 'आपी[2]' मिळणें, 'भात' मिळणें तसेंच 'खिची[3]' 'पीली[4]' 'जीली[5]' इत्यादि मिळणें यांतच वाटतें.

आज 'खाऊ' आणि 'भाऊ' हेच आमचें उत्कृष्ट मनोरंजन!

वाचकहो, स्पष्ट सांगा, पुढे आमच्या हातून काही देशसेवा, राष्ट्रोन्नति व्हावी असें आपणास वाटत असेल, तर हे वर सांगितलेले जिन्नस आम्हास वेळच्या वेळीं मिळावयाला नको काय?

—आणि आम्हांस कळविण्यास आनंद वाटतो की, हे सर्व आम्हास वेळच्या वेळीं मिळतें! क्वचित् आम्हांस त्याकरिता रडण्याचाहि सत्याग्रह करावा लागतो—पण त्यासहि आमचाच गुण नडतो, हें आम्ही प्राजलपणानें कबूल करतों!

आम्ही मूळचेच रडवे नसल्यामुळे आमच्या रडण्यांतहि आमच्या वडिलधाऱ्यांना एक प्रकारचें कुतूहल वाटतें. आणि त्यामुळे काही वेळीं आम्हांस अत्यंत प्रिय असलेला "आपी भात" आम्हास वेळेवर मिळत नाही!

म्हणजे क्रौर्य पाहा, आमच्या रडण्याचेंहि आमचे वडीलधारे काही वेळेला खेळणें करतात!


आता "इकडून इकडून" मुद्द्यावर यावयाचें म्हणजे कळविण्यास संतोष वाटतो की, आमची हा प्रस्तावना आमच्या वडिलांचें पुस्तक लिहून पुरें व्हावयाच्या आंतच पुरी झाली! वडिलांस वाटलें की आम्हास वेळ लागेल—पण तसें झालें नाही! आम्ही प्रस्तावना लिहून मोकळे झालों आहोंत. आता ती. भाऊंनी पुस्तक केव्हाहि लिहून पुरें करावें!

पण येवढें मात्र निश्चित की, आमच्यासारख्या अज्ञ बालकानीच इथून पुढे प्रस्तावना लिहाव्यात हेंच सोयीच्या व शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत योग्य, पद्धतशीर आणि उचित होय!

—कारण मग या वयाच्या आडोशाने प्रस्तावना-लेखकाचें जें एकमेव कार्य की, कोणत्याहि पुस्तकाची बेहद्द स्तुति करणें, त्यातील नसत्या गुणांबद्दल जिभल्या चाटणें, तेवढ्या एका पुस्तकाने "महाराष्ट्राचें आणि महा-

---

१ दूध २ आमटी ३ खिचडी ४ पोळी ५ जिलभी—अरेरे! हेंहि सांगावें लागतें!



--आणि आम्ही रेघोट्यांच्या अभिनव पण सनातन पद्धतीनें पाटीवर प्रस्तावना लिहून काढली !

राष्ट्र वाङ्मयाचें कांही भलेंबुरें केलें आहे " असें प्रदीर्घ स्वरांत किंचाळून सांगणें, त्या पुस्तकाने पूर्वीच्या कित्येक नामवंत लेखकांस मागे टाकलें असून कित्येकांस पुढे ढकललें आहे, इत्यादि जागतिक विधानें करणें--इत्यादि बाललीला--प्रस्तावना-लेखकाच्या वयाला शोभूनच दिसतील नव्हे काय ?

सर्व जगाकडेच अत्यंत आदराने, कौतुकानें आणि आश्चर्याने पाहण्याचें आमचें हें वय असल्यामुळे या बालवयांत वाटेल तें शोभून दिसतें; मग प्रस्तावना म्हणजे कोणत्या झाडाचा पाला !

लेखकांनी इथून पुढे आमच्यासारखा बालवयाचा 'प्रस्तावनालेखक गाटण्याची शिकस्त करावी, अशी आम्ही आमच्या पिढीतर्फे त्यांना आग्रहाची विनंति करतो.

या 'अनौपचारिक मुलाखती' आम्हीं वाचलेल्या नसल्यामुळे प्रस्तावनेचीं पानें आम्हांला आता अशींच अवातर अर्थात् 'मूलग्राही' चर्चेने भरून काढावीं लागणार !

या पुस्तकात ज्याच्या मुलाखती घेतल्या आहेत, त्या मुलाखतींत आलेल्या त्या त्या माणसाच्या फोटोवरून त्यांतील कांही माणसें आमच्या घरीं ती. भाऊंच्याकडे नेहमी येतांना दिसतात. तेव्हा ती. भाऊंनी लिहिलेल्या 'अनौपचारिक मुलाखतीं'तील काही मुलाखती खऱ्या असाव्यात आणि कांही काल्पनिक असाव्यात असा आमचा, का कोणाला ठाऊक, समज झालेला आहे !

आणि माझे भावी क्रिकेट गुरुजी श्री. रा. रा. देशभक्त रंगा सोहनी यांच्या मुलाखतींत "महाराष्ट्राचे भावी क्रिकेटियर" म्हणून माझा फोटो परवानगीशिवाय छापला आहे, तेवढ्यावरून या मुलाखतींतून "अनौपचारिक" भाग बराच असावा हें वाचकानी ओळखलें आहे किंवा नाही आम्हास माहीत नाही—पण तें आम्ही ओळखले आहे, येवढें या प्रस्तावनाद्वारें आम्ही ती. भाऊंच्या नजरेस आणूं इच्छितो !

प्रसिद्ध झालेल्या अनौपचारिक मुलाखतींपैकीं कांही कांही मुलाखती फारच चांगल्या आहेत ! पण त्याचें कारण आम्ही आहोत, याचा 'अनौपचारिक मुलाखतीं'च्या कित्येक वाचकास पत्ताहि नसेल !

यांतील कित्येक मुलाखतींचीं अपुरीं हस्तलिखितें "कागद फाडण्याचा" आमचा आवडता खेळ असल्यामुळे आम्ही तीनतीनदा फाडून टाकली होतीं ! कांही मुलाखती 'चोळामोळा' करून निकामी करून टाकल्या होत्या. त्यामुळे त्या त्या मुलाखती ती. भाऊंस पुनः पुनः लिहाव्या लागल्यामुळे फारच चांगल्या झाल्या आहेत ! आता याचें श्रेय कोणास आहे, याचा या हकीकतीवरून वाचकांनीच निकाल द्यावा !

आतापर्यंत झालेल्या मुलाखतींत आमचे भावी क्रिकेट-गुरुजी श्री. रंगा सोहनी व वस्ताद सदू गोडबोले यांच्या मुलाखती पुढे आम्हांला समजायला लागल्यानंतर खूपखूप आवडण्याचा संभव वाटतो. कारण वरील दोन विभूतींपैकी एक पैलवान असून एक खेळाडू आहे; आणि आमच्या या वयांत बुद्धीपेक्षा धिंगामस्तीची आणि खेळण्याची आम्हांस जास्त आवड असल्यामुळे आम्ही हें छातीठोक भविष्यकालीन विधान करीत आहोत !

श्री. रावसाहेब गो. ल. आपटे हा माणूस बरा असावा असें वाटतें. त्यावरून आणि या ‘ अनौपचारिक मुलाखतींचा ’ उगम त्यांच्याच मुलाखतीपासून झालेला असल्यामुळे ती मुलाखत चांगलीच असावी असें वाटते.


—कारण की, तसें नसतें तर ‘ सह्याद्रि ’ मासिकाच्या संपादकांनी पुढील मुलाखती छापल्याच नसत्या ! गु. तात्यासाहेब केळकर यांसही श्री. गो. ल. आपटे यांची मुलाखत खूप आवडल्याचें आमचे ती. भाऊच एक दिवस घरीं आनंदाने सागत होते !

‘ प्रभात कवि ’ शांताराम आठवले हे आमच्याकडे नेहमीं येतात. त्यांच्या कविता आणि पदें खूप लोकप्रियहि आहेत. ‘आधी बीजऽएकले।–!’ पण प्राजळपणानें सांगावयाचें तर या गृहस्थाविषयीं मला कधींच आपलेपणा वाटला नाही आणि वाटणारहि नाही असें वाटते !

कारण आमचे ती. भाऊ हे नुसते गद्यलेखक असूनहि जर इतके ‘तऱ्हेवाईक’–(या शब्दाचा अर्थ आम्हास माहीत नाही. आमची आजी ती. भाऊंस या नांवाने नेहमी संबोधते म्हणून हा शब्द आम्ही वापरला आहे.) तर “ कवि माणूस ” काय असेल याची मला धास्तीच वाटते !

आमचे ती. भाऊ “कवी” नसूनसुद्धा आणि त्याना गाणारा गळा नसूनसुद्धा लो. टिळकांच्या* “ **रंग नभाचें कसे तरी !** ” “ **ओळखून घ्या मज पुरता। खराच मी वेडा नुसता।** ” व श्री. शांताराम आठवले यांच्या-

* हीं काव्यें लोकमान्य टिळकांचीं नसून प. कविश्रेष्ठ ना. वा. टिळक यांचीं आहेत असा लोकप्रवाद आहे. पण आमचा त्याच्यावर विश्वास नाही. लो. टिळकांसारख्या विभूतींनीच असली सर्वांगसुंदर काव्यें केलीं असली पाहिजेत असें आमचें प्रांजल मत आहे.



लेखकाच्या मांडीवर प्रस्तावना लेखक

सुद्धां कित्येक कविता वेळीं अवेळीं गात असतात. त्यावरून श्री. शांताराम आठवले यांच्या संगतीने आमचे ती. भाऊ कधी तरी कवि बनणार, अशी मला धास्ती वाटते! तेव्हा नुसता गद्य लेखक जर इतका 'तऱ्हेवाईक' तर—

—जो मूळचाच 'कवि' असेल तो आपल्या घरांत काव्यगायनाचा काय धिंगाणा घालीत असेल! कवीच्या घरीं फोनोग्राफ असणारच नाहीं—कारण

तो असल्यानंतर फोनोग्राफची गरजच काय? (श्री. शांताराम आठवले यांच्या घरीं आहे असें कळतें.) असें माझें मत आहे. आणि कवीच्या काव्यगायनाच्या या त्रासामुळें त्याच्या आवतीभोवतीची माणसें कसे दिवस काढीत असतील याची आम्हांस कल्पनाच करवत नाही! आम्हांस असें वाटतें कीं, या गुणामुळे 'कवीस' वारंवार आपली बिऱ्हाडें बदलावीं लागत असतील—आणि नवीन जागा मिळविण्यास त्यास पंचाईत पडत असावी! असो.

• श्री. भाई ना. ग. गोरे हे आमच्या शेजारींच रहातात. गृहस्थ दिसायला बरा दिसतो; पण त्याच्या विचारा—आचाराचा 'मेळ' नसावा असें वाटतें. कारण मी त्याच्या घरीं गेलेला आहे. माझ्यापेक्षा वयानें थोडी मोठी अशी त्यांची मुलगी 'शुभा'—

——अलीकडे आमच्या घरीं श्री. पा वा. गाडगीळ, भाई र. के. खाडिलकर, भाई एस. एम. जोशी, आणि आचार्य जावडेकर इत्यादि माणसें नेहमी येतांना दिसतात; पण प्राजळपणानें सांगायचें झाले तर त्यातील फक्त आचार्य जावडेकरांबद्दल आम्हांस आदर वाटतो.

श्री. पा. वा. गाडगीळ हे तर इतक्या मोकळ्या मनानें आणि मोटमोठ्यांदा पण खऱ्या जिव्हाळ्यानें बोलत असतात—नाटकी सभ्यपणा तर त्यांच्यांत अजीबात दिसत नाही. त्यामुळे होतें काय कीं, श्री. पा. वा. गाडगीळ यांची विद्वत्ता आणि वय सोडल्यास ते स्वभावानें अद्याप आमच्या इतकेच लहान आहेत असें आम्हास वाटतें. आमच्या बालवयामुळे आमचे रागलोभ जसे लपत नाहीत अगदी तसं या गृहस्थाचें आहे! मनुष्य फारच साधा आणि सरळ.

या लोकांमुळे आमच्या ती. भाऊंस 'समाजसत्तावाद—विश्वकुटुंबवाद—व्यक्तिस्वातंत्र्य' इत्यादि गोष्टींचा अलीकडे अत्यंत आवडीने नाद लागलेला दिसतो! पण ते विचार आमच्या ती. भाऊंच्या आणि वर उल्लेखिलेले श्री. गोरे, खाडीलकर, गाडगीळ, एस्. एम्. जोशी यांच्या कृतींत केव्हा उतरणार तें एक परमेश्वरच जाणे!—

श्री. गोरे हे आपल्या कन्येस (चि. शुभा) घरांत बिल्कूल इकडे तिकडे हात लावूं देत नाहीत—कागद उडवूं देत नाहीत—श्री. पां. वा.

गाडगीळ हे आपले मुलगे घेऊनहि आमच्याकडे दोनतीनदा आले होते. तेव्हा त्यांचाहि आपल्या मुलावर जरा वचकच दिसला—कुठे गेलें हो मग या लोकांचें **व्यक्तिस्वातंत्र्य** ?

'**सर्वांस सारखी संधि**' म्हणजे समाजसत्तावाद ना ? मग मी ती. भाऊंनाच प्रश्न विचारतो—आपण इतक्या लोकाचे स्नेही आहात—आपणास कित्येकाबद्दल आदर आहे—आपण त्या त्या सर्व लोकांच्या मुलाखती घेणार आहांत काय ? श्री. र. गो. सरदेसाई, बावडेकर, कवठेकर, गु. बापूसाहेब किंकर, गोपीनाथ तळवलकर; क्षीरसागर मास्तर, पां. गो. लोहोकरे, ग. ख. पवार यांचें काय करणार तुम्ही ? इतर सर्व सोडा—पण निदान श्री. पां. वा. गाडगीळ यांचा तुमचा तर इतका स्नेहसंबंध आहे, मग त्यांची मुलाखत अजाप कां आली नाही हो ?—द्या पाहूं याचें उत्तर !

आणि म्हणूनच आम्हास आचार्य जावडेकराबद्दल आदर आहे. त्यांची धीरगंभीर मूर्ति पाहूनच आम्हास त्याच्याबद्दल आदर वाटतो. "अध्यात्म—धर्म, अर्थ, काम, मोक्ष"—त्याच्या विचाराना विसाव्याचें क्षितिज आहे ! आणि आम्ही स्पष्ट म्हणतो की, या बाकीच्या सर्व लोकाजवळ विद्वत्ता असेल, तळमळ असेल, राजकीय चळवळहि असेल—पण सगळें बारेमाप !

श्री. के. नारायण काळे या गृहस्थाबद्दल आम्हांस काही अंदाजच लागत नाही. हा गृहस्थ आमच्याकडे येतांना आणि जाताना आम्ही नेहमी पाहातो; पण "जाताना येताना" तो सारखाच दिसतो. जसा कांही एखादा 'पुतळाच' आला आणि गेला ! हा गृहस्थ म्हणे सिनेमा दिग्दर्शक आहे !

आणि सिनेमा-दिग्दर्शकाबद्दल ती. भाऊंस येवढा अनादर असतांना ते या गृहस्थास—श्री. के. नारायण काळे यांस—आमच्या घरीं येऊंच कसे देतात, याचें आम्हांला आश्चर्य वाटतें ! या गृहस्थाबद्दल आदर बाळगल्यास तो कदाचित् आम्हांस सिनेमात काम करायला लावून आमचा "बालनट" करून टाकील अशी आम्हास धास्ती वाटते. (ती. भाऊ आमचें सरक्षण करोत !)—आणि त्यांच्या चेहऱ्याच्या निर्विकल्पपणावरून हा गृहस्थ आम्हाला कधी 'सिनेमा' दाखवील अशी आम्हांस अस्पष्टहि आशा वाटत नाही ! (मी त्यांच्या घरीं जाऊन एकदा त्यांच्या मुलांना

तरी सिनेमा पाहायला मिळतो की नाही, येवढी चौकशी करून येणार आहें !) जाऊं द्या. आमच्या सारख्यांनी त्या विषयाबद्दल जास्त न लिहिणेंच बरें.

श्री. निरंतर'हा गृहस्थ मला बरा वाटतो. तो आमच्या घरीं आमचा "सख्खा काका" असल्याप्रमाणें नेहमी येतो. आपल्या जवळच्या रिकाम्या सिगारेटच्या पेट्या आम्हास खेळायला देतो. त्यात असलेला चांदीचा कागद—तो हल्ली आम्हांस मिळत नाही. त्यावरून कोठेतरी "महायुद्ध" भडकलें आहे हें आम्हास कळलें आणि आनंद वाटला.

कारण येवढें महायुद्ध म्हटल्यानंतर त्यात कोणाचा तरी हमखास मोटा विजय होणार या कल्पनेचेंच आम्हांस खूप कौतुक वाटते! श्री. निरंतर याचा शालेय जगाशीं संबंध असल्यामुळें व आमचाहि पुढें लौकरच येणार असल्यामुळें आम्ही श्री. निरंतरांविषयी-पुढे आम्हांस त्रास पडूं नये म्हणून-आगाऊच आदर बाळगून आहोत!

प्रसिद्ध झालेल्या "अनौपचारिक मुलाखतीं"पैकी आता फक्त एकाच मुलाखतीचा परामर्श घ्यावयाचा राहिला. ती मुलाखत म्हणजे "गोंधळेकर-गोडबोले" ही जोड मुलाखत होय!

पैकीं श्री. गोंधळेकर याच्याबद्दल आम्ही काहीच लिहीत नाहीं. कारण आम्ही त्यांस पाहिलेलेंहि नाही. पण फोटोग्राफर श्री. केशवराव गोडबोले हा मात्र फार चागला माणूस आहे, अशी आमची खात्री आहे.

आतापर्यंतच त्यांनी आमचे जवळजवळ चारपांच फोटो काढले आहेत, आणि यापुढें ते आणखी किती काढतील या कल्पनेच्या आनंदातिरेकामुळें आम्हांस अंदाजच लागत नाहीं. पण त्यांचा फोटोग्राफीचा धंदा मात्र वाढत्या प्रमाणांत आणि जोरांत चालावा—माझ्या ह्या प्रस्तावनेच्या वाचकवर्गानेहि त्यांच्याकडेच आपले फोटो काढून घ्यावेत, अशी मी त्यांना आणि परमेश्वराला विनंति करीत आहें. कारण आमचे ती. भाऊ आमच्या काढलेल्या फोटोबद्दल त्यांस पैसे देस असतील असें, कां कोणास ठाऊक, आम्हांस वाटत नाहीं!

असो. आमच्या वयानुरूप आम्ही प्रसिद्ध झालेल्या मुलाखतींचा, न वाचतांहि, इतका उत्कृष्ट परामर्ष घेतला. यापुढें आणखीहि काहीं अनौ-

पचारिक मुलाखती येणार आहेत. त्यांत आमच्या कानावर आलेली कांहीं नांवें म्हणजे श्री. तात्यासाहेब केळकर, प्रा. दत्तोपंत पोतदार, काकासाहेब लिमये, रावसाहेब र. लु. जोशी इत्यादि आहेत त्या मुलाखती एक तर फार चांगल्या होतील किंवा–पण आपण आताच कशाला अंदाज जाहीर करा–श्रीसमर्थ काळच काय तें ठरविणार आहे!

तेव्हां "होमकुंड" कादंबरीप्रमाणें व इतर एकदोन हस्तलिखित कादंबऱ्याप्रमाणें या अनौपचारिक मुलाखतींचें लेखन अर्धवट न सोडतां ते ती. भाऊंनी पुरें करावें व या अनौपचारिक मुलाखतींच्या वाचनानें महाराष्ट्रासकट हिंदुस्थान स्वराज्यसन्मुख व्हावा!–मुसलमान बधूंनीहि पाकिस्तानाची संकुचित आणि अराष्ट्रीय कल्पना सोडून द्यावी–मग हिंदुमहासभेचीहि चळवळ आपोआपच थंडावेल! आणि येवढे झाल्यानंतर रशिया व जर्मनी याचाहि आतरराष्ट्रीय तह होण्यास अडचण पडणार नाही हें निश्चित! आणि आपल्या एकाच पुस्तकानें एवढें 'राष्ट्रकार्य' केल्यानंतर ती. भाऊंनीहि आपलें लेखन पुढें सोडून द्यावें अशी आम्ही त्यांस अत्यंत लडिवाळपणाची पण नम्र विनंती करणार आहों!

आता फक्त एकदोन गोष्टींचा खुलासा करून ही प्रस्तावना संपवणार!

मराठी वाङ्मयांत एका नवीन प्रकारची भर घालण्याकरितां ह्या मुलाखती आपण लिहिल्या असें कदाचित् ती. भाऊ कौतुकाने सांगण्याचा संभव आहे. तेव्हां त्यांची अगोदरच नाकेबंदी करण्याच्या हेतूने आम्ही एक आगाऊच खुलासा करून ठेवतों.

या मुलाखती का लिहिल्या गेल्या?

आमच्या ती. भाऊंचा स्वतःचाच प्रकाशनाचा घरचाच धंदा असल्यामुळें ते बहुतेक नेहमीं घरींच असतात! तेव्हां आम्हास संभाळण्याची त्यांच्यावर वारंवार जबाबदारी पडते. घरांतील आमचीं वडीलधारीं माणसें ती. भाऊंच्या फक्त एकाच सबबीला दचकतात! आणि ती जालीम सबब म्हणजे "मला आतां लिहावयाचें आहे!"

तेव्हां ज्या ज्या वेळीं 'बापूला–म्हणजे मला–थोडें सांभाळा!' असा ती. भाऊंना घरांतून हुकूम सुटतो, त्या त्या वेळीं गेल्या वर्षभरात ती भाऊंनीं

"मला लिहावयाचें आहे !" अशी सबब सांगून तो वेळ काढण्याकरितां मग जे कांही ते लिहीत बसले त्या सर्व या 'अनौपचारिक मुलाखती' होत !

ह्या लिहिण्यांत "मराठी वाङ्मयाचा" काहीहि संबंध नसून, आम्हास संभाळण्याचें कर्तव्य टाळणें हाच त्यातील सद्हेतु होता. असो.

ही प्रस्तावना सपवताना एक विचार मात्र आमच्या मनाला धक्का देतो. तो विचार म्हणजे—या अनौपचारिक मुलाखती लिहून आणि आणखीहि पुढील मुलाखती लिहून आणि पुढे यांचें स्वतंत्र पुस्तक काढून ती. भाऊ यांनी जे कागद खराब केले आणि पुढे करणार आहेत, ते तसे न करता जर त्यांनी वाचविले तर ते आम्हांस पुढे अभ्यासाला उपयोगी पडणार नाहीत काय ? पण आम्हासहि हल्ली राहवत नसल्यामुळे आम्ही हातीं लागतील ते कागद जर फाडतो, तर—तेव्हा अशा तऱ्हेने आमचीच बाजू लंगडी असल्यामुळे, हा विचार ती. भाउंस तरी आम्ही कसा सुचवावा ?

यावरून वाङ्मय आणि चारित्र्य यांचा किती घनिष्ट संबंध आहे हें आपोआपच सिद्ध होतं !

आता फक्त शेवटच्या एका महत्त्वाच्या मुद्द्याचा विचार करावयाचा राहिला.

या 'अनौपचारिक मुलाखती' पुरोगामी आहेत की 'प्रतिगामी' आहेत ?

आमचें प्रांजळ मत असें आहे की, आज ह्या मुलाखती निःसंशय 'पुरोगामी' आहेत !

पण पुढे कदाचित् आम्ही वयात येऊन 'लेखकच' झालों, तर आमच्या वडिलांची पेन्शनींत गेलेली जुनी पिढी ठरणार—आणि मग ओघानेच ती. भाऊंचें वाङ्मय आणि या मुलाखतीसुद्धा 'प्रतिगामी' ठरणार !

पण आम्ही जर लेखक न होतां 'क्रिकेटपटु' झालो आणि तोच आमचा विचार अखेर कायम ठरेल असें आम्हांस आज वाटतें, तर आमच्या ती. भाऊंचें वाङ्मय निःसशय 'अजरामर' व 'पुरोगामी' ठरणार ! आणि आज आमचें ती. भाऊंवर येवढें प्रेम आहे की, त्या प्रेमाकरिता आणि त्यांचें वाङ्मय 'पुरोगामी' ठरावें येवढ्याकरितां आम्ही 'लेखना'कडे न कळण्याचा स्वार्थत्याग करण्याचें मनांत आणीत आहोंत.

येथपर्यंत प्रभुकृपेने आम्ही आमच्या वडिलांनी लिहिलेल्या 'अनौपचारिक

मुलाखती'बद्दल तार्किक आणि मार्मिक पद्धतीने, सात्त्विक आणि तात्त्विक पद्धतीने लिहून " जीवन-कलेच्या " जोडशक्तीने .परामर्ष किंवा भरपूर खरपूस समाचार घेतला आहे, हें येथें येवढ्याकरिताच सांगितलें की, आम्ही तसे केले नाही अशी—केवळ आम्ही न सांगितल्यामुळें—कोणास शंका येऊ नये!

—ओ ऽ हो! ती पाहा कोणी तरी 'चंद्रज्योत' पेटविली वाटतं!

—मग आमच्या प्रस्तावनेचेंहि " हेडिंग " आता चंद्रज्योतच!—

—वाहवा! बेबी-शाती-गोद्या-अन्त्या-अंद्या सर्वजणच फुलबाज्या आणि फटाकडे उडवावयाला लागले वाटतं—आता आम्हांला कोठला धीर निघावयाला—आता हे वाङ्मयकार्य येथेंच संपवून—जातां जातां—पुनः केव्हा तरी—" दिवाळींतील शोभेची दारू—आणि मराठी ललित वाङ्मय " यांचा किती घनिष्ठ संबंध आहे—

—अरे बाप रे, काय चंद्रज्योतीचा नयनरम्य प्रकाश हा!

—या फुलबाज्यातून काय तेजदार ठिणग्या टपटप खाली पडत आहेत?

—जशा काही मराठी वाङ्मयांत कोट्याच्च निथळत आहेत!

वाहवा ऽ वाह्वा ऽ!

चेंडू ऽ हा ऽऽऽ!

सुंदर किती नरी खचित हा!—

हा आला ऽऽ—

—मराठी वाङ्मयात इतक्या लहानपणीं

प्रस्तावना लिहिणारा पहिलाच

मनोहर यशवंत जोशी

—नमस्तें!

—वंदे मातरम्!

रावसाहेब गोपाळ लक्ष्मण आपटे : : : २

त्या दिवशीं मी जेव्हां घरी परत आलों, तेव्हां माझें मलाच आश्चर्य वाटलें. वास्तविक मी कोठे तरी चहा घेण्याकरिता म्हणून बाहेर पडलों होतों. आणि परत आलों तो एक मुलाखत घेऊन ! त्या दिवशीं मी दोनचार स्नेह्यांकडे गेलों; पण घरीं कोणीच भेटलें नाहीं, म्हणून सहज परत येतांना एका घराशीं थांबलों. आणि—

"काय साहित्यिक आहेत का?" या प्रश्नाने मी त्या घरांतील व्यक्तीला हटकलें.

—आता मला वाटतें वाचकांनी ओळखलें असेलच की मी ज्या व्यक्तीला हटकलें ती व्यक्ति म्हणजेच पोलिस प्रॉसिक्यूटर रावसाहेब गोपाळ-लक्ष्मण आपटे होत.

"काय साहित्यिक आहेत का?" मी पुनः पुकारलें.



रा. सा. गोपाळ लक्ष्मण आपटे

इततक्यांत एक रुबाबदार माणूस तिरिमिरीने दाराबाहेर आला आणि त्याने कांहीसें रागांत आणि पुष्कळसें लोभांत म्हटलें,

" सकाळच्या प्रहरीं अनपेक्षित आलांत आणि शिवीने कां हाक मारताय मला ? प्रभाते मुखीं राम चिंतीत जावा ! "

कानावरून जाणाऱ्या वाऱ्याप्रमाणेंच मी त्या उद्गाराला किंमत दिली. आणि सदर घरांत शिरत म्हटलें, " काही कामांत नाहीना ? "

" मी खूप कामांत असेन-पण आपण आलां-आता काय काम व्हायचं आहे ?-बरं तें जाऊं द्या-आज केवळ तुमच्या आमच्या लोभाखातर

"साहित्यिक" ही शिवी ऐकून घेतली—पण आपण पुढे या बाबतींत खबरदारी घ्याल, अशी मी आशा करतो!"

"अहो सभ्य, हा सोवळेपणा फार झाला—पण मी काय दाद देणार आहे तुम्हाला? अरे गृहस्था, मी तुझीं दोन पुस्तकं छापली आहेत—'+आपस्वार्थाचीं पानें' आणि '*विचित्र वाटमारी'—आणि आता कितीहि दम दिला तरी तुम्हांला साहित्यिक म्हणायला सोडतो होय मी?"

"तसा मला साहित्याचा पडसं खोकला येतो मधून मधून! पण म्हणून साहित्याचा आजन्म दमेकरी म्हणवून घ्यायची आपली तयारी नाही! मनुष्य आहे, करतो एखाद्या वेळीं कविता—" गोपाळराव आपली बाजू मांडीत होते.

"पण गोपाळराव, तुम्ही कविता जरी थोड्या आणि मधून मधून करीत असलां, तरी तुमच्या कविता खऱ्याच उपहासगर्भ आणि सुंदर असतात—"

"पण यशवतराव, माझ्या कविता चांगल्या असतात हे माझ्या "आपस्वार्थाची पानें" या कवितासंग्रहाच्या खपावरूनच नाही का ठरलं?—अहो, मराठींत कोणतं चांगलं पुस्तक जास्त खपतं? अन् आज अगदी सकाळच्या प्रहरीं माझ्या कवितांची इतकी स्तुति चालविली आहेत, पण याद राखा, माझ्या कवितांचें आणखी एखादं पुस्तक प्रकाशनार्थ गळ्यांत मारीन तुमच्या—हा धोका लक्षात आणून बेताचीच स्तुति करा म्हणतो मी!"

"बरं, आज खरं सांगायचं म्हणजे मी तुमच्याकडे चहाकरिता आलों आहें!"

गोपाळराव थट्टेत हसत म्हणाले "ठीक आहे, चहा देतो—पण बिझिनेस बोला—चहाच्या बदला मी पुढे जर आणखी एखादें पुस्तक काढलें तर त्याला प्रस्तावना लिहाल काय?"

मी त्या प्रश्नाला बगल देण्याच्या हेतूने म्हटलें, "प्रस्तावनेचं जाऊं द्या

---

† कवितासंग्रह किं. १२ आणे.

* विचित्र वाटमारी : विनोदी आणि गंभीर गोष्टींचा संग्रह. किमत १। रुपया. प्रकाशक—अर्थात् य. गो. जोशी ६२३।१५ सदाशिव पुणें २.

हो, पण मी आज मुलाखतच घेतों तुमची! अद्याप त्या प्रांतांत तुमची शिकार झालेली नाहीना?"

"नो, नो! अजूनपर्यंत माझ्यावर तो प्रसंगच आलेला नाही! बरं मग, मुलाखतीचें नक्की ठरलें काय?—मग नुसता चहा कसा चालेल?" गोपाळराव सचिंतपणानें म्हणाले.

"बरं, मग कॉफी सांगा!" मी निष्काळजीपणानें म्हटलें.

"नाही, कोको सांगतो!" गोपाळराव बेफामपणानें म्हणाले.

"नाही, मग मसाल्याचें दूध सांगा!"

"बरं, त्याच्याबरोबर कांही बिस्किटें वगैरे?"

"मी तुमच्या मुलाखतीला जितकं महत्त्व द्यावं असं तुम्हाला वाटत असेल, त्या मानानें तुमचे तुम्हीच ठरवा काय ते!" मी आपला निःस्पृह-पणा दाखवीत म्हटलें.

"मग, मी म्हणतो, यशवतराव, जेवायलाच रहता आज आमच्याकडे?"

नंतर अनुक्रमानें मसाल्याचें दूध, कॉफी, कोको, दोन वेळ चहा—आणि या सर्व पेयांची पोटात सरमिसळ होऊ नये म्हणून प्रत्येक पेयामध्ये, खारका, बदाम, मोसंबीं, सत्रीं वगैरे झालें. त्यावेळीं एकमेकांशी एका शब्दानेंहि आम्ही बोललो नाही—वातावरण अगदी गंभीर होतें.

नंतर सुमारें दीड एक तासानें मी तेथून बाहेर पडलो.

श्री. गोपाळराव यांनी मला उंबरठा ओलांडीपर्यंत शांतपणानें जाऊं दिलें—पण नंतर मात्र लगेच त्यांनी घाईनें माझ्या कोटाचा कोपरा पकडला, आणि म्हटलें, "—अहो साहित्यिक—चहा—केळी—कोको—ठीक आहे—पण आमच्या मुलाखतीचें काय?"

मी गंभीरपणानें म्हटलें, "पाहूं पुनः एखाद्या वेळीं—आता उशीर नाही का झाला?"

"अरे साहित्यिका—" गोपाळराव दांतओठ खात म्हणाले, "—आता पुढे पाहू काय? मी पोलिस प्रॉसिक्युटर आहे लक्षांत आहेना? आणि आपल्या सायकलला तर दिवा कधींच नसतो—एखाद्या दिवशीं सापडलां, म्हणजे याल वशिले लावायला! तेव्हा काढीन या चहा—केळ्यांचा वचपा!",

मीहि सदरा झाडीत म्हटलें, "बरं बरं—दम नका देऊं! आता घेतों

लखत–हं, आता मात्र उशीर करूं नका ह–हं मुलाखतीला बसल्यासारखे ोट बसा पाहू–"

इतक्यात कोणी तरी कोर्टातला माणूस गोपाळरावांच्याकडे आला, आणि याने हाक मारली–" रावसाहेब !"

त्या माणसाचें काम झालें आणि तो निघून गेला.

मी मुलाखतीला सुरवात केली.

" आपण रावसाहेब केव्हापासून झालां ?"

" तुम्ही 'प्रथितयश' आणि 'ख्यातनाम' साहित्यिक झालां त्याच ळेपासून ! आम्ही या तुमच्या पदव्यांबद्दल कधी शंका घेतली आहे काय !– ग आमची तसलीच रावसाहेबी आपल्या डोळ्यात का सलते ?"

आता त्या मुद्यावर बोलणें वाढवणें मला शक्य नसल्यामुळे मी दिवाण- खान्यात चौफेर पाहात म्हटलें, " बाकी गोपाळराव, तुमची टेस्ट चांगली दसते ! हे टेबल, हे फर्निचर, हा रेडिओ–"

" असणारच ! आम्ही तरी काय करणार त्याला ? आमच्या वडिलांनी आमच्याकरिता येवढा पैसा मिळवून ठेवला–आणि त्याच्या मोबदल्यात आम्ही आपली टेस्टसुद्धा चांगली ठेव नये काय ?"

'टेस्ट' चाहि मुद्दा बिनतोड निघाल्यामुळे मला पुनः वाकडी वाट करून निराळा प्रश्न विचारावा लागला.

" बर, आपण सकाळीं केव्हा उठतां ?"

" झोप झाली की !" गोपाळराव ताडकन् म्हणाले. " एकदा झोप ाली आणि नंतर अंथरुणावर लोळून कंटाळलो की आपल्याला उठल्या- शिवाय राहावतच नाही बघा !–"

" अरे वा:" मी मनातल्या मनांत म्हटलें "–अगदी माझ्यासारखेच हि !" आणि पुनः मुलाखतीला सुरुवात केली. " आपण आपल्या ारीराबद्दल खूप मेहनत घेतलेली दिसते आहे–आपल्या व्यायामाचा कांही पेशल प्रकार आहे काय ?"

" मुलाखतींत तरी निदान तो नवीन वाटेल अशी आशा आहे !" ोपाळराव आपल्या वैशिष्ट्याच्या तद्रूपतेंत म्हणाले. " लहानपणीं शाळा ुटली की पाटीदप्तर घरांत कोठेतरी भिरकावून आम्ही जें घराबाहेर पडायचें तें

दोन-तीन तासपर्यंत चिंचा, आवळे पाडीत हिंडायचें—आणि मग घरीं आलों की आमच्या वडिलांनी आम्हाला खूप चोपायचें—त्यामुळे आम्हाला व्यायाम असा निराळा करावाच लागला नाही !" आपला पिळदार दंड माझ्यापुढे करीत गोपाळराव स्वाभिमानानें आपल्या लहानपणाच्या आठवणीनें गहिंवरून म्हणाले, "—आहो, मग शरीर तयार न व्हायला काय झालें ? अलीकडे तो व्यायाम आमचा सुटला आहे ! पण काय सांगू, यशवंतराव, तुम्हांला, अद्यापपर्यंत मी पेरू चिरून खाल्याचं मला कधी आठवत नाही ! सबंध पेरू—दोन घास—आणि दर फार तर एक चिमूटभर मीठ त्या पेरूला लागावं म्हणून नंतर तोंडात टाकायचं! चिंचा—चिंचा तर काही विचारूच नका, बघा! चिंचेच्या दिवसात माझ्या खिशात एक वेळ पेन्सिल सापडायची नाही—पण चिंचाची एकदोन बुटकं हमखास सापडायचीं ! यशवंतराव, तुम्हाला कदाचित माहीत नसेल, चिंचात दोन जाती आहेत—तांबड्या चिंचा आणि साध्या चिंचा ! आणि त्यांतल्या त्यात गाभुळलेल्या चिंचा खायला—वा: ! वा: ! आता पोलिस प्रॉसिक्यूटर झालो आहेना—तरी एखाद्या वेळीं वाटतं, ही नोकरी सोडावी आणि आवळे—चिंचा पाडीत हिंडावें !"

"बरं आपला शाळेंत अभ्यास वगैरे ?"

"खरं सांगू, यशवंतराव," गोपाळराव आपला आलेला गहिंवर पुशीत म्हणाले, "मी अभ्यास असा मन लावून केलेला कधी आठवतच नाही मला ! पण परीक्षेत आपला नेमाने पास व्हायचा ! त्यामुळे आमच्या वडिलांना आश्चर्यहि वाटायचें !—आणि शंकाहि यायची ! पण वडिलाच्या नंतर लक्षांत आलें की लक्षांत राहणं हा आमच्या बुद्धीचाच धर्म आहे !—तेव्हा मी परीक्षेत पास होतों त्यास माझा नाइलाज आहे ! आता स्पष्ट सांगतों तुम्हाला, यशवंतराव, मुलाखतींत म्हणून आमच्या आयुष्याला तुम्ही कर्तबगारी कोठेहि चिकटवा—आमची काही हरकत नाही त्याला—पण स्पष्ट सांगायचें, तर आमच्या आयुष्यांत गोष्टी होत गेल्या—आम्ही त्याला अटकाव केला नाही हा आमचा फार तर चांगुलपणा !"

मला गोपाळरावांचें म्हणणें बरेंचसें पटलें. पुष्कळ माणसाना परिस्थितीमुळें

कर्तबगार व्हावेंच लागतें ! परिस्थितीपुढें ते तरी काय करणार बिचारे ?—पण नंतर लगेच मी सहानुभूतीने गोपाळाला विचारलें —

" बर, आपण वकिली सोडून नोकरीशी पत्करली ? "

मोठ्यांदा मनमोकळेपणाने हसत गोपाळराव म्हणाले—" याचं कारण अगदी उघडच आहे की ! "

" बर, वकिलीच्या धंद्यासंबंधाने आपलं मत काय आहे ? "

" वकिलीपेक्षा पोलिस प्रॉसिक्यूटरची नोकरी बरी ! आणि दिवसमानाने बेकारीपेक्षा वकिली बरी ! "

" मग आपण आपल्या वकील मित्राना हे आपले विचार कधी सागता का ? " मी हळुवारपणाने विचारलें.

" अहो, हरहमेश सांगतो ! आणि त्यातील कित्येकाना ते मनापासून पटलेंहि आहे ! पण तें माझ्या लक्षांत येताच मीच धसका घेतला. कारण माझ्यासारखं त्यांच जमायचं, म्हणजे माझं कांही तरी बरवाईट व्हायला पाहिजे किंवा मी नोकरीचा राजिनामा तरी द्यायला पाहिजे ! तेव्हा मीच हल्ली उलटी ओरड करतो की — या नोकरींत काय जबाबदारी—काय त्रास—काय मेहनत—काय दुपारी—काय जबरदस्त—आता आणखी कांही आठवत नाही, बघा; — पण खरं बोलायचं, यशवतराव, म्हणजे कोणतीहि नोकरी म्हटलें—मग ती पट्टेवाल्याची का असेना—कमी अधिक प्रमाणात त्यात हें सर्व असतंच की— "

" बर, उद्योग, उत्साह, राष्ट्रसेवा वगैरेबद्दल आपलं काय मत आहे ? "

" ते सर्व शब्द अद्याप सुखरूप आहेत की ! त्याच काय व्हायचंय ? मला वाटतं, बरं चाललं आहे त्यांचंसुद्धा ! "

" बरं, आपल्या लहानपणाच्या कांही आठवणी सागतां येतील का ? "

" हो ! त्याच फार आहेत आमच्या आयुष्यात ! आणि लहानपणाच्या आठवणींकडे डोकावून पाहावयालाहि खूप गमत वाटते बघा. अगदी लहानपणाची आठवण सागतो हं, तुम्हाला. आमच्या शेजारी एक कुत्रा होता. आम्ही त्याचे खूप हाल करायचे—आणि मग पुढे त्या कुत्र्यानेहि माझे खूप हाल केले. मी शाळेंत जायचा—तो—तो कुत्रा आपला थेट माझ्या मागोमाग—अगदी वर्गात—मग तेवढंच निमित्त करून मी शाळा चुकवू



रा. सा. आपटे, नाटकांत काम करतांना

लागलों—आणि हुजुरपागेसमोर तें स्टेशनरी सामानाचं दुकान आहे ना—तेथे वेळ काढायचा शाळेंतला!" गोपाळराव आपल्या लहानपणाच्या आठवणींत अगदी रंगले होते.

"पण मग शाळेचं प्रगतिपुस्तक आपल्या वडिलांनी पाहिल्यानंतर ते रागावत नसत का आपल्यावर शाळेंतल्या गैरहजेरीबद्दल?"

"पण प्रगतिपुस्तक त्यांना पहावयाला मिळेल तेव्हां ना! अहो तो स्टेशनरी सामानाचा दुकानदारच आमचं हिरहूसलं तोंड पाहून आमच्या

प्रगतिपुस्तकावर पालक म्हणून सही करायचा! वास्तविक त्याच वेळेला मला कळायला पाहिजे होतं की मी पोलिस प्रॉसिक्यूटर होणार म्हणून; पण खरं सांगू, यशवंतराव, मला जर अगोदर कळतना की मी पुढें पोलिस प्रॉसिक्यूटर होणार आहे म्हणून, तर खचित सांगतो, तुम्हाला, मी लहानपणीं असं वागलो नसतो! अहो हल्ली एखाद्या वेळीं मी पटकन् दचकून जागा होतों—वाटतं, जर चुकून आपली मुलाखत घ्यायला कोणी आला—आणि आपण हें सगळं खर खरं सांगितलं—तर लोक काय म्हणतील?"

"बरं, तें जाऊ द्या!" मी म्हटलं, "आपल्या जीविताला कांहीं तत्त्वज्ञान? ध्येय?

गोपाळराव उमळीनें म्हणाले, "नसून कसं चालेल? माझं तर अगदी असं स्पष्ट मत आहे की, कोटाला जशीं बटनं आवश्यक तसं प्रत्येक जीवाला काही तरी तत्त्वज्ञान आणि ध्येय पाहिजेच! अहो तें जर नसलं—तर मुलाखतच अशक्य की! तेव्हां मी ठरवलं आहे की होता होईल तो बरं वागायचं! चार स्नेही सोबती गोळा करून नोकरीशिवाय राहिलेला वेळ खेळून काढायचा! आपल्या पुण्याच्या सोशल क्लबांतील नाटकांतहि मी नेहमीं काम करतो—परवाच्या आमच्या खेळाला मी आपल्या चार कॉम्प्लिमेंटरी पास पाठवले होते—लक्षांत असेलच तुमच्या—अन् मग तुम्ही माझ्या कामाची खूप स्तुती करीत होता—तेव्हां सांगायचं काय, मी नाटकात मधून मधून काम करतों! लोकांचं चांगलं करतां आलं नाही तरी निदान लोकांना आपल्यापासून त्रास होऊं नये—हें ध्येय त्यांतल. म्हणून मी आपला खेळत गुंगत असतों. कसं काय, आमच्या ध्येयाबद्दल काय मत आहे तुमचं?"

गोपाळराव आतां अगदीं रंगांत आले होते. पण मी त्याना सावध केलें, "गोपाळराव ही मुलाखत तुमची आहे—त्यांत माझीं मतं कशीं चालतील? बरं तें जाऊं द्या, एकदरीत आपलं आयुष्य सुखी आहे ना?"

"ओ येस्! अलबत!—मग काय, चहा सांगू कीं काय पुन्हा?"

"हं सांगा." मी प्रसंगाला तोंड देत म्हटलें. गोपाळराव चहा सांगायला खालीं गेले आणि ते परत येतात तोंच मी त्यांना प्रश्न टाकला, "बरं, जगाबद्दल आपलं मत काय आहे?"

" ठीक आहे की ! जगाचं काय आहे ? असंच चालत राहणार ! मला वाटतं जगाचंहि बर चाललं आहे ! का तुम्हाला काही जगाबद्दल शंका यायला लागली आहे की काय ? " आपल्याला कांही तरी नवीन माहिती मिळणार या अपेक्षेने गोपाळराव बोलत होते. पण मी त्यांना निराळाच प्रश्न टाकला.

" बरं आपले आवडते ग्रंथकार ? "

मिष्किलपणाने हसत गोपाळराव म्हणाले " सांगूच का ? "

" हं सांगा ना. तुम्हाला कुणाचे वाङ्मय आवडते ? "

" मराठीत अव्वल दर्जाचे दोनच लेखक आहेत ! "

" कोण कोण बुवा ? "

" एक तुम्ही आणि दुसरा मी ! "

" काय म्हणतां ? "

" अहो अगदीं खरं ! हे मतहि परिस्थितीवर अवलंबून आहे ! आता असं पाहा—या वेळेला मराठीत अव्वल दर्जाचे लेखक दोन; पण कल्पना करा—आता तुम्ही घरीं गेलात आणि मी आपल्या दिवाणखान्यात एकटाच राहिलो—आणि माझीं पुस्तकं माझ्या हाताशीं आली—तर त्या वेळीं मराठींत अव्वल दर्जाचा लेखक एकच असणार यांत कांही शंका यायला तरी जागा आहे का ? "

" बरं तुम्हाला चित्रपट कोणचे आवडतात ? "

" जो नवीन असतो तो ! जुने चित्रपट कसे चांगले वाटणार मला ? नवीन चित्रपटांतहि एक गंमत होते—कांही पाहाण्यापूर्वी चांगले वाटतात ! —कांही पाहिल्यानंतर चांगले वाटतात—उदाहरणार्थ 'माझा मुलगा !—' "

तें ऐकतांच मला एकदम घाइ झाली. " बरं गोपाळराव, आपण बी. ए. एलएल्. बी. झालेले आहात; तेव्हा आपण कॉलेजमध्यें गेले असालच असें मी गृहित धरतों. तेव्हां तिथें कांही प्रेम वगैरे ? "

' आमचे वडील !–' गोपाळरावांनीं एक केवढा थोरला सुस्कारा टाकला.

" बरं बर—" मी आनंदानें म्हणालो. आता कांही तरी जुन्या पिढीबद्दल विचारप्रवर्तक ऐकायला मिळणार या आशेने मी तरारलो. " हं आपले वडील ! पुढें काय ! "

" काही नाही—त्यांनी आमची नाकेबंदी केली!"

" खोट कांही तरी! प्रेमाची नाकेबंदी कशी होणार?"

" प्रेम करण्यासारखं आमचं वय झालं—आणि वडिलांनीं लगेच आमचं लग्न करून टाकलं—" नतर थोडेसे शरमून गोपाळराव म्हणाले, " आणि कबूल करायला लाज वाटते जोशीबुवा, लग्न झाल्यानंतर प्रेमाच्या फंदांत पडायला लागणार 'मॉरल करेज' आमच्याजवळ नाही, पण त्याचा सूड म्हणून मी एक करायचं ठरवलं आहे!"

" काय?" मी ताडकन् उठून उभा राहिलो.

" मी आपल्या मुलाचं लग्न त्याचं शिक्षण पुरं झाल्याशिवाय करणार नाही!"

नतर मी गोपाळरावाना नमस्कार करीत म्हटलें. " बरं जातो आता मी. मी काही मुलाखत घ्यायच्या हेतूनं आलो नव्हतो—तेव्हां मुलाखतीला आवश्यक असे काही प्रश्न माझ्याकडून निसटले असतील तर माफ करा मला. बरं आता महत्त्वाचं असं काही तुमचं सांगायचं राहिलं आहे का?"

'आता उशीर फार झाला आहे'—यापेक्षा जास्त काय मांगणार?

तें महत्त्वाचें वाक्य लक्षांत घेऊन मी उठलो.

" अशा मुलाखती आपण आणखी कांही घेणार आहात काय?"

" कां? आपल्याला कुणाचं नांव सुचवायचं आहे? सुचत असलं तर सांगा. जमलं तर केव्हा तरी त्याच्याकडे दूध, केळीं, चहा वगैरे!"

नंतर गोपाळरावानीं त्या व्यक्तीचें नाव माझ्या कानात सांगितले. " हं—त्यालाहि आणा की जरा पुढं!"

" ठीक आहे, पाहातों प्रयत्न करून!"

" बरं माझ्या मुलाखतीचीं प्रूफं धाडाल का माझ्याकडे!—म्हणजे मला पुचलं तर मी ही कांही फेरबदल करीन त्याच्यात—"

मी मानेनेच गोपाळरावाना नकार दिला आणि सायकलवर आरूढ होऊन घरीं आलो.

मुलाखत लिहून काढली.

—आणि नतर—

गोपाळरावांनी केव्हां संधी साधली कुणाला ठाऊक? मी घरीं नसताना माझ्या टेबलावरचं मुलाखतीचं हस्तलिखित त्यांनी वाचलं आणि खालील मजकूर मुलाखतीखाली लिहून ठेवला.

"मुलाखत ठीक आहे; पण लिहिण्याच्या धांदलीत फक्त एका ठिकाणीं माझ्या नावाचा एकेरी उल्लेख झाला आहे. मुलाखतींत आपण फेरबदल करणें मला इष्ट वाटत नसल्यामुळें मी ही मुलाखतीच्या शेवटीं टीप देत आहे. फक्त एका ठिकाणीं नुसतं 'गोपाळ' लिहिलं आहे, त्याच्यापुढें वाचकांनी 'राव' असें वाचावें. मुलाखत सबंध वाचली नाही तरी चालेल, निदान नुसतं 'गोपाळ' कुठं आलं आहे तें पाहून त्याच्यापुढें 'राव' वाचायचं आहे, येवढं वाचकांनी कृपाळूपणें लक्षात ठेवावें."

शांताराम आठवले : एक कवि : : : ३

गेल्या ता. ३ फेब्रुवारीची गोष्ट.

शांताराम आठवले हा माझा स्नेही आहे. वयाने तो माझ्यापेक्षा लहान आहे आणि त्याला 'अरे जारे' म्हटल्याशिवाय माझी त्याबद्दलची आपुलकीची भावना तृप्त होत नाही. मी शांताराम आठवल्याला चिठी लिहिली,

"जरा काम आहे. घरींच राहा. मी एक तासाने येत आहें !"

अर्थात् शांताराम घरींच राहिला. आणि मी जों त्याच्याकडे चिठीप्रमाणें जातों तो मी आश्चर्यानें थक्कच झालो ! कारण शांताराम आठवल्याच्या टेबलावर केळीं मोसंबीं पेरू यांचा ढीग पडला होता.

मला वाटलें, माझी गेल्या 'सह्याद्री 'च्या अंकांतील रावसाहेब आपटे यांची मुलाखत या गृहस्थाने वाचलेली दिसते आहे आणि टेबलावर केळीं

—हे लिहायला लाजायचें मलाहि कांही कारण नाही म्हणा. प्रत्येकाचे असे कांही गैरसमज केव्हा तरी होतातच !

कवि गात होता. मी पाहत होतो.

आणि मला वाटलें, हे काव्यचरण ज्यानी ऐकले असतील—आणि ते शांताराम आठवले या कवीचे आहेत, असें ज्याना माहीत असेल—त्यांनी जर शांताराम आठवल्याला पाहिलें नसेल, आणि अशांनी जर शांताराम आठवले कसे असतील याची कल्पना केली, तर त्यांनी आणि मीसुद्धा असें वर्णन दिलें असतें—

'गरुडासारखें नाक, शंभर कॅंडल पॉवरने चमकणारे घारे आणि तीक्ष्ण डोळे—डोक्यांत घोळणाऱ्या काव्यकल्पनानी खो खोचा किंवा हुतुतूचा डाव खेळायचें ठरविलें तर त्यांना खेळायला पुरून उरेल असें भव्य कपाळ—छातीवर दगड फोडून घेण्याइतकी भयंकर भरदार छाती—चेहेऱ्यावर सदैव तळपणारें तें स्मितहास्य (रागांतसुद्धा बरं का !)'

माझें मलाच हसायला आलें. शांताराम आठवले याला जेव्हा मी पहिल्यांदा पाहिलें—म्हणजे मला एकानें दाखविलें—तेव्हा पटकन् माझ्या हातांतील जळकी विडी गळून पडली होती—आणि मी मनात उद्गारलो होतो—

" अरे हा कसला कवि ? एक किडकिडीत माणूस ! याचें खरें वर्णन करावयाचें तर—उंचीचा शेकाटा ! जाडी—रस्त्यावरच्या तारेच्या खांबाची ! डोळे मात्र कांही तरी सांगणारे ! तोंडावर एक तऱ्हेचें केविलवाणें हास्य ! मनांतील कल्पनांचे वारे सावरण्याकरिता नेसल्या धोतराचें शीड हातांत धरून चाललेला एक माणूस ! "

मी मनात तर ठरविलेंच की आज या गृहस्थाची मुलाखत घ्यायची ! पण सुरुवात कशी करावी, हें माझ्या लक्षात येईना.

कवीचें गाणें चालूच होतें.

अखेर शेवटीं मी त्या कवीला एक चमत्कारिक प्रश्न टाकला.

" खरंच, आठवले, आपण कवि आहात असें आपणांस केव्हापासून वाटायला लागलें आणि कां वाटायला लागलें ? "

माझ्या या पहिल्या प्रश्नानेंच शांतारामाचें गाणें बन्द पडलें आणि डोळे तपासण्याकरितां डॉक्टराने डोळ्यांत औषध घातलें की माणसाला जशा सर्व वस्तु सारवल्यासारख्या दिसायला लागतात, त्याप्रमाणें आविर्भाव करीत, शांताराम आठवले किंचित गोंधळलेल्या वृत्तीनेंच म्हणाला—

" हा प्रश्न फार मुद्देसूद असल्यामुळे आणि त्याच्यांत मनोविश्लेषण, गूढगुंजन आणि शिवाय मनोरंजन असल्यामुळे मी या प्रश्नाचें तडकाफडकी उत्तर देऊं शकत नाही ! "

" ठीक आहे ! मग तितक्याच महत्त्वाचा मी आपणाला दुसरा प्रश्न विचारतो. आपण आपली रविवारची सुटी कशी काय घालविता ? "

" खुषींत आणि मजेंत घालवितो ! प्रत्येक रविवार माझा निरनिराळा जातो. फक्त न चुकता एक गोष्ट मात्र मी नियमाने दर रविवारीं करतो—"

" काय दाढी ? " मी जिज्ञासेने विचारलें.

मोठ्यांदा हसत शांताराम म्हणाला, " मी काय य. गो. जोशी आहें काय आठ आठ दिवसांनी दाढी करायला ? दर रविवारीं चार जमतील ते स्नेही गोळा करून—आमचा पवार, पां. गो. लोहोकरे—बादशाही बोर्डिं-गात जाऊन दहीमिसळ चापतो ! "


" अरेरे ! " मी मनात खजील झालो. हा कवि दहीमिसळ खातो, हे मी मुलाखतींत कसें लिहूं ?

" बरं आठवले—" मुलाखत वन्हवीत पुढें नेण्याकरिता मी म्हटलें, " समजा, आपण एखादी नवीन कविता केलीत—आणि ती आपल्याला आवडली—तर लहान मुलांना आकडी किंवा फिट्स येऊन ती किंचाळ-तात तितक्याच तन्मयतेनें आणि जिव्हाळ्याने आपण आपली कविता कधी गातां काय ?—किंवा कुणाला गाऊन दाखवितां काय ? " मी जिज्ञासेने विचारलें.

शांताराम आठवले आपल्या दोन्ही हातांचे पंजे चुरगाळीत म्हणाला, " नाही. इतका फिट आल्यासारखा जिव्हाळा अजून माझ्या कोणच्याच कवितेत उतरला नाही ! पण जोशीबुवा, हा प्रश्न तुम्हांला कशावरून सुचला? "

" आपल्या मास्टर विनायकनं आपल्या चित्रपटांत एक दोन कवि इतक्या तल्लीनतेने गाताना आणि कविता करताना दाखविले आहेत, म्हणून

शांताराम आठवले : एक कवि



‘ मुलीला खेळवतांना काव्याशींच खेळल्यासारखं वाटतं मला ! ’

मला कल्पना आली की कवि होणं फार त्रासाचं आणि कष्टाचं काम आहे ! बरं आठवले, आपण जेव्हां कविता करतां तेव्हा शुद्धीवर असतां काय ? ”

या प्रश्नाचें उत्तर म्हणून शांताराम आठवले याने जवळच पडलेल्या एका कागदाची गोळी करून माझ्या अंगावरच हंसत खेळत फेकली !

“ अं हं ! आठवले, थट्टा नव्हे—म्हणजे मला आपल्याला असं विचारायचं आहे की, आपल्या जवळ **प्रतिभा** जास्त आहे की **प्रतिभा-** **-साधन** जास्त आहे ? ”

हसतच उत्तर चालू झालें, " मी अजून माझ्या काव्याचं तसं तपशील-वार टेंपरेचर घेतलं नाही! आणि जोशीबुवा, अजून आम्हांला जगायचं आहे की बरेच दिवस---इतक्यात आम्हांला असे निरवानिरवीचे प्रश्न कां विचारता?"

" बरं, आपण मध्ये कांही दिवस मलेरियाने आजारी होतां—आणि त्याच वेळेला आपल्या *बीजांकुर या काव्यसंग्रहावर अभिप्राय येत होते—या दोन गोष्टींचा एकमेकांशी काही संबंध आहे काय?"

" आपण आमच्यापेक्षा वयाने मोठे आहात--म्हणून का होईना मी तुमच्याबद्दल आदर बाळगतो—म्हणून उत्तर देत नाही—पण एवढंच सांगतो माझ्याजवळ याच्यावरहि उत्तर आहे हं!"

" असणारच! यात काय संशय! प्रश्न म्हटला की, त्याला उत्तर आलच! बर, मी आता तुम्हाला निरुत्तर करणारा प्रश्न विचारतो---" आणि मी थोडासा चुटमळलो. " जोशीबुवा, विडी शिलगवा म्हणजे असें बोलताना अडखळणार नाही!" कदाचित् माझ्याजवळ काड्याची पेटी नसेल या कल्पनेनं आठवले यांनी काड्याची पेटी आणून माझ्यापुढे टाकली. तिने विडी पेटवीत व ती काड्याची पेटी मी आपल्या खिशांत टाकीत विचारलें " आपल्या कवितापैकीं कांही कविता भिकार असतात हें आपणांस कबूल आहे काय?"

" अलबत्! माझ्याहि कांही कविता भिकार आहेत. कित्येक नामवंत लेखकाच्या काही लघुकथा भिकार आहेत. कित्येक कादंबरीकारांच्या—पण तपशील कशाला? जो उत्कृष्ट निर्माण करतो तो कांही भिकारहि निर्माण करतो!"

" कां?"

***बीजांकुर हा शांताराम आठवले यांचा मनोहर ग्रंथमालेने प्रसिद्ध केलेला दुसरा कविता—संग्रह. मी शांताराम आठवले याचा पहिला काव्य-संग्रह प्रसिद्ध केला आहे. त्याचे नांव " एकलें बीज " तोच चांगला आहे असें माझें मत आहे. किमत फक्त १॥ रुपया.**

" कारण—वर्षात सण थोडे असतात—साधे दिवसच फार असतात ! आणि सगळेच सण केले तर सणांत तरी गोडी राहील काय ? "

" बरं, आपण कोणी असामान्य आहोत असा आपला भ्रम व्हायला सुरवात झाली आहे काय ?—का आपण सध्या त्याच भ्रमात आहात ? "

" तसली रोगराई मला अजून झालेली नाही ! कदाचित् माझ्या कांही कविता असामान्य असतील; पण मी असामान्य खास नव्हे ! **अहो, आम्ही माणसं** ! आयुष्य आणि भावना कुठे दुमडल्या गेल्या की तुम्ही गद्यात लिहितां आम्ही पद्यात लिहितो ! खरे **कवी, ज्ञानेश्वर, तुकाराम! जे काव्य जगले ते कवि** ! " शांतारामाच्या कांही तरी अंगांत आल्यासारखे झालें होतं. तो पुढे म्हणाला, " अहो जोशीबुवा, आम्ही **व्यवहार जगतों** आणि **काव्य लिहितों** ! आपल्या आयुष्याचं वैभव आणि श्रेय यांचीं ज्यांनी सदावर्तं घातलीं ते कवि—आमचं साधारण बरं चालल्यानंतर आम्ही घरीं चार वारकरी ठेवले—दोघांमध्येहि कल्पनेची ठिणगी एकच ! पण—"

" अहो शांताराम, ढगात चाललांत ! ढगात चाललांत ! बरं, अलीकडे आपण फारशा कविता करीत नाहीं ? "

" अलीकडे म्हणजे केव्हापासून ? माझं लग्न झाल्यापासून असं म्हणायचं आहे तुम्हांला ? "

" छेः छेः ! त्यानंतर तर तुम्ही पुष्कळच काव्यखंड लिहिलेत ! "

" मग अलीकडे म्हणजे केव्हापासून ? "

" तुम्हाला कन्यारत्न झाल्यापासून ! "

" हॉ ! हॉ !! हॉ !!! " शांताराम आठवले येवढ्या मोठ्यांदा हंसला की तें हसें त्याच्या चेहऱ्यावरहि मावत नव्हतें आणि त्याच्या आवाजालाहि झेपत नव्हतं !

" अगदी खरं ! अगदी खरं ! जोशीबुवा अगदी खरं ! मुलीला खेळवतांना—' मंगला ' तिचे नाव—काव्याशींच खेळल्यासारखं वाटतं मला ! पण इथहि मला वाटतं आमच्या आयुष्याचा सामान्यपणाच प्रतीत होतो ! आमचं आयुष्य,—अगदी काही म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर अभ्यास

केल्याची सार्वजनिक थाप मारीत नाही मी–पण खरखीत वाळवंटाप्रमाणेंच गेलं. आता ही जी वेल वाढीला लागली आहे—तिच्या भोवती गारव्याचं खळं करावं—तिच्या हास्यांनी आपण हसावं–तिच्या दु:खानं आपण दु:खी व्हावं–काव्य केल्यापेक्षां–काव्य जगल्यासारखं वाटतं त्यात! आता पुन्हा पाहा, हेंच मला माझ्या मुलीबद्दलच फक्त इतक्या जाणीवेनं आणि जिव्हाळ्यानं वाटतं. हा आमचा सामान्यपणा—आणि हेंचं सर्वांबद्दल वाटण तो खरा कवि!"

"शूक ऽ शूक ऽऽ शूक!!! माझ्या अभिजात कवींबद्दलच्या कल्पना निराळ्या आहेत! जो कवि फक्त स्त्री-जातीबद्दल—आणि त्याहि तरुण आणि सुंदर—जिव्हाळा दाखवील तो जातिवंत कवि! तिचे मुस्कारे जो ओकील तो युगप्रचारक कवी! चरणरेघा विनाकारण वापरील तो असामान्य कवी! कवी असण्यापेक्षा दिसण्याचा जो प्रयत्न करील तो अचाट कवी!" मी गंभीरपणाने बोलत होतो.

"तुम्हांला नेहमी गभीर गोष्टीची चेष्टा करण्याची सवय आहे! पण जोशीबुवा इतकं हें चांगलं नाही! अशी चेष्टा करण्यामागची तुमची चीड मला माहीत आहे. हिंदुस्थानांत सध्या फारशी असामान्य माणस नसताना—असामान्य, कर्तबगार माणसाचं सध्या जे जाहिरातींत पेव फुटलं आहे! जाहिरातींत वाङ्मय ओरपताहेत आणि वाङ्मयांत एकमेकांची तमाशेवजा जाहिरात चालविली आहे...!"

"बरं आपलं 'बीजांकुर' पुस्तक काय म्हणते आहे?"

"मला जितकं तं आवडलं—तितकं तें लोकांना आवडलेलं दिसत नाही—आणि त्या लोकांतच तुम्ही प्रमुख आहात......!"

ज्या एका विशिष्ट सुरांत मला शांताराम आठवलेची मुलाखत घ्यायची होती तें जमलेंच नाही. मला मुलाखतभर थट्टेखोर वातावरण ठेवायचें होतें! पण शांताराम पडला कवी—तो आपल्या भावनांचे सूर मधनं मधनं टेकायला लागला! मग मीहि मुलाखतीचा नाद सोडला आणि मनांत म्हटलें—पहिल्यांदा चहा प्यायला म्हणून जाऊन—मुलाखत घेऊन आलों आणि आता मुलाखत घेण्याचं निमित्त करून–शांताराम आठवलेचें शब्दचित्रच मुलाखत म्हणून काढूं!

मला शांताराम आठवले आवडतो तो त्याच्या कवितेपेक्षा—त्याच्या साध्या आणि निरुपद्रवी पण प्रामाणिक आयुष्याबद्दल!

माझे जे एक चार-दोन वाङ्मयस्नेही आहेत की जे माझ्या लेखनांतलें 'बरें' सांगण्यापेक्षा 'वाईट' अगोदर येऊन सांगतात—त्यांत शांताराम आठवले आहे! आम्ही एकमेकांच्या वाङ्मयाची पुष्कळ वेळेला खरी खोटी निंदा करतो—पण त्याचा आमच्या स्नेहावर परिणाम होत नाही!

शांताराम आठवले! एक साधा माणूस! कविता करतो—पण वृत्तीने फारसा कवि नाही!—त्याच्या लग्नाची केविलवाणी गंमत—

घरचें पाहाणारें कोणी नाही—सिनेमा कंपनींत नोकरी—आणि शिवाय कवि! त्याना मुलगी द्यायलाच्च कोणी तयार होईना!

—पण याहीमुळे तो समाजावर तडफडला नाही!

"लोकाचेंहि बरोबर आहे—!" त्या वेळीं तो मला म्हणाला होता, "अहो, मी जो धंदा करतो आणि जात सांगतो—त्यांचा अनुभव ऐकून लोकानी असं का वागं नये?—अहो, त्यांच्या मुलीच्या सबंध आयुष्याचा प्रश्न असतो त्याच्यांत! आणि त्याना तरी काय माहीत की, त्या जातींतील मी एक—सद्वर्तनाची आणि कल्पनांची धुमी पेटवून बसलो आहे म्हणून!"

त्यानी दारिद्र्यहि काढलं आहे—पण अभिमानी वृत्तीनं! आणि ते आज सुखी आहेत. पण आपल्या कर्तबगारीनं हें झालं आहे, असा त्यांचा भ्रम अजिबात नाही!

"चारित्र्य" या शब्दाला काही अर्थ आहे, असा माझ्याप्रमाणेंच त्यांचाहि गैरसमज आहे! आणि घडलेल्या चारित्र्याचा नकाशा काढून—आपल्या अपवादात्मक आयुष्याचा नियम म्हणून लोकांना सांगून—त्यांना खिजवायलाहि ते तयार नाहीत! आता त्यांना मराठी येत आहे हे सांगण्याची जरूरी नाही—पण त्या मराठी अक्षरांतील वेचक अक्षरं—विनाकारण एकापुढे एक ठेऊन—त्यांतून ते एखादा जगाला देण्याकरिता संदेशहि तयार करीत नाहीत!

—आणि फिल्म कंपनीत राहूनसुद्धा!

कारण आठवले हा वृत्तीने फिरता पारवा नसल्यामुळे—त्याचें सुख प्रभात कंपनीवर अवलंबून आहे—आणि प्रभात कंपनी एकच आहे—आणि तिला शांताराम आठवले पुरेसे आहेत!

शांताराम आठवले. बुद्धि आहे—भावना आहे—कर्तबगारीची लालसा आहे; पण त्या मानाने वाढायला जागा नाही—फोफावायला मार्ग नाही! आणि आजूबाजू खुरटवून स्वतःची उंची वाढवून घ्यायची ताकतहि नाही आणि इच्छाहि नाही! स्वतःला शोषणाऱ्या गारठ्यापुरती—विचारांची आणि आचारांची शेकोटी पेटवून बसलेला तो एक साधा जीव आहे! तो शेकत बसला आहे आणि कुणीहि ओळखीने आणि सलगीने यावें आणि शेकून जावें—जागतिक अपेक्षा आणि आकांक्षा काही नाहीत!

इतक्यात शांताराम आठवलेंचा गडी एक मोठी करंडी घेऊन तिथं आला आणि त्याने त्या रिकाम्या करंडींत टेबलावरचीं मोसंबीं-सत्रीं भरायला सुरुवात केली—"पत्नि जरा गांवीं गेली आहे, तिला पाठवितों—" असें म्हणून शांताराम ती करंडी शिवूं लागला. करंडी शिवण्यानेहि तो कवि दमला आणि घामेजला व नंतर हाश्य-हुश्य करीत शांताराम म्हणतो—

"काय, जोशीबुवा, चहा घेणार काय?"

मी मनात म्हटलें—सत्रीं मोसंबींहि गेलीं—मुलाखतीचेंहि शब्दचित्र झालें आणि वर हा गृहस्थ नुसत्या चहावर माझी बोळवण करणार. मी इसऱ्या चिडीनें म्हटलें, "चला बाहेर—आज तुझ्या घरात कोणी नाही—मीच तुला आज चहा आणि दही-मिसळ खायला घालतो—"

—आणि त्या दिवशीं मुलाखतीकरिता माझ्या खिशालाच चट्टा बसला!

संदू गोडबोले : : : ४


'काय म्हणतां, माझी मुलाखत घेणार?'' अंगात एक पट्ट्याचा गंजीफ्राक घातलेला आणि खाकी पंट घातलेला गृहस्थ माझ्यापुढं येऊन दंड थोपटीत म्हणाला.

तो गृहस्थ म्हणजे सदु गोडबोले हे आता मी सांगणार नाहीं—तें वाचकानीच ओळखावें.

'किती वेळ लागेल मुलाखतीला?—माझी अजून रोजची मेहनत व्हायची आहे—तेव्हा तुम्हाला थोडं थांबायला पाहिजे—पुन्हां यायला सवड नसेल तर आत्ता मी जोर बैठका काढतानाच तुम्हाला माझी मुलाखत घ्यावी लागेल!'

'म्हणजे मुलाखत द्यायला तुमची तयारी आहे ना!' मी साळसूद-पणाने विचारलें.

'आता तुम्हाला नाही कसं म्हणायचं जोशीबुवा?' सदु गोडबोलेहि साळसूदपणानेच म्हणाला. 'आणि जोशीबुवा, मुलाखत ही काय नाही म्हणण्यासारखी गोष्ट आहे होय? अहो; मुलाखतच काय—मुलाखतीच्या शेवटीं एक ओजस्वी संदेश—तुम्हाला—राष्ट्राला किंवा मातृभूमीला द्यायचा



* सदू गोडबोले

* सदु गोडबोले यांचें सबंध नांव सदाशिव गणेश गोडबोले असें आहे. पण त्यांच्या पेशाला अनुसरून " सदु गोडबोले " हेंच त्यांना बहुमानार्थी नांव वाटतें. वरचा त्यांचा फोटो कांही वर्षांपूर्वीचा आहे. त्या वेळीं सहज कौतुक म्हणून त्यांनी दाढी ठेऊन पाहिली होती. नंतर एकदां त्यांनी दाढी-सकट आपला फोटो काढून घेतला. फोटो निघाल्यानंतर अर्थात् त्यांना प्रत्यक्ष दाढी ठेवण्याचें कारणच उरलें नाही! सिनेमा कंपन्यांनी त्यांचें नांव

विचार आताच माझ्या मनांत आलें आहे!' एवढे म्हणतांना सदुभाऊंनी चार जोर काढले.

"पण—मी–राष्ट्रांनी किंवा मातृभूमीनी तो संदेश घेतला नाही तर?" मी शंका प्रदर्शित केली.

"—नाही घेनलात तर नशीब तुमचं! मी काय करणार त्याला! अहो, सिनेमाच्या हॅडबिलाचं नाही का–वाटणारा वाटीत जातो–घेणारा घेतो, वाचतो, नाही तर चुरगाळून फेकून देतो–पण म्हणून काय हॅडबिलाची किंमत कमी होते काय? मी असें अभिमानाने म्हणू शकतों कीं, सिनेमाच्या हॅडबिलापेक्षां 'संदेश' कोणच्याहि बाबतींत कमी नाही! बरं आज मुलाखतीकरितां आमची कशावरनं आठवण झाली तुम्हाला?—बाकी मला परवापासून उचकी लागली होती हं–तेव्हांच मला वाटलं कोणीतरी माझी सारखी आठवण काढतं आहे! आणि आता लक्षांत आलं बरं का—कालपरवाच्या माझ्या उचक्या थोड्या मोठ्या होत्या! बरोबरच आहे–नुसत्या आठवणीची उचकी निराळी आणि मुलाखतीची उचकी केव्हाहि मोठीच असणार! बरं जोशीबुवा, आपण माझीशी मुलाखत घ्यायचं ठरवलंत! असं काय वैशिष्ट्य वाटलं तुम्हाला माझ्यात?" सदूभाऊंनीं प्रांजळपणानें विचारलें.

प्राजळपणाला अर्थात् प्रांजळपणानेच उत्तर द्यायला पाहिजे, म्हणून मी म्हटलें, "त्याचं असं झालं–आपल्या कदाचित् पाहण्यांत आलं असेल. मी सह्याद्री मासिकांत 'अनौपचारिक मुलाखती' देत असतों आणि या महिन्याकरिता ज्या गृहस्थाची मुलाखत घ्यायची मी ठरवीलं होतं–तो अचानक

लक्षांत ठेवावें. व एखाद्या कंपनीस त्यांच्याकडे जाण्याची सदिच्छा झाल्यास "ही मुलाखत वाचून आपण आलों" असा अगत्यपूर्वक उल्लेख करावा. स्वतःच्या जीवनाला स्वतंत्र ओघ देण्याचें त्यांना आतापर्यंतच्या आंयुष्यात जमलेलें नाही; तरीहि गडी आनंदीत असतो. लोकमान्य टिळकांच्या खालोखाल यांना सेनापती बापटांबद्दल आदर आहे. व्यायामाच्या शिकवण्या करून हे वेळ काढतात!

गेला गावाला निघून—तें कळतांच मी थोडा काळजींत पडलों—पण शेवटीं ठरवलं——चला अगदींच कुणी नाही तर आपले सदू गोडबोले आहेतच!"

"जोशीबुवा जरा जपून बोला! अगदीच कुणी नाही म्हणून माझ्याकडे आलांत?——तुम्ही मला काय समजता?"

प्रश्नावरून सदूभाऊ रागात होते हें कोणालाहि कळेल.

मी खाली मान घालून म्हटलें, "तुम्हाला काय समजायचं आहे? मी तुम्हाला सदु गोडबोले समजतो! चूक नाहींना होत यात माझी काही?"

"——मग आत्ताच मुलाखत घेऊन चला! राहू द्या राहिला तर आमचा व्यायाम! नाही तर आम्ही थोडे आढेवेढे घ्यावे आणि तेवढ्यांत तुम्हाला कोणी तरी मुलाखत घ्यायला भेटावा—मग आमची मुलाखत जन्मभर पडून राह्यची! हं घ्या लिहून मुलाखत—!" सदुभाऊ थोरल्या शाहू महाराजा-सारखे बैठक मारून माझ्यापुढे बसत म्हणाले,

मी मुकाट्याने फाउन्टनपेन काढून लिहूं लागलों.

"हं——मी सदु गोडबोले——उमर वर्षे बेचाळीस. वजन पौंड ५०० (मोटारसायकल सकट), नुसतें १९० पौंड; वर्ण निमगोरा. कारणं मुलाखत लिहून देतों की—वास्तविक आम्हास मुलाखत देण्याची अजिबात जरूरी नाही. पण केवळ आपली अडचण ओळखून-थोडं मित्रकार्य करावें आणि जमल्यास फुकटात प्रसिद्धी पदरात पाडून घ्यावी ह्या उच्च हेतूनें प्रेरित होऊन मी ही मुलाखत आपणास देत आहे! एक लक्षांत ठेवणं की आम्हाजवळ शरीरबल आहे. एकवेळ कुस्त्याहि लढलों—खेळाडूहि आहोत—पण विद्वान् नाहीत!" माझ्याकडे करड्या नजरेने रोखून पाहात सदुभाऊ म्हणाले.

मी अजीजीने म्हटलें, "पण—आपण विद्वान् नाहीत—या खुलाशाची जरूरी काय सदूभाऊ? मला वाटतं तसा तुमच्याबद्दल कोणचाहि गैरसमज नाही!"

"तें मलाहि माहीत आहे हो! पण राजश्री, तसा गैरसमज कदाचित् माझी मुलाखत लिहितांना तुम्ही करून घ्याल हा धोका लक्षात घेऊन मी हा स्पष्ट खुलासा करीत आहे! कारण 'मुलाखतीपुरते' आम्ही मोठे—

कर्तबगार–आणि विद्वान् असावें–ही तुमची गरज असते! तेव्हा माझी मुलाखत मी देणार–तुम्ही नुसते मुकाट्याने लिहून घ्या!"

"पण सदुभाऊ, 'मुलाखत' प्रश्नोत्तरस्वरूपात लागते!"

"मग माझी कुठें हरकत आहे त्याला? मी आत्ता फक्त माझीं उत्तरें देऊन ठेवतों–त्याला लागणारे प्रश्न तुम्ही नंतर सावकाश तयार करा!"

नंतर एकदम चिडलेल्या बोक्यासारखा चेहरा करीत सदुभाऊ म्हणाले, "लेखक आहात का कोण आहात? लोकांबद्दल भलभलते गैरसमज पसरविण्याची तुम्हाला भयंकर खोड असते! सुमारें सहा वर्षांपूर्वी तुम्हा लोकांच्या या उपद्व्यापामुळे मी जवळ जवळ 'क्षयाच्या प्रथमावस्थेंत' होतो."

"बापरे! तुम्ही आणि क्षय?—कारण?" मी.

"त्या वेळीं मी अशाच मासिकांमधल्या मुलाखती वाचीत असें! आणि नंतर मी आपला झुरणीला लागलो—येवढ्या मोठ्या लोकांत आपण नगायचं कसं?–शेवटी जेव्हा माझ्या एका ओळखीच्याच माणसाची मुलाखत माझ्या वाचनात आली—तो माणूस मला पूर्ण माहीत—आणि त्याचीच साग्र संगीत मुलाखत मला वाचायला मिळाली—काय काव्य आणि कला होती हो त्या मुलाखतींत! मी माझ्या त्या ओळखीच्या माणसाकडे पाहिलें–मुलाखतीकडे पाहिलें—अहो कशाला कांही मेळ? तरी मला त्या तसल्या मुलाखती वाचून मधनं मधनं शंका यायचीच हं–कीं इतकीं दर महिन्याला मुलाखती घेण्याइतकीं मोठीं माणसं असतांना हिंदुस्थानच अद्याप बरं वाईट व्हायचं राहिलं कसं? आणि काय एक एक मुलाखतीचीं हेडिंग पहा, '**खानावळवाल्याचा गव्हर्नर कसा झाला?**' जोशीबुवा माझ्या मुलाखतीला हेडिंग घाला, '**ब्राह्मणी सदऱ्याची मुंडेल्लाट पैरण कशी झाली?**' दुसऱ्या एका मुलाखतींत वाचलं—'त्याला पन्नास रुपये पगार होता–पण साहेब त्यांच्यावर खूप होऊन त्याला एकदम साडेसातशे रुपये पगार केला!' वारे वा!—आमच्यावर साहेब खूप झाला असता तर आम्ही तो पगार घेतला नसता काय?" सदुभाऊ आता अगदीं खुशींत आले होते.

—आणि हा पहिलवान इतका–बोलेल अशी मला कल्पना नव्हती!

" एक सांगतो जोशीबुवा तुम्हाला—ही मुलाखत घेतलेली माणसें मुलाखतींत पाहिली—आणि त्या दृष्टीनें मुलाखत न घेतलेली माणसें पाहिली—तर असं वाटतं—एखाद्या लॉटरीचीं तिकीटं घेतलेल्या माणसांच्या यादींतून फक्त बक्षिस मिळालेल्या माणसांची निराळी यादी वाटते ती! कर्तबगार माणसें आहेत—त्यांचीं चरित्रेंहि सांगण्यासारखीं आहेत—पण त्याच्या मुलाखती इतक्या कलेंत बुचकळलेल्या असतात कां, त्यांतली कर्तबगारी किंवा विचार डोळ्यांत भरण्याऐवजी—वैभवाचें बेगड डोळ्यांत भरतं—आणि आटपाट नगरच्या राज्यांत जसे चमत्कार असतात—तशा त्या मुलाखती चमत्कारिक वाटतात!"

" सदुभाऊ, आपली मुलाखत भलत्या वाटेने चालली आहे असं नाही तुम्हाला वाटत?" मी विचारलें.

" पण हेंच लिहून घ्यायला पाहिजे तुम्ही! मुलाखतीसंबंधाने एका पैलवानाचीं मतं काय आहेत तें तरी कळू द्या एकदा लोकांना!" सदुभाऊ खुल्या दिलाने म्हणाले.


" बरं पण आपल्या आयुष्याबद्दल सांगाना कांहीं तरी?" मी विचारलें.

" तस सांगण्यासारखं माझ्या आयुष्यांत काही नाही बघा! म्हणजे मी माझ्या आयुष्याला कंटाळलो आहें किंवा माझ्या आयुष्यांत मी दुःखी आहें, असा अजिबात अर्थ नाही हं त्याचा! तसा मी माझ्या आयुष्यांत स्थिर आहें. आणि सेनापति बापट हें माझं दैवत आहे! थोडंसं उपमेंत सांगतों. गांवाच्या एकाद्या कोपऱ्यावर एक मोटा थोरला जुना वड असतो ना?—तसं माझं आयुष्य आहे बघा! या वडाचं, सदू गोडबोल्याचं वय आज बेचाळीस वर्षांचं आहे! लोक म्हणतात 'ताकत कमवा—ताकत कमवा!' कमावली ताकत! सांगा आता—काय करूं या ताकतीचं? वडाचीं पानें जशीं दुखल्या खुपल्यावर उपयोगी पडतात—तसे माझ्या आयुष्याचे कांही क्षण—अंगांतील ताकतीसुद्धा लोकांच्या उपयोगी पडतात! पण एखाद्याच्या मनाची एक ताठरवृत्ति असते—त्याला तडजोड माहीत नसते—किंवा जमत नाही! आणि तडजोडीशिवाय व्यावहारिक यश नाही!—व्यावहारिक वैभव नाही आणि सुखहि पण नाही! जगांतील सर्व व्यवहार म्हणजे तडजोड! राजकारण म्हणजे तडजोड! पक्ष म्हणजे तडजोड!

आज ‘ हा ’ या पक्षात कां आणि उद्या नेमका ‘ तोच ’ दुसऱ्या पक्षांत कां ?–याचं उत्तर तडजोड ! पण कांही आयुष्यें अशा तडजोडीला कबूल नसतात ! मग त्यांची हालचाल थंडावते आणि मग तशा माणसांचे माझ्यासारखे वटवृक्ष निर्माण होतात ! त्यांतले कांही वड लहान असतात, कांही मोठे असतात ! त्यामुळें आमची सर्वांकडे नजर असते; पण आम्हाला त्यांतल्या कशाबद्दलच तसा जिव्हाळा वाटत नाही ! म्हणूनच आम्ही असें परखड बोलूं शकतों ! ” सदु गोडबोले एवढे बोलून खिडकी-वाटे बाहेर आकाशाकडे पाहूं लागला !

आरशाचा कवडासा तोंडावर पडल्यामुळे जशी आपल्या चेहेऱ्याची चलबिचल होते, त्याप्रमाणें आभाळाचा कवडासा सदुभाऊंच्या तोंडावर पडल्यासारखें मला वाटलें. त्यांनी आपले दोन्ही ओठ थोडेसे दाताखाली मुरडून घेतल्यासारखे केले आणि थोडेसे अडखळत म्हणाले, “ जोशीबुवा, माणसाचें जीवन म्हणजे वस्त्राचे उभे धागे–पण परिस्थितीचे आडवे धागे ज्या किमतीचे येतील–त्याप्रमाणें वस्त्राला मोल आणि किंमत येणार ! माणसानं स्वच्छ आणि तयार असणं एवढीच फक्त माणसाची कर्तबगारी ! समजा, योगायोगानं आयुष्याचं वस्त्र विणलं गेलं नाही, तरी हताश किंवा उदास व्हायचें कारण नाही ! सगळ्याच गारगोट्या कांही एकमेकांवर घासून त्यातून ठिणग्या पडत नाहीत ! ” कारण नसतांनाच एवढं बोलून सदुभाऊ एकदोन मिनिटें थांबले आणि म्हणाले “ मध्यंतरी मलाहि माझं आयुष्य थोडंसं भकास वाटायला लागलं होतं—म्हणून मी कांही पायीं—रेल्वेनं अशा खूप यात्रा केल्या—त्यामुळें एक फायदा झाला. स्वतःबद्दल थोडंसं जे भकास वाटत होतं—त्याला थोडी उदात्ततेची छटा आली ! ”

सदुभाऊंच्या खोलीत सेनापती बापटाची एक मोठी तजबीर प्रामुख्याने दिसत होती; त्या तसबिरीजवळ सदुभाऊ कांहीसे आवेगानं गेले—जवळ-च्याच एका फडक्याने त्यानी तसबिरीवरची ‘ होती नव्हती ’ इतक्याच स्वरूपांतली धूळ पुसली आणि जणुं त्या तसबिरीला आलिंगन देण्याच्या आवेशाने त्या तसबिरीच्या भिंतीवर आपुलकीने आपल्या दोन्ही हाताचे पंजे टेकले आणि ते म्हणाले, “ जोशीबुवा, प्रवासांत एखाद्या डोंगराचा एखादा एकाकी सुळका दिसावा ना—तसं सेनापति बापटांच्या आयुष्याकडे



सिनेमा सृष्टींतला रावण !

[सदुभाऊ गोडबोले यांनी सिनेमांत एकदांच काम केलें; पण तेवढ्यांत त्यांनी आपल्याबद्दल असा दरारा निर्माण केला की पुनः त्या बाबतींत त्यांच्या कोणीहि वाटेस जाऊं शकलें नाही !]

पाहून वाटतं—नाही? सैन्याशिवायचा सेनापति! व्यावहारिक तडजोड जमलीच नाही त्यांना आयुष्यात!"

आणि मग एकदम धाडधाड पाऊस पडून जाऊन एकदम ऊन पडून उकडायला लागावें अशी सदुभाऊंची वृत्ति निर्माण झाली!

सदुभाऊंनी आपल्या भाषणाचा रागरंग एकदम बदलला. घरांतल्या एखाद्या खिडकींतून वारा जास्त यायला लागला म्हणजे जशी आपण ती खिडकी लावून घेतो, त्याप्रमाणें सदुभाऊनी तें तसलें सभाषण अजीबात बंद केलें. आणि एकदम हसत्याखेळत्या सुरात माझ्या खांद्यावर हात टाकीत ते म्हणाले, "मधे जोशीबुवा आम्ही एकदां सिनेमा कंपनींत काम केलं होतं—काही 'रावणाचं' कथानक होत वाटतं!"

"अस्सं! मग आपण कसलं त्यात मंदोदरीचं काम केलं होतंत काय?" मी आपला अदमास दाखवीत म्हटलें.

"काय जोशीबुवा. वाः! वाः!! मंदोदरीचं काम आणि मी?" सदुभाऊ उद्गारले.

"का? अशक्य काय आहे त्यात?" मी अभिमानानें म्हटलें, "सिनेमा सृष्टीत ट्रिक सीन असतात ना? तशी तुमच्या बाबतींत कंपनी-नंहि कांही 'ट्रिक' केली असेल!"

"नाही मी खुद्द रावणाचंच काम केलं होतं!" सदुभाऊ लीन-पणानें म्हणाले.

"बरं, मला असं सांगा, तुमची आणि कंपनीची गाठ पडली म्हणून कंपनीनं 'रावणाचा' चित्रपट घेतला का चित्रपटात 'रावण' सांपडला म्हणून कंपनीनें तुमचा शोध केला?" मी गांभीर्यानें विचारलें.

"हा प्रश्न मंजूर नाही! दुसरा प्रश्न विचारा" सदुभाऊंनी हमरी-तुमरीनें म्हटलें.

"बरं मग; मी आता माझ्याच जिव्हाळ्याचा प्रश्न विचारतों तुम्हाला! माझ्या प्रकाशनापैकीं कोणचीं पुस्तकें आवडतात तुम्हांला?"

सदुभाऊंनी आपली ट्रंक उघडली आणि त्यांतून मळकीं आणि खराब झालेलीं चार पुस्तकें बाहेर काढली; त्यांची यादी खालीलप्रमाणें होती.—

(१) **राजबंदी**—लेखक डॉ. गोवडे किमत १॥ रुपया (२) **चुटके आणि चमत्कार** लेखक पु. रा. भिडे किमत फक्त १० आणे. (३) **बलिदान** (कादंबरी) लेखक—तात्यासाहेब केळकर कि. २ रुपये. (४) **आनंदीबाई पेशवे** (चरित्र) लेखक—चिं. ग. कर्वे किमत ६ आणे.

"बरं काय हो सदुभाऊ? हीच पुस्तकें तुम्हांला कां आवडली?" मी विचारलें.

"बाकीचीं तुम्ही आम्हाला दिली नाहीत म्हणून!—मग केव्हां येऊं आता तुमच्याकडे?" सदुभाऊ फारच आपुलकी दाखवायला लागले.

"सध्याच नको—मी आता जरा वर्ष दोन वर्ष गावाला जाणार आहें! "—बरं तें असू द्या; पण तुमचीं राजकारणात मतं काय आहेत?" केवढा गंभीर प्रश्न!

पण माझा तो प्रश्न ऐकून सदुभाऊ ताडकन् उठून उभे राहिले आणि म्हणाले "मतं? मतं? आता कुठे शिल्लक आहेत आमच्याजवळ मतं? आमच्या जवळ होतीं नव्हतीं तीं मतं आम्ही परवाच्याच इलेक्शनमध्यें देऊन टाकलीं की!"

"बर आपला आहार काय?" जीविताचा प्रश्न.

"तुम्हाला काय करायचं आहे त्याच्याशी? माझ्यासारखा आहार ठेवून काय पैलवान व्हायचं आहे तुम्हाला? तस असेल तर अगोदर रोज इथें नेमानं येऊन मेहनत करा—मग सांगेन काय आहार ठेवायचा तो—"

"अहो, हा प्रश्न मी स्वार्थाने विचारीत नाही! केवळ लोककल्याणाकरिता!"

"—ज्यांना जरूर असेल ते सरळ माझ्याकडे येतील—त्याला तुमची मध्यस्थी कशाला? आणि गांवोगांवीं—शहरोशहरी—खेडोखेडीं—सदू गोडबोले काय कमी आहेत होय? सगळं ज्ञान आणि विद्वत्ता वाङ्मयांत ओतून टाकली तर मग माणसांचं काय काम? मी तुम्हां लेखक लोकांचं पाहून ठेवलंय—तुमची कृति थोडी आणि मचमचच फार!"

आणि अशीं उत्तरें यायला लागल्यानंतर मुलाखत संपविणें क्रमप्राप्तच नव्हतें काय?

मी उठलो. सदुभाऊंना अदबीने नमस्कार केला. त्यांनीहि 'सलाम आलेकुम्!' म्हणून थोड्याशा हेटाळणीनं माझ्या नमस्काराची परतफेड केली.

"बरं सदुभाऊ, आम्ही येवढी तुमची मुलाखत घेतली. मुलाखतीचं एक तंत्र अस आहे कीं, त्यांत मुलाखत घेणाऱ्याच्या जन्मभर लक्षांत राहील असं कांही घडावं लागतं. पण त्यातहि आम्ही तुम्हांला सवलत देतों. आम्हाला नुसता चहा आणि खारीं बिस्किटं यांचा खुराक द्या, आम्ही त्याचीच जन्मभर आठवण ठेवूं!" मी आपुलकीने म्हटलें.

"माझें घर म्हणजे काय 'खुराक' मिळण्याचें ठिकाण वाटलें काय तुम्हांला? येथें खुराक वगैरे कांही नाही? अजीर्ण झालें असेल तर जोर काढायला लावतों इथे म्हणजे पचन होऊन ढेकरा येतील तुम्हांला अन मग त्याचीच आठवण ठेवा जन्मभर! किवा अंग दुखत असेल तर पाठ चेपूं का जरा?" सदुभाऊ आपल्या धंद्याच्या तंद्रींत म्हणाले.

"नको, पाठ दुखायला लागेल माझी विनाकारण—!"

सदुभाऊ लगेच शंकित स्वराने म्हणाले, "पण काय हो, ही मुलाखत खरंच छापून येणार का? पण जर येणार असेल तर मी दिली अशीच अक्षरन् अक्षर आली पाहिजे हं—जर साफसफाई करण्याच्या मिशानं—आणखी कांही दडपलंत किवा यांतलं कांही कमी केलंत—तर एका पैलवानाशीं गांठ आहे येवढं लक्षात असूं द्या!" दंड थोपटल्याचा आवाज.

"ठीक आहे!" मी म्हटलं. माझ्या मुलाखतीचीं ठरीव पानें भरली होतीं त्यामुळे ताडकन् उठून मी सदुभाऊंच्या खोलींतून बाहेर पडलों. आणि सदुभाऊंनी हांक मारलीच तर पुनः परत येण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून झपझप पावलें टाकीत मी जिना उतरलो.

पण—!

मी खाली येऊन उभा राहून बुटांत अडकलेला खडा काढण्याच्या नादांत होतों तोंच वरची सदुभाऊंची खोली धाडकन् लावल्याचा आवाज झाला, धाडधाड जिनाहि वाजला आणि माझ्या खांद्यावर अचानक दोन

जड हात येऊन पडले. आणि हसत हसत आवाज आला, "अहो जोशी-बुवा, संदेश द्यायचा राहिलाच की!"

मी कपाळावर हात मारीत केविलवाणेपणाने म्हटलें, "आता संदेश नको बुवा. नुसती मुलाखतच दणदणीत झाली आहे-त्यात आता आणखी 'संदेशाची' अडगळ कशाला?"

"अडगळ म्हणा—घाण म्हणा—काय वाटेल तें म्हणा—मी संदेश देणार आणि तो माझ्या मुलाखतीत यायलाच पाहिजे! पण 'संदेश' मात्र तुम्ही सांगाल तितक्या ओळींचा देतो—बोला किती ओळींचा 'संदेश' देऊं?"

"आता इतका आग्रह केल्यानंतर नाही म्हणायचंहि जिवावर येत आहे माझ्या! बर, द्या आता संदेश—पण तो जास्तीत जास्त अडीच किंवा तीन इंच लांबीच्यावर असता कामा नये!"

"हात्तिच्या! अडीच तीन इंचात काय वाटेल तें सांगता येईल."

"पण काय वाटेल तें मात्र सांगू नका हं!" मी शब्दाची उलटापालट करून पाहिली.

"याला काय कोटी म्हणायचं काहो जोशीबुवा?" सदुभाऊ उद्गारले.

"या प्रश्नानं—संदेशातली $\frac{1}{10}$ इंच कमी झाली हं!" मी सूचना दिली.

"तुम्ही असं बोलल्यानंतर मी हसायला पाहिजे असेल!" सदुभाऊ खोटं हसत म्हणाले.

"हं हंसा—पण संदेश लौकर द्या!"

"मी परवाच एक मोटार सायकल विकत घेतली आहे!"

"संदेश—!" मी ओरडलों.

"संदेशावरचंच पॅकिंग आहे हें—तें सोडल्याशिवाय संदेश कसा आतून बाहेर येणार?"


"ठीक आहे—!" माझा इलाजच नव्हता.

"ती मोटारसायकल मूळ सोळाशें रुपयांची, पण मी साडेआठशेंला घेतली!"

"आपण फार व्यवहारकुशल आहांत!"

"ती मोटारसायकल चालायला फार चांगली आहे!"

"त्याच्या पाठीमागं माणसाचें कॅरियर आहे काय?"



" आहे ! "

" मग आम्हांला तेवढं घरीं पोहोंचवा की ! "

" ती सायकल मी फक्त संध्याकाळींच बाहेर काढतों ! "

" ठीक आहे. आपली सदिच्छा कळली ! "

आणि नंतर एकदम सदुभाऊंना कसला रागाचा झटका आला कुणास ठाऊक. त्यांनी झटकन् आपली मोटारसायकल बाहेर काढली–तिच्यावर ते रुबाबांत आरूढ झाले, त्यांनी सायकल 'स्टार्ट' केली आणि गाडी चालू झाली. जातांना त्यांनी मला आदबीनें 'रामराम' ही केला.

सदुभाऊ माझ्या दृष्टिपथांतून नाहीसे होईपर्यंत मी त्यांच्याकडे पाहात होतों. मोटारसायकलचा धूर—आवाज—आणि त्यांच्यातूनच खालील शब्द माझ्या कानावर आले--

" जोशीबुवा, माझी मुलाखत छापली नाहीत तरी चालेल ! 'सह्याद्री' मासिकांतल्या आपल्या गेल्या दोन्ही अंकांतील मुलाखती मी वाचलेल्या आहेत ! आम्हीहि तुमच्यापेक्षां कमी नाहीत हें दाखविण्याकरिता मी अशी मुलाखत दिली ! पण माझ्या दृष्टीने मोटारसायकल आणि मुलाखत यांची किंमत एकच ! हें सुद्धां फार होतं आहे–मोटारसायकलचा हॉर्न आणि मुलाखत याचीच बरोबरी होईल ! मुलाखतीचा मुख्य उद्देश लोकाना आपल्याकडे पाह्यला लावणें ! तें काम रस्त्यात नुसतं 'हॉर्न' वाजवीत फिरल्यानेहि होईल ! आणि माझ्याजवळ तर संबंध मोटारसायकल आहे—आणि शिवाय व्यायाम ! अच्छा ! राम–राम !! "

रंगा सोहनी : : : ५


"या—या या—" मी उत्साहाने हाक मारली. संध्याकाळची सहा साडे-सहाची वेळ होती ती. आणि आपला एखादा दिवस कांहीतरी चमत्कारिक जातो—त्या दिवशीं सबंध दिवसांत मी कुठे बाहेर पडलों नव्हतों आणि माझ्याकडेहि सबंध दिवसात कोणी आलें नव्हतं. त्यामुळे तीं तीन माणसें माझ्याकडे येतांना दिसतांच "या—या—या" म्हणून मी अत्यंत उत्साहाने हाक मारली.

—आणि तीं तीन माणसंहि खुशींत हसत हसतच माझ्या "य. गो. जोशी प्रकाशन कार्यालय" ऊर्फ दोन खणाच्या खोलींत आली.

—त्यांपैकीं एक श्री. माधवराव गद्रे* हे माझे स्नेही होते आणि त्यांच्याबरोबर आलेली दोन माणसें माझ्या अजिबात ओळखीचीं नव्हतीं!

---

* यांची मुलाखत पुढे येण्याचा संभव आहे.



श्री. रंगा सोहनी

तीं दोनहि माणसें होतीं तरुणच. त्यांतील एक सुमारें तेवीस चोवीस वर्षांचा होता–आणि दुसरा आठावीस एकोणतीस वर्षांचा दिसत होता. दोन्हीहि माणसें हसतमुख दिसत होती.

—त्यांतील वयाने तेवीस चोवीस वर्षांचा जो तरुण होता, तो गोरापान आणि बांधेसूद दिसत होता. त्याचा चेहराहि स्मितयुक्त हासरा होता आणि दुसऱ्याचा नुसताच हसरा होता!

"हं. काय म्हणताहेत तुमच्या सह्याद्रींतल्या अनौपचारिक मुलाखती?" माधवराव गद्र्यांनीं मला हसत हसतच विचारलें.

"ठीक म्हणताहेत! कांहीना त्या चांगल्या वाटतात. कांहीना भिकार वाटतात! कांहीची तक्रार माणसांबद्दलच आहे! त्यांना वाटतें हीं माणसें मी काय हुडकून काढिलीं? माझ्यासारख्यांनी म्हणजे वास्तविक 'हिटलर, मुसोलिनी, डी. व्हॅलेरा' यांच्या मुलाखती घ्याव्यात—आणि तुम्हीहि जाणतांच की मी मनात आणलं तर मलाहि तें अशक्य आहे असं नाही! पण माझी एक मनोवृत्ति अशी आहे की, होता होईल तों कुणाच्या धंद्यांत आड यायचं नाही! म्हणून मुलाखत घेण्यासारखी मोठीं माणसें—हा मुलाखतींचा धंदा ज्यानी उर्जितावस्थेस आणला त्यांच्याकरितां मी राखून ठेविलीं आहेत! मी मुलाखतींकरिता माणसें निवडणार तीं माझ्या बरोबरीचीं!—बरं, आज इकडे कुठे तुम्ही?"

"म्हटल—आपल्याहि मुलाखतीची वर्णी लागली तर पाहावी म्हणून आलो!" माधवराव गद्र्यानी म्हटलें.

"बरं, थट्टा जाऊं द्या! आमच्या कामाचं काय केलंत? सोहोनींची आणि आमची केव्हा ओळख करून देणार?—या महिन्याला त्यांचीच मुलाखत घ्यायची मी ठरविल आहे!" मी म्हटलें.

"नाही; ठरविलत, तें ठीक केलंत—पण पुन्हा त्याबद्दल आपण कांही चौकशी केलीत का?—ही तुमची काम सांगण्याची पद्धत चांगली आहे—तुमच्या काम सांगण्याच्या या तुफानी वृत्तीमुळे तुम्हांला गरज कितपत आहे हेंहि आमच्या लक्षांत येत नाही!" माधवराव गद्रे म्हणाले.

"वा! वा! हें फार चागलं हं माधवराव,तुमच्याबद्दलच्या खात्रीनं आम्ही बेफिकीर राहतो! मी जर खरा भाग्यवान् असेन तर माझ्या स्नेह्यासोबत्याच्या बाबतींत!"

"पण त्यामुळे आम्हांला फार त्रास होतो ना—रंगा सोहनीला मी आज चार दिवस सांगतों आहे, आम्ही तुमच्याकडे येतां म्हणून—पण आपला पत्ता काय?—आणि दुसरं—मी परवा रंगा सोहनीजवळ बोललों; त्याला असली अनौपचारिक मुलाखत आवडेल असं मला वाटल नाही!"

"अहो आवडेल हो! त्याला एकदा घेऊन तर या माझ्याकडे!" मी आत्मविश्वासाने म्हटलें.

"वा! वा! माझ्या ओळखीचा इतका नाही हं फायदा घेऊं देणार! तुम्ही त्याच्या घरीं आलं पाहिजे—तो नाही तुमच्याकडे यायचा! जसं कांही तुम्ही त्याची मुलाखत घेतली नाहीत—तर त्याची मुलाखत कुठे यायचीच नाही!" माधवराव गद्रे.

"—अहो लाख मुलाखती येतील—पण माझ्या मुलाखतीची मजा येणार आहे का त्याना?"

"पुरे पुरे! मग तुम्ही आपला दुसरा क्रिकेटियर पहा! आमचा सोहोनी आपणहून तुमच्याकडे कधीच यायचा नाही!" माधवराव गद्रे जरा रुबा-बांतच म्हणाले.

"ठीक आहे. मग पैज तुमची आमची! मी रंगा सोहनीचीच मुलाखत घेणार—आणि त्याला इथे बोलावून घेणार! माझीहि त्यांच्या घरीं यायला बिलकूल हरकत नाही—पण ऊन कोण आहे सध्या?"

"—आणि त्याला नाही वाटतं?"

"अहो पण तो तरुण आहे—खेळाडू आहे—पाच पाच तास उन्हात खेळत असतात ते!" माझं आणि गद्रे यांचें बोलणं चाललें होतें—आणि त्याच्याबरोबर आलेली ती दोन तरुण माणसं थोडी कुचमल्यासारखींच बसली होतीं. तेव्हां मी म्हटलें, "अहो गद्रे, शिष्टाचार विसरलां का आपण दोघेहि—याची ओळख नाहीं करून दिलीत—"

माधवराव गद्रे मोठ्यादा मनमोकळेपणानें हसत म्हणाले, "बरीच लौकर आठवण झाली तुम्हाला—हे भालचंद्र सोहनी—रंगा सोहनीचे वडील भाऊ—आणि हे—" गद्र्यांनी माझ्याकडे मिस्किलपणानें हसत पाहात म्हटले "महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध क्रिकेटियर रंगा सोहनी! बरं आहे जोशीबुवा, आम्ही जातों आता—आम्हांला काम आहे—तुमच्या मुलाखतींत आम्ही कशाला विनाकारण—?" आणि येवढें म्हणून माधवराव गद्रे व भालचंद्र सोहनी माझ्या खोलीतून बाहेर पडले.

"अहो माधवराव—" रंगा सोहनी.

—पण तीं दोनहि माणसें सायकलस्वार होऊन दिसेनाशीं झाली!

रंगा सोहनी आणि मी एकमेकांकडे पाहूं लागलो—हसूं लागलों.

—मला वाटलें माझ्या या मुलाखतीची सुरवात भलतीच अनौपचारिक झाली !

—मी त्या तरुणाकडे किंचित् शंकेखोरपणानें पाहूं लागलों. रंगा सोहनीचा कुठे तरी फोटो पाहिल्याचें मला आठवलें आणि नंतर तो फोटो आठवून मी त्या तरुणाकडे पाह्यला लागलों—शंकाच उरली नाही—तो रंगा सोहनीच होता !

मी एकदम त्या तरुणाचा—पण आता तसें कशाला ? रंगा सोहनीचा—हात आपल्या हातांत घेत म्हटलें,

" हॅलो ऽ ! सोहनी—माझी खूप मजा केलीत बुवा तुम्ही ! "

"—आमच्या माधवराव गद्र्यांनी मला सांगितलं—तुम्ही माझी मुलाखत घेणार आहांत—आणि खरं सांगूं, मला सह्याद्रींत तुम्ही घेतलेल्या तीनहि मुलाखती आवडल्या. " सोहनींनी आपल्या पद्धतीनें सावकाशपणें व धीमेपणानें म्हटलें. जणुं काय धीमेपणानें ते एकेक धावच काढीत होते.

" माझ्या तिन्ही मुलाखती तुम्हांला आवडल्या ? किती चांगले आहात हो तुम्ही ? पण सोहनी, तुम्ही असे आपणहून अकल्पित याल—मला या घटनेचा कमालीचा आनंद झाला आहे. पण—" सोहनीचें कौतुक कोणत्या शब्दांनी करावें हें माझें मलाच कळेना ?

" माझी मुलाखत तुम्ही नक्की घ्यायची टरवलं आहेत हें कळलं मला. बरं,तुमची माझी अद्याप ओळख नाही—तेव्हा कोणी तरी कोणाकडे जायचेंच ना ? " मध्येच एखादी ' मेडन ' ओव्हर खेळावी त्याप्रमाणें सोहनी मधें एक मिनिटभर नुसतेच हसले—आणि म्हणाले, " तेव्हा मी मनांत विचार केला—मी वयानें तुमच्यापेक्षा लहान आहें, तेव्हा आपणच उठून याव तुमच्याकडे ! "

—आणि नंतर आमचा चहा वगैरे झाला.

" बरं सोहनी, आता एक गंमत दाखवतों तुम्हाला—मी आज उद्याच तुमच्याकडे येणार होतो. आणि साधारण अदमासानें मी तुमची मुलाखत लिहून ठेविली आहे—ती तुम्हांला वाचून दाखवितों—आणि त्यात प्रत्यक्ष माहितीच्या अभावीं जर कांही भलतं लिहिलं गेलं असेल तर तेवढं आता तुमच्याकडून बरोबर करून घेतों—"

तें ऐकून सोहनी माझ्याकडे आश्चर्यचकित मुद्रेने पाहूं लागले.—भेटी आधीच मुलाखत ?

पण मी आपली मनांत समजूत करून घेतली की, माझ्या या अगाऊ कर्तबगारीने सोहनींचा माझ्याविषयीचा आदर वाढलाच असला पाहिजे !

—मी मुलाखत वाचूं लागलो.

"...

.........................तो विजयी वीर म्हणजे श्रीरंग सोहनी !

रंगा सोहनी याचा जन्म.........रोजीं गांवीं झाला !" मी मध्येच थोडा थांबलों आणि माझ्या खिशांतलें फाउन्टन पेन काढून हातीं घेत रंगा सोहनींना विचारले, "हं सोहनी, सांगा कोणत्या साली आणि कुठे तुमचा जन्म झाला ? म्हणजे मध्ये सोडलेली तेवढी रिकामी जागा भरून टाकतो !"

"मला वाटतं आपण असं करूं—" रंगा सोहनी माझ्याकडे मिस्किलपणाने पाहात हसत म्हणाले, "मुलाखत एकदां आपण सबंध वाचूं आणि मग नंतर सगळ्या गॅप्स् भरूं !"

मलाहि ती सूचना आवडली. आणि हातांतील फाउन्टन पेन टेबलावर ठेवीत मी मुलाखत पुढे वाचूं लागलो, "—रंगा सोहनी याचें बालपण अगदी दारिद्र्यांत गेलें. ते आपल्या आई—वडिलांना एकुलते एक होते. वडिलांना वाटे ह्या आपल्या एकुलत्या एक मुलाने नीट अभ्यास करून लौकरच आपल्या संसाराला हातभार लावावा—पण श्रीरंग सोहनी यास शाळेंत असतानाच चेंडूफळीच्या खेळाचा नाद लागला.

"—पण घरच्या दारिद्र्यामुळे त्यास चेंडू, बॅट वगैरे सामान कसें मेळणार ?

"—पण तसल्या अडचणींस लहानग्या श्रीरंगाने बिलकुल जुमानलें नाही. त्याने मोडक्या तोडक्या देवदारी फळीचीच बॅट करावी—रॉकेलचा रिकामा जुना डबा स्टंप्स् म्हणून ठेवावा—आणि गल्लीतील चार पोरें जमा करून क्रिकेटचा खेळ खेळावा !

"—आपल्या आई वडिलास न जुमानतां बिचाऱ्या श्रीरंग सोहनीने आपला नाद टिकविला म्हणूनच महाराष्ट्राला आज शेंकडो हमखास धांवा काढणारा रंगा सोहनी हा अभिमानास्पद क्रिकेटपटु मिळाला !

" या उदाहरणावरून आई वडिलाचें न ऐकणें देशाला किती फायदेशीर ठरतें याची बालवाचकांनी मनाशीं खूणगांठ बाधावी !

"—आणि सोहनींच्या राजकोटच्या त्या बिनबाद २१८ धावा !"

सोहनींना मी मुद्दाम विश्वासात घेऊन विचारलें, " कांहो सोहनी, राजकोटला ज्या आपण दोनशें अठरा धावा काढल्यात त्याचें कांही विशेष टेक्नीक आहे काय ?"

माझ्या या मार्मिक प्रश्नानें सोहनीहि जरा खुलून म्हणाले, " हीच गोष्ट मला जो तो विचारतो;पण मी अद्याप कोणालाहि त्याचे उत्तर दिलें नाही. अगदी तुम्ही अस समजा की, तुमच्या या मुलाखतीकरिता हा मुद्दा मी राखून ठेविला होता. त्याचं असं असतं—"

" बरं—" मी उत्सुकतेने किलकिले डोळे करीत सोहनींकडे पाहूं लागलों.

" पण एक करा हं—हें बोलूं नका कुणाजवळ—मुलाखतीत छापलंत तरी हरकत नाही—पण बोलूं नका कुणाजवळ.—ज्या वेळेला अशा धावा काढायच्या असतील—त्या वेळेला फक्त एक सावधगिरी घ्यायची. औट व्हायचं नाही ! येवढी सावधगिरी घेतली की, आपोआप धावा होतात पहा !"

" अरे वा !" मी खूप्र होऊन म्हटलें, " पण काय हो सोहनी, ज्या वेळीं तुम्ही अशा आणि इतक्या धावा काढता त्या वेळीं त्या तुम्ही स्वतः-करिता म्हणून काढता का महाराष्ट्रदेशाकरिता म्हणून काढतां ?"

यावर सोहनी हसत म्हणाले, " यशवंतराव,—महाराष्ट्र म्हणजे काय तुम्ही एखादा नादारीचा विद्यार्थी समजता काय ?—की त्याला कुणी पुस्तकें घेऊन द्यावींत—फी द्यावी आणि त्याच्या नावलौकिकाकरिता कोणी धावाहि काढून द्याव्यात ?"


" बरं, इतक्या धावा त्या सामन्यांत तुम्ही काढणार असें तुम्हांला केव्हां वाटलें ?"

" अर्थात् धावा काढून झाल्यानतर !" सोहनी बेगुमानपणानें म्हणाले.

" बरं सोहनी, आता आपलं सहज विचारून ठेवतों—आमचं एक काम कराल का ?"

" काय ?"

" माझ्या मुलाला क्रिकेट शिकवाल काय ?"



महाराष्ट्राचे भावी क्रिकेटर मन्या जोशी

" जरूर ! काय करतो तुमचा मुलगा ? "

" अगदी हूड आहे तो. शाळेंत जात नाही ! "

" मग तो क्रिकेटकरिताच जन्माला आला आहे असं तुम्ही समजा ! बरं आता घरांत असला तर हांक मारा ना त्याला—फिगर पाहून ठेवलेली असावी ! "

" थांबा घेऊन येतों हं त्याला ! " मी म्हटलें.

" कां, इथून हाक मारून नाही का यायचा तो ! "

" हाक मारून येण्याइतका का सीधा मुलगा आहे तो. अहो अजून मुळी सहा महिन्याचाच आहे ! "

" अस्सं ! मग त्याला क्रिकेट शिकवावं असं आताच कां वाटायला लागलं तुम्हाला ? "

" त्याचीं लक्षणं दिसतात ना तशीं–आतापासूनच ! अहो, मी परवाच त्याचा फोटो काढला–फोटो काढतांना तो कांही स्थिर राहिना–तेव्हां त्याने स्वस्थ राहावें म्हणून फोटोग्राफरने त्याच्या हातात छोटा कॅमेरा दिला– आणि काय त्याने 'पोजमध्ये कॅमेरा' धरला आहे पाहा ! त्या वेळेला तुमची मुलाखत घ्यायची माझी कल्पना होतीच–तेव्हा मला पटकन् वाटलें कीं स्वतःच सेंचरी काढून स्वतःच त्याचा ऐटीने फोटो घ्यावा–अशा ऐटींत तो बसला आहे ! "

सोहनी हसले !–ते तरी दुसरें काय करणार ?

" येवढ्यावरनंच म्हणत नाही हं मी–तो क्रिकेटियर होईल हें मला निराळ्याच मुद्यावरून वाटतं आहे–तेंहि तुमची उत्सुकता न वाढवितां लगेच तुम्हांला सागतों–तुमचं नांव 'रंगा' पण लोक लाडांत येऊन तुम्हांला 'रंग्या सोहनी' म्हणतातच ना ? तसं माझ्या मुलाचं नांव आहे मनोहर–रंगाचं जसं 'रंग्या' तसें मनोहरच नेमक 'मन्या' होतं का नाही पहा–तेव्हा ! बरं तें जाऊं द्या. सोहनी, तुम्ही प्रयत्न केला नसेल कधी– पण क्रिकेट खेळतांना तुम्हांला कधी काव्यमय कल्पना सुचतात कां हो ? "

सोहोनी म्हणाले, "कधी कधी सुचतात ! एकदा मला वाटलें, क्रिकेटचा खेळ किती तात्त्विक आहे पहा ! दिवस रात्रीच्या स्टंप्स् दोन्ही बाजूला ठोकलेल्या आहेत–काळ बोलिंग टाकतो आहे–आणि प्राणिमात्र जितक्या दिवसांच्या धावा जास्त काढतां येतील तेवढ्या काढून नंतर स्वर्गरूपी पॅव्हिलियनमध्ये–पण खेळ चालू असतांना अलीकडे तल्यारखान हकीगत सांगत असतो, त्यालाच फक्त उपमा सांपडली नाही मला ! "

" वाः वाः ! सोहनी, बरं क्रिकेटमधली आपली एखादी चमत्कारिक आठवण सांगाल काय ? "

" एक आठवण शाळेंतील आहे. कुणाबरोबर तरी आमची मॅच ठरली होती. ती मॅच थोडीशी चुरशीची होती–आमचा जय व्हावा ही तर माझी

इच्छा होतीच; पण माझा वैयक्तिक स्कोअर त्यांत जास्त व्हावा ही माझी इच्छा. कुणाच्या सांगण्यावरून ते आता आठवत नाही मला—पण खेळा-यला जाण्यापूर्वी आम्ही एक दगडाचा म्हसोबा तयार केला आणि त्याच्या शेजारीं एक फाटकी वहाण ठेविली आणि त्या म्हसोबाला नवस केला की, जर माझ्या नेहमीपेक्षा जास्त धावा निघाल्या तर ठीक आहे; नाही तर खेळ सपल्यानंतर या शेजारीं ठेवलेल्या फाटक्या वहाणेनं मारीन तुला—अन् झालं—त्या मॅचमध्यें माझ्या खूप धावा निघाल्या—अन् पुन्हा येऊन पहातो तो—तो म्हसोबा आणि ती वहाण जाग्यावर नाही! आणि तेव्हापासून आतापर्यंत मी खेळायला लागलो की त्या म्हसोबाची आणि फाटक्या वहाणेची आठवण होते मला—आणि चिक्कार धावा काढतों मी!"

"—आणि दुसरी आठवण?"

"परवा कोल्हापूरला आमची मॅच झाली. तेव्हां विनोदमूर्ति दामु-अण्णांच्या हस्तें माझा गौरव झाला—आणि नंतर खेळतांना विनोद मूर्तींचे ते विनोदी डोळे सारखे माझ्यासमोर दिसायला लागले आणि आश्चर्याची आणि कौतुकाची गोष्ट—ती मॅच आम्ही हरलों!"

* * *


—पण माझ्या या मुलाखत वाचनाने सोहनींचे कांही तरी मानसिक हाल होत असावेत, असें मला वाटलें; म्हणून मी त्याच्याकडे सहानुभूतीने पाहिलें. तोच सोहनी म्हणाले, "असं करा यशवंतराव,पुढची मुलाखत मी आपल्या मनांतल्या मनांत वाचतो!"

मी मुकाट्याने मुलाखतीचें हस्तलिखित सोहनींच्या हातीं दिलें. त्यांनीहि तें झटकन् वाचून सपविलें व एक सुटकेचा निश्वास टाकला!

मी अधिरेपणाने विचारलें, 'कस काय, बरोबर आहे ना?"

मी लिहिलेल्या मुलाखतीचें हस्तलिखित एका मोठ्या अवजड पुस्तका-खाली दडपून ठेवीत सोहनी म्हणाले, "यशवंतराव, माझा तुमच्याबद्दल तुम्ही सनातनी आहांत असा गैरसमज• होता—पण तो या मुलाखत वाच-नाने दूर झाला! तुम्ही पक्के समाजवादी दिसतां!"

"कशावरनं?" मी घाबरत विचारले.



रंगा सोहनी कसल्या बरं विचारांत आहेत ?
आठवणीतला म्हसोबा आणि—कुठे आहेत,
या चिंतेंत तर ते नसतील ?

"कलावंत किंवा खेळाडू हा दारिद्र्यांतूनच निर्माण होतो. श्रीमंत माणसें चांगलीं असूं शकत नाहींत, असें तुम्हांस वाटतें की काय ?"

"असें कशावरून म्हणतां तुम्ही ?" मी थोडें चिडूनच विचारलें.

"याचं कारण असं की, मी गरीब पोरगा कधीच नव्हतों आणि नाही ! माझे वडील इंजिनियर आहेत !"

"बऽरं !"

"—आणि त्यांना मी एकुलता एकहि नाही, आम्ही एकंदर चौघे आहों त !"

" बरं. तुमची आई मात्र तुमच्या या खेळाचं मनमोकळं कौतुक करीत असे— असे जे मी लिहिलें आहे—निदान तो मुद्दा तरी—?"

"—माझी आई मी सात वर्षांचा असतांनाच वारली! पण येवढं थोड थोडं कशाला? तुम्ही लीहिलेल्या या माझ्या मुलाखतींत फक्त माझं नावच तेवढें बरोबर आहे !"

मी एकदम 'बोल्ड' गेलो!

मग आम्ही आमच्या मुलाखतीची दुसरी इनिंग सुरू केली.

" बर सोहनी, मला तुम्ही अस सांगा, क्रिकेटच्या नादापायीं तुमच्या अभ्यासाचीं काहीं वर्षे फुकट गेली का ?"

" होय, पण शाळेंत असतांना नाही गेलीं! क्रिकेटच्या खेळामुळें माझं कॉलेजचें आयुष्य फक्त दोन वर्षांनीं वाढलें !"


" त्यामुळें आपल्या वडिलाचा आपल्यावर राग झाला का ?"

" तोच तर मोटा राग येण्यासारखा विषय आहे माझ्या आयुष्यांत! माझे वडील भयंकर धीमे आहेत. त्यानी माझ्या क्रिकेटच्या खेळाबद्दल कधी तक्रार केली नाही किंवा रागहि दर्शविला नाही! आणि चागला खेळू लागलो तरी कधी तोंडांतून स्तुतीचा शब्दहि काढला नाही! परवाचीच गोष्ट सांगतो तुम्हाला. २१८ बिनबाद धावा काढून मी राजकोटहून आलो—माझे वडील सध्या मुंबईला असतात—येतांना तिथे उतरलो—शेजारीपाजारी माझ्या या विक्रमाबद्दल माझ्या वडिलाजवळ पेढे मागत होते.

—माझ्याकडे पाहात आमच्या काकानी पितृत्वाच्या शिगोशिग गंभीरपणाने म्हटलें 'यांनी तिकडे धावा काढायच्या आणि इकडे मला त्रास—पेढे वाटण्यांत किती जास्त खर्च होतो अलीकडे !'—संपलें. यांत स्तुति समजा नाही तर निंदा समजा !

" सोहनी, मला वाटतं, हेंच बरोबर आहे! निदान माझ्या मनोवृत्तींशीं तें जमतें आहे. म्हणून तरी मी तुमच्या वडिलांचें अभिनंदन करतों! नेमलेल्या पुस्तकाबरोबर त्या पुस्तकांच्या " टिप्पणी"चीं पुस्तकें फुकट

रंगा सोहनी



रंगा सोहनींचे धीमे वर्डील
श्री. वासुदेव महादेव सोहनी, इंजिनिअर

वाटावींत त्यप्रमाणें तुम्हांला असं का वाटतं की तुमच्यासारख्या मुलांची स्तुति तुमच्या वडिलांनीच करीत सुटावी?"

सोहनी गुळमुळीत हसत म्हणले, "मला कांहीच वाटत नाही हो—वस्तुस्थिति काय आहे ती सांगितली तुम्हांला?"

"बरं सोहनी, मला तुम्ही असं सांगा—क्रिकेट क्षेत्रांत आता तुमच्या महत्त्वाकांक्षा तरी काय आहेत?"

"मी महत्त्वाकांक्षा म्हणत नाही त्यांना...पण दोन गंमती व्हाव्यात असं वाटतं मला! एक असं वाटतं—आपली सबंध टीम उत्कृष्ट खेळावी—आणि त्यांत आपण पहिल्याच चेंडूला बोल्ड जावं! आणि दुसरं—" आपल्या कोटावरील क्वचित् कुठे वाटणारा धुरळा टिचकीने झाडीत व खिडकी वाटे बाहेर पाहात सोहोनी म्हणाले—"पहिल्या जोडींत खेळा-

यला जाऊन नाबाद म्हणून शेवटीं परत यावं—माझ्या क्रिकेटच्या आयुष्याचं 'यत्र' आहे असा गैरसमज होऊं नये, ही त्यांतली गंमतीची इच्छा!"

—सोहनींच्या या उद्गारानी मला त्यांचं जास्तच कौतुक वाटूं लागलें. सोहनींच्याबद्दल मी माझ्या मनात एक कल्पना करून घेतली होती कीं, हा आता "बनेलो माल" झाला असेल. पण उमलत्या फुलाकडे पाहात रमावें असं आपल्या आयुष्याकडे मथ पाहाणारा तो एक अभिमानास्पद तरुण वाटला मला!

मला वाटलें होतें कीं, सोहनींकडून माझ्या प्रश्नांचीं उत्तरें परिणामावरून नंतर लिहिलेल्या नाटकातील नायकाप्रमाणें बेछूट येतील; पण तसें झालें नाही!

—सोहनींचा आणि माझा परिचय किती दाट आहे हें मुलाखतीच्या सुरुवातीवरूनच वाचकांच्या लक्षात आलें असेल! पण मनोविश्लेषण वगैरे भानगडीने सागत नाही—माझा आजपर्यंतचा अनुभव आहे—पहिल्या भेटींत एखाद्या माणसाबद्दल जे माझें मत होतें तें नंतर मला सहसा बदलावें लागत नाही!

—सोहनीच्या आयुष्याबद्दल जास्त काय सागूं? आणि पहिल्याच भेटींत विचारू तरी कसें? पण श्री. सोहनी हे जरी एका क्षेत्रांत आज नांवलौकिकाला चढले असले तरी जीवितात त्याचे स्थान अजून ठरायचें आहे! उपमेंत सागायचें झाले तर त्याच्या आयुष्याचा भोवतालचा बागबगीचा तयार झाला आहे—मधली इमारत अजून बाधली जायची आहे!

—आणि मोठ्या वयाची एक भयकर खोड असते. स्तुतिपेक्षां शुभेच्छा किंवा आशिर्वाद हे तोंडून अगोदर उमटतात! सोहनींच्या बाबतींत माझी तीच गत झाली आहे

"काहो सोहनी, आपली ही मुलाखत अनौपचारिक आहे, हें आपल्या लक्षांत असेलच?"

सोहनी उत्तर देण्याच्या भानगडींत न पडता संमतिदर्शक नुसतेच हसले!

"आपल्यावर कोणी कांही प्रेम वगैरे?"

सोहनी एकदम गंभीर झाले आणि ताठपणाने माझ्याकडे पाहात म्हणाले 'अद्याप नाही!'

—" आपल्याला खोट वाटतं बुवा! इतक्या बाउंड्ऱ्या, इतका स्कोअर—तें राजकोट--तो लॉग स्टॅंड—बरं कादंबरी नायकाला शोभावं असं शरीरसौष्ठव—"

सोहनींनी तरीहि किंचित् हंसत नकार दर्शक मान हलविली.

" आपल्याला खरं वाटत नाही बुवा!" मी आपली विडी पेटविली.

थोडेंसें विचार केल्यासारखें करून सोहनी म्हणाले; "त्याचं कदाचित् असं असेल यशवंतराव, प्रेम करायला जेवढा कादंबऱ्यांतन स्कोअर करावा लागतो, त्यापेक्षां माझ्या स्कोअरचा कदाचित् ओव्हरडोस झाला असेल! पण आमच्या तल्यारखानसारख सांगतों--टेक माय वर्ड फॉर इट--आत्तापर्यंत कांही नाही! अगदी विदाउट दी शॅडो ऑफ ए डाऊट!"

" म्हणजे--', मी सचिंतपणानें म्हटलें, " आम्ही कलात्मक वाङ्मय लिहितो ते तरी खोटं असलं पाहिजे-- किंवा तुम्ही तरी--"

" निदान मी तरी तुमचं प्रेमळ वाङ्मय खोट ठरविलं आहे पाहा! पण एक सांगतो यशवंतराव--तसं काही व्हावं अशी माझी अपेक्षाहि नव्हती हं--तुम्ही कबूल करूं नका--पण वाङ्मयच खोट--स्वप्नाळू--झोपाळू!"

" तस नाही सोहनी. असं वाङ्मय लिहिण्यातला आमचा उच्च हेतु लक्षांत येत नाही तुमच्या! वाचकांचं मन हुळहुळं व्हावं एवढ्याकरिता आम्ही असं मुद्दाम लिहितों—' तिने उसासे टाकले '—' ती भारली गेली '—' तिने आपल्या पंचप्राणाची पंचारति ओवाळली '—लोकांना —तरुणाना—भावी पिढीला धाडस करायचा धीर व्हावा एवढ्याकरिता आम्ही सद्बुद्धीने आमच्या वाङ्मयातून प्रेमाची लालूच दाखवितों!"

" मग तुमच्यापेक्षा—म्हणजे तुम्हा सर्व साहित्यिकापेक्षा आमचा तल्यारखान फार श्रेष्ठ दर्जाचा म्हटला पाहिजे! नो—' ती!' नो—' पदर!' नो—' पिना ', ' फेस पावडर '—स्टिल—' सोहनी गेटस् मॅजिक थ्री फिगर्स '— ' सोहनी बोल्ड फाइव्ह ' ' फिफ्टी इअर्स ओल्ड् यंग व्हेटरन '—असलें खणखणीत बडबडून तो पोराबाळांपासून म्हाताऱ्या कोताऱ्यांपर्यंत रेडिओभोंवती गोळा करतो--आणि तुमचें वाङ्मय लोकांनी आवडीने वाचावें एवढ्याकरिता तुम्हांला पोरीबाळींच्या पदरांचीं वर्णनें करावीं लागतात!" —मी चलाखीने तो मुद्दा चाळवला.

" खरंच सोहनी—मला क्रिकेटची कांहीच माहिती नाही—ते तुमचे लॉंग ऑन्—मिड ऑफ्—मिड ऑन् फक्त ऐकून माहिती आहे—खेळाडू औट होण्याचे किती प्रकार असतात हो ? "

" रन् आऊट—बोल्ड कॉट वगैरे ! "

" त्या सर्व तऱ्हेने तुम्ही बाद झालां आहांत काय ? "

" होय, फक्त 'सेल्फ आऊट' म्हणून एक प्रकार आहे, तेवढा अद्याप मी हाताळला नाही—बरं जातों आता—हो, पण गेल्या मुलाखतींत श्री. सदु गोडबोल्यांनी तुमच्या गळयांत संदेश बांधला—मी आता तुमच्याजवळ संदेश मागतों—पण संदेशहि अनौपचारिकच द्या ! "

" संदेश—? " मी.

" येस् ! उगाचच एक गंमत म्हणून ! परवाची एक गंमत सांगायची राहिली तुम्हांला, अहमदाबादला मी जवळजवळ एक हजार ऑटोग्राफ्स् दिले—कागदांच्या तुकड्यावर—आणि दुसऱ्या दिवशीं सहज रस्त्यांत फिरतांना त्यातले पांच सहा—माझे मलाच परत सापडले ! "

" मग त्यांचं काय केलंत तुम्ही ? "

" खिशात जपून ठेवले आहेत ! आता कुणी मागायला आला तर पहिल्यादा तेच वाटणार आहें !—आता मला हें कबूल आहे कीं, तो एक क्षणाचा आदराचा उन्माद असतो—पण तरीहि तुमचा मला संदेश पाहिजे आहे ! "

" संदेश एकच सोहनी ! तो तुम्ही कोणत्याहि अर्थाने घ्या—इतर सर्व तऱ्हेने औट होण्यांत नामुष्की नाही—पण फक्त 'सेल्फ आऊट' होऊं नका ! " संदेश स्वीकारल्याचें चिन्ह म्हणून सोहोनींनी उभे राहून मान लवविली व लगेच ताठ होऊन आपल्या खिशांतील एक कागद काढून तो माझ्या टेबलावर ठेवीत सोहनी उद्गारले, " इन रिटर्न हियर इज माय ऑटोग्राफ !

भाई ना. ग. गोरे : : : ६

या महिन्याकरितां मी श्री. के. ना. काळे यांची मुलाखत घ्यायची ठरविलें होतें. पण त्या मुलाखतीबद्दल कांही लोकांची विशेष उत्कंठा दिसल्यामुळें, जमली तर ती उत्कंठा आणखी वाढवावी या सद्हेतूने प्रेरित होऊन, श्री. के. ना. काळे यास मी या महिन्यापुरतें बाजूला सारलें आहे. आणि शिवाय के. ना. काळे यांची मुलाखत "विचारप्रवर्तक आणि मार्गदर्शक" करण्याच्या मी खटपटींत असल्यामुळे हा विलंब क्षम्य ठरेल !

तेव्हा आता या महिन्याला कुणाची मुलाखत घ्यावी हा माझ्यापुढे प्रश्न पडला. तेव्हा मी असें ठरविलें की—सकाळीं उठून आपल्या दरवाजांत उभें राहायचें—आणि जो आपल्या ओळखीचा पहिल्यादा भेटेल, त्याची मुलाखत या महिन्याकरितां घ्यायची !



भाई ना. ग. गोरे

आणि त्या पूर्वसंकल्पाप्रमाणें मी सकाळीं उठून मुलाखतीच्या आशेनें रवाजांत उभा राहिलों.

—पहिल्यांदा आली आमची नेहमीची भाजीवाली !

—मग आली फुलाचा पुडा टाकणारी माळीण !

—मग आला छापखान्यांतील माणूस प्रुफें नेण्याकरितां !

—मनांत आलें होतें की यांपैकींच कोणाला तरी मुलाखतीकरितां वेठीला रावें. पण—

खरंच, काय हरकत होती त्यांपैकी एखाद्याची मी मुलाखत घेतली ती तर ?

—ते का जीवन जगत नाहीत ?—का आपल्या आयुष्यांतील अडचणी बाजूला सारीत नाहीत ?

—का त्यांना महत्त्वाकांक्षा नसतील?—फार तर त्यांच्या आयुष्यांत दारुण मनोभंग असतील!

—निर्मूल झालेल्या महत्त्वाकांक्षा असतील! त्याच्या आयुष्याची दारुण सर्कस असेल! पण—हो—मुलाखतीच्या पंपानें उद्योग, उत्साह आणि कर्तब-गारीची हवा भरायची असते नाही का जनमनांत? —तेव्हा असली एखादी मुलाखत मी घेतली असती, तर ती लोकांना पालीच्या चुकचुकण्यासारखी वाटली असती!

"अहो गोरे, शुकऽशुकऽऽ, इकडे—इकडे मी हांक मारतों आहें!" मी ओरडलों.

"कां हो? येतो थोड्या वेळात— जरा मंडईत जाऊन येतों!" गोरे लांबूनच म्हणाले.

"नाही; अगोदर इकडे या—एक महत्त्वाचं काम आहे!"

गोरे हसत हसतच माझ्याकडे आले, "कां हो, इतक्या निकडीचें काय काम आहे?"

"अगोदर बसा तर खरं—आज तारीख दहा—'सह्याद्री'ची मुलाखत द्यायची आहे—तेव्हा तुम्हाला थोडा त्रास." मी श्री. गोरे यांना माझ्या मुलाखतींचीं हस्तलिखितं अगोदर वाचून दाखवीत असें.

"त्रास कसला त्यांत? वाचा कीं—या महिन्याला कुणाला वेठीला धरला आहेत बुवा?" गोरे खुर्चीवर जरा ऐसपैस बसत म्हणाले.

"या महिन्याला तुमचीच मुलाखत घ्यायचं ठरवलं आहे मी! फार त्रास देत नाही तुम्हाला. झटकन् संपवतों," मी घिसाडघाईनं म्हटलें.

गोरे माझ्यापुढें हात जोडीत उभे राहत म्हणाले, "भाई, माफ कर. मला मंडईत जायचं आहे अगोदर!"

"—गोरे—" मी कळवळून म्हटलें "तुमच्यासारख्यांनी असं म्हटल्यानंतर आम्ही काय करायचं? विश्वकुटुंबवादी गोरे, जीवनाकडे जरा व्यापक दृष्टीनें पाहा! मंडई आणि मुलाखत—मंडईने फार तर तुमच्या खासगी जीवनावर परिणाम होईल—पण मुलाखतीने उभ्या महाराष्ट्राचा फायदा होईल."

गोरे माझ्याकडे मिस्किलपणाने पाहात म्हणाले, " अहो, आमची शुभा* हट्टून बसली आहे--तिला मी आत्ता अंजीर आणून द्यायच कबूल केलें आहे ! "

" ठीक आहे–माझ्याहि छोकरीला मला आत्ता एक पिपाणी आणून द्यायची आहे–पण आपण आपल्या जीवनांत आता जरा उन्नत होऊं या– आणि पहिल्यांदा मुलाखत संपवून मग मंडईत जाऊं या ! "

मी टेबलावर गंभीरपणानें बसून लिहिण्याचें अवसान आणलें. कोरे कागद पुढे घेतले--बिचारीं शाई आणि टांक सत्याग्रहाला सदैव तयार असलेल्या देशभक्ताप्रमाणें माझ्या शिक्षेचीच वाट पाहात होतीं–

गोरे यानी मनात जाणलेंच की आता मुलाखतीशिवाय सुटका नाही ! त्यांच्यावर मी हा माझ्या सोयीकरिता मुलाखतीचा अत्याचारच करीत होतो.

पण मी मनांत विचार केला.

--ज्या मुलाखती नेहमीं मासिकांत येतात तोसुद्धा एक प्रकारचा सात्त्विक अत्याचारच नसतो का ? मुलाखतीकरिता दाराशीं माणूस आला–नाही कसें म्हणायचें ? मुलाखतीला नाही म्हटलें तर आपणच आपली किंमत कमी केल्यासारखे होतें–आणि हो म्हणावें तर–

--बरोबरीची, कुस्ती लढून, आपल्याच दोस्ताच्या खांद्यावर बसून " कुस्ती मारलीकी जय ! " अशा थाटांत कलाकौतुकांत मुलाखत येते !

गोरेहि माझ्या मुलाखतीच्या कल्पनेने पेचांत पडलेले दिसले.

मी म्हटलें " गोरे--डोकं दुखतं आहे म्हणून सांगितलत तरी आता मुलाखतीशिवाय सुटका नाही ! "

---

*शुभा हें गोरे यांच्या पत्नीचें नांव नव्हे ! शुभा हें त्यांच्या मुलीचें नांव आहे. मी त्याच्याकडे नेहमीं जातो, पण त्यांनी आपल्या पत्नींना नांव घेत हांक मारलेली मी ऐकलेलें नाही; त्यावरून ते माझ्यासारखेच प्रतिगामी असावेत असा मला संशय आहे !

" आपली दोस्ती बाधणार म्हणायची आम्हांला ? बरं, मग मी इंग्रजी चौथींत असतांना एक काव्यमय सूत्रवाक्य तयार केलं होतं तें घ्या मुलाखतीच्या सुरवातीला :

जो करीना 'वर्क'।

त्याचा कधी न होई 'एडमंड बर्क'॥

गोरे हसत हसत म्हणाले. मीहि हसत हसतच तें इंग्रजी चौथ्या इयत्तेंतील गोऱ्यांचें सूत्रवाक्य टिपून घेतलें.

नंतर श्री. गोरे गंभीर होत म्हणाले " आता माझी मुलाखतीवाचून सुटका नाही हें मी जाणलेंच आहे. तेव्हा आता तुमचीआमची वैचारिक मुलाखत होऊन जाऊं द्या ! नाही तर मी माझ्या पत्नीशीं कसा वागतो ?—त्याचे माझ्यावर किती प्रेम आहे ?—असले घरगुती विषय माझ्या मुलाखतींत नकोत ! कारण—समजा, मी पुढे आत्मचरित्र लिहिण्याइतका मोठा झालों—तर त्याच्या सामग्रीची आतापासून परिस्फुटता नको ! कांही तरी—वैचारिक मुलाखत होऊन जाऊं द्या !"

मीहि श्री. गोऱ्याचा तो मुद्दा एकदम मान्य केला आणि गंभीरपणाने म्हटलें " ठीक आहे. तशीहि मुलाखत घ्यायची आपली तयारी आहे. पण विषय मात्र राजकारणाचा नको. कारण राजकारणांत तुमचें आमचें बिलकूल जमायचें नाही ! आणि राजकीय स्वरूपाचीं मी जर तुमच्याशीं प्रश्नोत्तरें करायला लागलों तर तुमचा माझ्यापुढे निभाव लागणें कठीण आहे !

—त्याचें मूळ महत्त्वाचें कारण असें आहे की—मला राजकारणांत अजून फारसें कांही कळत नाही ! अजून सर्वांचें ध्येय एक असताना राजकारणात पक्षोपपक्ष—निदान त्यांतील एकमेकांबद्दलचा इतका कडवटपणा—असावाच का, या प्राथमिक प्रश्नाच्या आश्चर्यात आणि भ्रमांतच मी दंग आहें !"

" ठीक आहे ! मग सध्या वाङ्मयांत बौद्धिक अराजक माजलें आहे—त्यावर आपण मुलाखतीच्या रूपाने दोन हात करूं !" गोरे गंभीरपणाने म्हणाले.

" पण तत्पूर्वी भाई गोरे, मला असं सांगा—की माझ्या वाङ्मयाबद्दल आपणांस कितपत आदर आहे ? आणि असल्यास वजनमाप पद्धतीने किंवा

मी आणि श्री. गोरे (खडीसाखर आणि बदाम खातांना)

तुलनात्मक पद्धतीने आपण त्या आदराची महति गाऊं शकाल काय ? मी मुद्दामच विचारलें.

" जोशीबुवा, वाङ्मयांत आपण इतक्या तऱ्हेने हालचाल करीत आहांत की तुमच्याबद्दल आदर ठेवण्याशिवाय कोणालाच गत्यंतर नाही ! स्वतः

श्री. गोरे म्हणाले, "असो बिचारं प्रतिगामी!—पण चित्तरंजनमालेच्या रहस्यमय डिटेक्टिव्ह कादंबऱ्यांपासून तो तहत् **वादविवेचनमालेपर्यंत** इतके नानाविध तुम्ही प्रकाशन केले आहे की, त्या प्रकाशनाचें एकत्रित सामर्थ्य डोळ्यांपुढे आणून तुम्ही प्रकाशकस्वरूपी टॉलस्टॉय, मार्क्स किंवा एंजल्स आहांत असें कोणीहि विनोदानं म्हणू शकेल! निदान मला तरी तसें चेष्टेने म्हणायला बिलकूल दिक्कत वाटत नाही!" गोरे एकदम साध्याबोलण्यावरून व्यासपीठावरून बोलल्यासारखं बोलू लागले.

तेंव्हा मी पुढील अडचण ओळखून पाण्याचें तांब्याभांडें व खडीसाखरेचे खडे आणून त्यांच्यापुढे ठेविले. त्यांतील एक खडीसाखरेचा खडा तोंडांत टाकीत गोरे गंभीरपणाने म्हणाले "खडीसाखरेबरोबर चार बदामबियाहि असल्या तर चालतील जोशीबुवा!"

"द्यायला कांही हरकत नाही माझी—पण मी आपणांस आत्ता माझ्या घरांतून बदामबिया आणून दिल्या तर मला आपण कदाचित् भांडवलवाले समजाल अशी धास्ती वाटते आहे! तेंव्हा मी आपणांस बदामबिया देतों—पण एका अटीवर—आपण त्या चुरमुरे म्हणून खात असाल तरच!"

—आणि मी श्री. गोऱ्यांना बदामबिया आणून दिल्या. समतेच्या तत्त्वानुसार त्यांतील निम्या त्यांनी घेतल्या आणि त्याच्या बदला त्यांनी आपल्याजवळची निम्मी खडीसाखर मला दिली!

—आणि नंतर खडीसाखर आणि बदामबिया खात खात आम्ही बोलू लागलों.

"हं—बोला आता माझ्या वाङ्मयाबद्दल आपलें मत—"

"चविष्ट आहे—!" आपल्या डोक्यावरची खादी टोपी जरा मागें सारीत गोरे म्हणाले.

"—बदामखडीसाखरेबद्दल नाही मी आपलें मत विचारलें. माझं वाङ्मय—" मी स्पष्ट खुलाशाच्या आपेक्षेने विचारलें.

"तुमचं वाङ्मय म्हणजे तुम्ही असं समजा जोशीबुवा की—

कालिदास + ज्ञानेश्वर + भवभूति + रवींद्रनाथ टागोर उणें **फडके + खांडेकर + माडखोलकर + ना. वि. कुलकर्णी**" मध्येच एक पेलाभर पाणी पिऊन गोरे पुढे म्हणाले, "किंवा **टॉलस्टॉय + रोमाँ**

रोलाँ + जॉन गंथर + गॉर्की + शॉ ÷ त्या नांवावर विकले जाणारे आपल्या कडील सर्व लोक!" गोरे आपल्या विशिष्ट पद्धतीने गालाला खळी पाडून हसूं लागले.

आणि तें ऐकून मी तळमजल्यावर असतानाच मला एकदम तिसऱ्या मजल्यावर गेल्यासारखें वाटूं लागलें---आणि गोरे मात्र तळमजल्यावरूनच माझ्याशीं मान वर करून तिष्ठत बोलत उभे राहिले आहेत असें मला वाटले.

आणि मग मी श्री. गोऱ्यांशीं जरा थोड्या उर्मटपणानेच पण अधिकार-युक्त स्वरांत बोलूं लागलो.

"गोरे---कलेकरिता कला का जीवनाकरिता कला याबद्दल आपलें स्पष्ट मत काय आहे?"

"चिवड्यावर लिंबू पिळायचें का लिंबाच्या रसात चिवडा टाकायचा या महत्त्वाच्या विषयावर घुमविलेला वादविवाद म्हणजे कलेकरिता कला का जीवनाकरिता कला हा वाद! किंवा शरीराकरिता आत्मा का आत्म्या-करिता शरीर किंवा—"

"गोरे, थांबा; उपमा लांबवूं नका—जरा चिवड्यापाशींच थांबा; मला एक शंका विचारायची आहे. समजा, आपण आज चिवडा खाल्ला आणि उद्या तोंडांत लिंबू पिळलें किंवा आज लिंबू चोखून उद्या चिवडा खाल्ला—तर कला आणि जीवन एक होतील काय?"

मंडईची पिशवी मांडीवर घेत गोरे म्हणाले, "मला मंडईला जायला उशीर होतो आहे!"

"बरं, आपल्याकडे कांही लोकांना शॉ—इब्सेन—टॉलस्टॉय वगैरे म्हटलें जातें त्याबद्दल आपलें काय मत आहे?"—य. गो. जोशी यानी, अर्थात् मी, विचारलें.

"जोशीबुवा मला मंडईत जायला उशीर होतो आहे. आणि त्या घाईत आपण जर असले महत्त्वाचे प्रश्न मला विचारूं लागलात तर मी भयंकर स्पष्ट उत्तरें देऊन मुलाखत अशक्य करून टाकीन! आपल्याकडे जे कोणी शॉ-इब्सेन-टॉलस्टाय असतील ते असेनात बिचारे आपआपल्या घरीं सुखरूप! धुळवडीच्या दिवशीं कांही लोक अंगावर रंगीबेरंगी पट्टे ओढून व चित्रविचित्र पोषाक करून आपल्या पूर्वजांसारखे ओरडत खेळ म्हणून

उन्हाचे हिंडतात, आणि उन्हाचे चटके बसूं नयेत म्हणून त्या वेळीं डोक्यावर साहेबाची टोपी घालतात—त्या साहेबाच्या टोपीसारख्याच आपल्या लेखकांच्या शॉ-इब्सेन-टॉलस्टॉय इत्यादि पदव्या वाटतात मला!" गोऱ्यांना काय वाटलें कुणाला ठाऊक त्यांनी आपल्या हातांतील मंडईची पिशवी खुर्चीच्या टोकाला अडकावली आणि खुर्चीवर ते ऐसपैस बसले.

"पण त्यामुळे माझी काय अडचण होते माहीत आहे तुम्हांला? परिस्थितीमुळे माझें विद्वान व्हायचें राहून गेलें आहे. तेव्हा मी टॉलस्टॉय शॉ वाचलेला नाही—पण कांही लोकांच्या बोलण्यावरून त्या लेखकांबद्दल मला आदर आहे. पण आपल्याकडील ज्या लोकांना अशा पदव्या बहाल केल्या जातात त्यांच वाङ्मय मी वाचलेल असतं—आणि तें वाचून मूळ टॉलस्टॉय शॉ इत्यादींबद्दलचा माझा आदर ढासळत जातो!"

—आणि एकदम काय झालें?

—आपण हंसत खिदळत रस्त्याने गप्पा मारीत जात असावें आणि त्याच वेळीं पांढऱ्याशुभ्र फडक्यांत गुंडाळून एकाद्या लहान मुलाचें प्रेत कुणीतरी आपल्या शेजारून न्यावें; झटकन् आपली थट्टा थंडावते—जिभा लुळ्या पडतात—आणि आपण थोडेसें गांगरतों. त्याप्रमाणें माझ्या खोलीतील एका छापील पुस्तकाच्या दर्शनाने श्री. गोऱ्यांची स्थिति झाली.

—ते एकदम गभीरपणाने मी कांही एक प्रश्न न विचारताच म्हणाले, "कुस्तीमध्ये एखाद्या पैलवानाचा हात उखडावा त्याप्रमाणें जीवनकलहांत मध्यमवर्गाची स्थिति झाली आहे! आणि आपले लेखक सगळे मध्यम वर्गीयच आहेत! आर्थिक अनवस्थेच्या मागोमाग सर्व प्रकारची अनवस्था आली आणि त्यामुळे भांबावून जाऊन आम्ही चारी दिशांना उधळतों आहोंत—आणि आपल्यांतील लेखक तर उधळलेहि आहेत आणि पिसाळलेहि आहेत!

—महायुद्धाच्या भयंकर दिव्यातून गेल्यानंतर व सुबत्ता आणि विपन्नावस्था यांचे झोके एका मागोमाग झपाट्याने बसल्यानंतर पाश्चात्य देशांतून राजकारणांत काय अथवा समाजकारणांत काय जशी निर्नायकी माजली आणि पूर्वीचीं समाजबंधनें नष्ट होऊन त्यांच्या जागीं नवीं बंधनें न आल्यामुळे जशी तिकडे बजबजपुरी माजली, त्याचीच अल्पप्रमाणांत आपल्याकडे

पुनरावृत्ति आली! ही निर्नायकी म्हणजे **बुद्धिस्वातंत्र्य**! हें **अराजक** म्हणजे **लोकशाही**! **नवमतवाद** म्हणजे **नवी स्मृति**! हा **उल्लूपणा** म्हणजे **क्रांती**! अशी आत्मवंचना घडून आली व आमचेहि साहित्यिक त्यात वाहून बुडून रगून गेले!

प्रवाहाच्या जोगाने आपले साहित्यिक खाली खाली खेचले जात होते व आहेत---आणि एकीकडे ओरडत होते आणि आहेत की, आम्ही पोहत आहोंत!

भोवऱ्यांत सांपडून बुडत चालले आहेत--पण तोंडाने म्हणत होते व आहेत की आम्ही मुद्दाम तळाशीं जात आहोत---आणि पुरते तळाशीं गेलों की तेथून एकदम हाराभर मोत्यें घेऊन आम्ही वर येणार आहोत!

प्रवाहपतित असता आपले साहित्यिक प्रेपिताचा आव आणीत होते व आहेत!"

मी खाली मान घालून मुकाट्याने श्री. गोरे बोलत होते तें लिहून घेत होतों. श्री. गोरे आता मडईची आठवण विसरले होते. ते आता विचाराच्या धारेला लागले होते.

"---ही साहित्यांतील बुवाबाजी होती व आहे! खोटे आणि भोंदू संत ज्याप्रमाणें मुद्द्याचा प्रश्न टाळतात अथवा त्यावर उत्तरें देऊ लागले की जसे हास्यास्पद ठरतात---बिकट अवस्थेंतून पार पडून हिमतीने नवी समाजरचना, नवी समाजबंधनें निर्माण करण्यासाठी जो विशाल अनुभव व बुद्धि लागते ती आपल्या ललित लेखकांजवळ नव्हती आणि नाही!

---'ब्रह्मचारी' बोलपटांतील मीनाक्षी गुडघाभर पाण्याला तलाव समजून त्यांत पोहण्याचा जसा आव आणते---तसेच आपले साहित्यिक आपल्याभोवतालच्या टीचभर समाजाला सर्व समाज कल्पून---त्याच समाजावर आपल्या बुद्धिमत्तेची चिखलफेक करीत आहेत!

---आणि शरमेची गोष्ट---त्याच वाङ्मयाला **पुरोगामी क्रांतिकारक-क्रांतिवादी** वाङ्मय म्हणत आहेत व म्हणवून घेत आहेत.

---नवमतवादी ही शिवी झाली आहे--आणि याला नवमतवादी आणि

आहे—आणि जो ईश्वर अमान्य करतो, तो तर अधिकच पापभीरु-कर्तव्यदक्ष-न्यायनिष्ठ-आणि त्यागी असायला पाहिजे अस मला वाटतं !

——बाप मेल्यामुळे हातीं आलेल्या बापकमाईच्या——किंवा पिढीजात पैशावर उंडारणाऱ्या पोरांसारखे या लेखकाकडे पाहून वाटतें !

——समाजाची गति नियंत्रण करण्याची शक्ति व जबाबदारी माणसांवर आहे !

——ईश्वराला ज्यांनी पदच्युत केलं, त्यानी ईश्वराच्या जागीं मानवधर्माला अभिषिक्त केलं पाहिजे ! तसें घडलें असतें, तर माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणें बौद्धिक अराजक माजण्याचें कारणच नव्हते !

——लोकमान्य टिळक आणि गांधी यांच्यासारखा नेता नाही, म्हणून ही अंदाधुंदी माजली आहे असें बोलणें हें बुद्धिहीनांना शोभतें !

——बुद्धिवानाना शोभणार नाही !

——ध्येयमूर्तीची निर्गुण उपासना आम्हांला कां साधू नये ?

पण खरं बोलायचं, तर हीं माणसं लेखनाच्या बाबतींत प्रामाणिक आहेत, हेंच मला पटत नाही ! शील आणि कार्यक्षमता यांचा अत्यंत घनिष्ट संबंध आहे !

सोव्हिएट राज्यसत्ता प्रस्थापित झाल्यानंतर नवमतवाद्यांच्या पेंढाऱ्यांनी रशियातदेखील दंगल उडविली होती ! आणि आपल्याकडे कांही न होतांच वाङ्मय-पेंढारी मोकळे सुटले आहेत ! त्या रशियन पेंढाऱ्यांबद्दल लेनिनने किती कठोर उद्गार काढले आहेत ! ‘ उष्ट्या पेल्याचा ’ लेनिनने दिलेला दृष्टान्त त्या कालाचाच आहे !

——मी तुरुंगांत असताना प्रा. ना. सी. फडके यांचें एक लहानसें पुस्तक वाचलें होतें—त्याचें आता मला नांव आठवत नाही ! त्यांत त्यांनी म्हटलें आहे——‘ क्रांतिकारक वाङ्मय आम्हीहि लिहिलें असतें-पण तें सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे अशक्य आहे !’ प्रा. फडके यांना सरकारने ‘ ॲशुरन्स ’ दिलें, तर प्रा. महाशय असें वाङ्मय लिहावयाला अगदी उतावीळ झालेले दिसतात ! बाकी खरा कर्तबगार माणूस ! आम्ही तुम्हांला पकडणार नाही असें सरकारने प्रा. फडके यांना विनंतिपूर्वक विनविलें, तर प्रा. महाशय बंडखोरहि होतील कदाचित् !

मी म्हटलें " वरच्या प्राध्यापकांच्या विचारांतील आचरटपणा सोडा—पण ते खरं बोलले—अर्थात् कलावंतपणाने—यांचं आपण कौतुक करायवाला पाहिजे! प्रा. फडके यांना मला तर अगदी जिव्हाळ्याने सागांवंसं वाटतं की ' उगा-उगा-रडूं नका. आपलं सरकार खराब आहे—असंच लिहा हं वाङ्मय — लोक आहेत खूप—क्रांतिकारक वाङ्मय सरकार पचूं देणार नाही—हात रेऽ सरकारा!' सध्या त्याचं घरं उन्हांत बांधलं गेलंच आहे! पण समाज काही करूं शकत नाही ही खात्री असल्यामुळे एक प्राध्यापक आपल्या प्रिय पात्राला बरोबर घेऊन बेवकूबपणाने हिंडत असतो—आता तो प्रा. लेखक नाही ही मेहरबानी आहे—नाही तर श्री. रा. म. आठवल्याचे दोन-दोन चार-चार बायका प्रत्येकाने कराव्यात वगैरे अमौलिक विचार त्यांनी वाङ्मयांत चिरस्थायी करून ठेवले असते!" मी प्रा. फडके यांच्या बाजूची साक्ष दिली आणि नंतर पुनः म्हटलें, " बरं, पण आपल्यात सध्या जरी टॉल्स्टॉय नसला, तरी प्रा. फडके—माडखोलकर—पी. वाय्. देशपांडे—खांडेकर—य. गो. जोशी इत्यादि नामवंत लेखक एकत्र गोळा झाले, तर टॉल्स्टॉयच्या तोलाचं साहित्य निर्माण करतील असें परवा खांडेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले त्याबद्दल आपलें मत काय आहे?"

" शॉची एक आख्याइका ठाऊक आहे का तुम्हांला? एका सुंदर तरुणीने शॉला म्हटले की, तुम्ही आणि मी विवाहबद्ध झालों, तर माझें सौंदर्य आणि तुमची बुद्धिमत्ता यानी युक्त असें एक असामान्य अपत्य निर्माण होईल, नाही?—त्यावर शॉ म्हणाला—पण समजा, माझें सौंदर्य आणि तुमची बुद्धिमत्ता त्या आपत्त्यांत उतरली तर?—पंक्तींतील द्रोण एकावर एक पालथे घालून हिमालय बनविण्याची अपेक्षा करण्यासारखेंच आहे हें!

—थट्टा सोडा, जोशीबुवा, पण टॉल्स्टॉय, गॉर्की हीं नांवें हे लोक इतक्या सहजतेने हाताळतात—पण ज्या टॉल्स्टॉय गॉर्कींनी आपलें सर्व आयुष्य म्हणजे कोणत्या तरी एका ध्येयासाठी अगर श्रेयासाठी केलेल्या जीवनसमर्पणाची कथा बनवली, त्यांचें नांव इतक्या सहजासहजी हे लोक

—विचार लिहिण्यापेक्षा—विचार जगणारे लेखक तेच खरे लेखक—त्यांच्या लेखनाकडून कांही अपेक्षा करतां येतील—आपले साने गुरुजी घ्या!

—बॅरिस्टर सावरकरांचें ‘ लेखण्या सोडा आणि तरवार हातीं घ्या ’ हें म्हणणं मला पटतं—लेखण्या सोडा म्हणजे—फेस पॉवडर चोपडण्याच्या ब्रशासारख्या झालेल्या लेखण्या सोडा आणि जोमदार जिवंत विचाराच्या तरवारीसारख्या धारदार लेखण्या घ्या असें त्यांचे म्हणणें—असें मी समजतों! आणि तें जमत नसेल तर हातांत काही घेतलें नाहीत, तरी चालेल—पण लेखण्या टाका!

—दुसऱ्या बाजीरावाच्या वेळच्या शाहिरांचीं भुतें—पुनः जागृत होऊन डफ तुणतुण्यासकट पुन्हा गाऊं लागल्यासारखे अलीकडच्या कांही साहित्यिकांबद्दल वाटतं ? आणि शरमेची गोष्ट, तें साहित्य पुरोगामी—क्रांतिकारक—तारुण्ययुक्त आहे असें ते म्हणतात आणि याला जे विरोध करतील ते प्रतिगामी—सनातनी—आणि म्हातारे!”

“ बरं, कां हो गोरे, या साहित्याकडून आपल्या समाजाला धोका वाटतो, का तुम्हांला ?”

“ मध्यंतरीं धोका वाटत होता—पण आता फक्त किळस वाटते! सध्याची तरुण पिढी आता नवमतवादित्वाचे आणि क्रांतीचे अभ्र पाघरलेल्या या साहित्यिकांपासून खात्रीनें दूर-दूर चालली आहे!

—असल्या साहित्यिकानी वाङ्मयांत उभीं केलेलीं चित्रें सर्वस्वी खोटीं आणि दिशाभूल करणारीं आहेत—त्यांच्या कलाकृतींना दोन घटका हलक्या दर्जाचें मनरंजन करण्यापलीकडे किमत नाही हें तरुण पिढीला समजून चुकलें आहे!

—प्रत्यक्ष जीवनाचे दारुण आघात तरुण पिढीला सहन करावे लागत आहेत—आणि या ढोंगी साहित्यिकांचें पोखरलेलें भकास जीवन आता उघडें होऊं लागलें आहे! ही तीव्रता जसजशी वाढत जाईल, तसतसे या साहित्याचें मूल्य उतरेल, आणि ते साहित्यिकहि आपलें धोरण बदलतील!”

“ बरं आहे, गोरे! आपण आता मुलाखत पुरी करूं या! कारण मला आणखीहि कांही मुलाखती घ्यायच्या आहेत. तेव्हा सर्व विचार एकाच मुलाखतींत संपविले, तर माझी पुढे अडचण होईल! तेव्हा मी आपणास

जाहीर करतों की ' मुलाखत संपली ' असें समजून आपण मंडईत जाण्यास मोकळे आहा ! "

—आणि असें सागून मी आपल्या कामाला लागलों.

—पण गोरे थोड्या स्नेहयुक्त रागाने म्हणाले, " जोशीसाहेब—आता आपण काम करूं शकत नाही ! आपण माझ्याबरोबर मंडईत यायला पाहिजे ! "

—अर्थात् कृतज्ञताबुद्धीने मी श्री. गोरे याच्याबरोबर मंडईत जायला निघालो.

जातांना मी श्री. गोरे यास सांगितलें की, " गोरे, तुम्ही अत्यंत रहस्य-युक्त आहां ! इतकी तुमची आमची मैत्री. पण मी तुम्हांला नेहमी खादी-च्याच पोषाकांत पाहतो—विलायती सुटाबुटात मी तुम्हांस अद्याप कधीच पाहिलें नाही हे कसें काय ?—निदान आपला तो ड्रेस तरी आम्हांला दाखवाल काय ? कित्येक खादीवाल्यांचे असे ड्रेस मी पाहिले आहेत म्हणून विचारतो ! "

—माझ्याच सुरात गोरे पुढे म्हणाले, "कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें की, असा पोषाख आम्ही आतापर्यंत कधींच केलेला नाही ! "

लोक श्री. गोरे यांना " भाई गोरे " म्हणतात—पण जे विचार त्यानी मुलाखतीकरिता मला दिले त्यावरून श्री. गोरे हे ' सनातनी ' आहेत असें मला तरी वाटतें.

—वाचकांनी माझ्याबरोबर सहमत व्हावें हें विनंति.


—आता पुढील महिन्यांत मात्र नक्की श्री. के. ना. काळे.—

दी दिग्दर्शक !

के. नारायण काळे : : : ७

[भयंकर असामान्य आणि भयंकर दिग्विजयी नसलेले दिग्दर्शक]

मराठींतील सर्व स्तुतिवाचक विशेषणें तिंबून तिंबून त्याच्या भरीत-रोडग्याने ' अमर—अलौकिक—असामान्य ! ' वगैरे शब्दाच्या ताशे वाजंत्र्यांत आगाऊ जाहिरातबाजी केलेला चित्रपट जसा ' पडतो ' तसें माझ्या श्री. काळे याच्या मुलाखतीबद्दल होणार अशी माझी मलाच धास्ती वाटते आहे ! आगाऊ जाहिरातबाजी करायची म्हणून श्री. काळे यांच्या मुलाखतीची मी ' विचारप्रवर्तक व मार्गदर्शक मुलाखत ' अशी जाहिरात केली—पण ही मुलाखत वाचकाना 'पडलेली' वाटल्यास मी दाखविलेल्य एका धूर्ततेची वाचकांना आठवण करून देण्याचा मोह मला अनावर होत आहे ! श्री. काळे यांची मुलाखत ' विचारप्रवर्तक आणि मार्गदर्शक होण्य ाच संभव आहे ' असें मी म्हटलेलें आहे—खात्री दिलेली नाहीं !



श्री. के. नारायण काळे

—श्री. के. ना. काळे यांचा आणि माझा किती तरी वर्षांचा स्नेह आहे ! तो किती दाट आहे हें मी सांगूं इच्छितों. समजा, 'सह्याद्रि' मासिकांत मी घेतलेल्या अनौपचारिक मुलाखती यायला लागल्यापासून श्री. काळे हे 'माझी मुलाखत घ्या—माझी मुलाखत घ्या' म्हणून माझ्या पाठीस लागले होते, अशी जरी मी धडधडीत खोटी थाप मारली तरी ते ती थाप माझ्या स्नेहाकरिता आपल्या अंगावर ओढून घेतील अशी मी ग्वाही देतों !

—आता मी अशी थाप मारणार नाही आणि तेहि कबूल करणार नाहीत, ती गोष्ट निराळी !

श्री. के. नारायण काळे हे काय गृहस्थ आहेत हें दोन स्नेही एकमेकांना जितकें समजूं शकतात तितकें मला माहीत आहे; पण ज्यांचा श्री. काळ्यांशीं

फारसा संबंध आलेला नाही ते श्री. काळयांच्याविषयीं काय मत बाळगून असतात तें मी येथें गंमतीनें सांगणार आहें!

'काय गृहस्थ दांभिक आणि अहंमन्य आहे हो!' हे त्याच्याविषयीं निघणारे पहिले उद्गार! मीहि पहिल्यादा त्यांच्याविषयीं हेच उद्गार काढले होते.


त्यांची माझी पहिली ओळख एकंदर तीनदा आणि तीन ठिकाणीं झाली. ओळख करून देणाराने आमची ओळख करून दिली. तीनहि वेळेला आम्ही एकमेकांना नमस्कार केले. नंतर श्री. काळे चिरूट ओढीत दुसरीकडे पाहूं लागले आणि मी विडी ओढीत ओढीत 'काय गृहस्थ अहंमन्य आणि दांभिक आहे', असें मनातल्या मनात पुटपुटत विडीचा धूर सोडूं लागलों.

मध्येच एक सुचलेली उपमा ठोकून देतों. श्री. काळे यांच्या आणि माझ्या विद्वत्तेतील अंतर--प्रतीक (मॉटाज) सागून टाकतों. ते ओढीत असलेल्या चिरूटांत आणि मी ओढीत असलेल्या विडींत--जितक्या जाडीचें किंमतीचें आणि स्वादाचें अंतर आहे--तितकेंच त्यांच्या आणि माझ्या विद्वत्तेत अंतर आहे! माझा अभिमान आणि गर्व एवढाच की, आमची विद्वत्ता (म्हणजे काय कुणास ठाऊक ?) स्वदेशी आहे!

आणि हा सुटाबुटांतला साहेब श्री. के. ना. काळे एक दिवस अचानक माझ्या घरीं आला. त्या वेळीं मी एका सात खणांच्या जुनाट जागेंत राहात होतों.

मी आश्चर्याने थक्कच झालों. त्या वेळीं मी नुकताच कोठे लिहूं लागलों होतों. आणि श्री. काळे त्या वेळीं 'प्रतिभा' पाक्षिकाच्या संपादक मंडळापैकी एक होते. आणि प्रतिभेसाठी लेख मागण्याकरिता ते मुद्दाम माझ्या घरीं आले होते--आणि काय चमत्कार सांगावा, त्या दिवसापासून श्री. के. ना. काळयांविषयी माझें मत बदललें. 'माझा मुलगा' ही चित्रपटकथाहि मी श्री. के. ना. काळे याच्याकरिताच लिहिली आणि त्यांच्यामुळेच लिहिली!

कांही माणसें दिसायला भयंकर शालीन आणि लाघवी वाटतात—पण अनुभवाने भलतेंच पटतें. श्री. के. ना. काळे दिसावयाला दांभिक आणि



दिग्दर्शक के. ना. काळे तंबाखू कशी ओढावी याचें दिग्दर्शन करीत आहेत !

अहंमन्य वाटतात आणि अनुभवानें मात्र निराळें पटतें! फुलझाडांच्या बागेला तारेचें कुंपण असावें तसें काळे यांच्या स्वभावाला त्यांच्या दांभिक आणि अहंमन्य दिसणाऱ्या चेहऱ्याचें कुंपण असावें!

" काळे, मला तुमची मुलाखत घ्यावयाची आहे ' मी एक दिवस श्री. काळे यांस सहज विचारलें.

' मग घेऊन टाका—! ' श्री. काळे बेदर्दपणानें म्हणाले.

' मग केव्हा येऊं आपल्याकडे ? ' मी जरा विनीत स्वरानें विचारलें.

" माझ्याकडे यावयाला कशाला पाहिजे ? आज इतकीं वर्षे आपण एकमेकांना भेटतो आहो, आणि एकमेकाशीं मनमोकळेपणानें बोलतो आहों—तुम्हीच सवडीनें मुलाखत लिहून काढा—फारसा अवखळपणा त्यांत करूं नका, तुमचे विचार माझ्या तोंडीं घालूं नका, आणि साधारण मुलाखतीनंतरहि तुमचा आमचा स्नेह टिकावा एवढी खबरदारी घ्या—आणि हो, छापण्यापूर्वी मला एकदा दाखवा म्हणजे झालं! '—आणि श्री. काळे एवढें शांतपणानें बोलून गमन करते झाले.

आणि मग एक दिवस मी माझ्या सवडीप्रमाणें श्री. काळे यांच्याकडे गेलों आहें अशी कल्पना केली. त्यांनीहि माझें आगतस्वागत केलें असें गृहीत धरलें. चहा, फळें, बिस्किटें मनातल्या मनात खाल्लीं आणि आम्ही एकमेकांकडे ' मुलाखित ' व ' मुलाखत्या ' या दृष्टीनें पाहिलें.

ती वेळ संध्याकाळीं सहाची होती. खूप खूप पाऊस पडून गेला होता, तरीहि अद्याप आभाळ कोंदटलेलेंच होतें. हवेमध्यें अत्यंत सर्दपणा आला होता; त्यामुळे नेहमी ओढणाऱ्यांचें सोडूनच द्या—पण कधीहि न ओढणाऱ्या माणसालासुद्धां—विडी सिगरेट किंवा चिरूट ओढावासा वाटला असता. इतकी हवा त्या दिवशीं सर्द झालेली होती!

माझ्याकडे एक गंभीर दृष्टिकटाक्ष टाकीत श्री. काळे कांही तरी शोधूं लागले. त्यानी बरीचशी शोधाशोध केली, पण त्यांत त्यांना यश आलेलें दिसलें नाही. अखेर कपाटावर असलेलें एक ' रक्षापात्र ' त्यांनी माझ्यापुढे आणून ठेवलें व इझिचेअरवर बसून त्यांनी आपले दोनहि पंजे एकत्र करून लांबलचक आळस झाडला!

मीही स्तब्धपणाने खिशांत हात घातला आणि खिशांतील चार मोडक्या आणि दोन धडक्या विड्या बाहेर काढल्या—त्यांतील मोडक्या विड्या रक्षापात्रांत टाकून दोन धडक्या विड्याकडे मी अभिलाषाच्या दृष्टीने पाहूं लागलो.

श्री. काळे यांनी नेहमीच्या सवयीने ओळखलें की माझ्याजवळ काड्यांची पेटी नाही. ते ताडकन् उठले. वास्तविक त्यांनी कोणाला तरी काड्याची पेटी आणावयाला सांगावयाची; पण ते स्वतःच खाली गेले आणि त्यांनी काड्यांची पेटी आणून माझ्यापुढे ठेवली.

साधारण मी अदमासाने ओळखलें होतें की माझ्या समोरच्या विद्वानाला त्याची पाइप किंवा चिरूट सापडत नाही म्हणून ही स्तब्धता आली असावी. त्यांनी आपल्या खिशांत हात घातला आणि पाइपमध्यें ओढण्याची तंबाखू ठेवण्याची चामचंची बाहेर काढली व ती त्यानी एक उसासा टाकीत समोरच्या 'पेयमेजावर'* टाकली.

—पण त्या चामचंचीचा खुळकन् आवाज झाला!

—तंबाखूचा कधी आवाज होतो काय?

—पण झाला खरा.

—मी ती चामचंची हातांत घेतली आणि तिचा पीळ उलगडून पाहिलें तो त्यांत दीड रुपयाची चिल्लर निघाली. एखाद्या इतिहास-संशोधकासारखा मी त्या नाण्यांकडे पाहत राहिलो. आणि दिव्य दृष्टीने एखाद्या गोष्टीचें आकलन व्हावें त्याप्रमाणें माझ्या लक्षांत आलें की, काही तरी विचाराच्या तिरमिरींत या विद्वानाने 'धूम्रपान' तहकूब करण्याचें ठरविलें असावें—पण लगेच हवा अशी पावसाळी व कुंद पडेल हें त्या विद्वानाला काय माहीत? हवेमुळे श्री. काळे याचा तो निश्चय आता डळमळूं लागला असावा!

आणि हें माझे म्हणणें लगेच खरें ठरलें. कारण मी परत पेयमेजावर टाकलेल्या तंबाखूच्या चामचंचीचा श्री. काळे यानी वास घेण्याला सुरुवात केली.

* 'टीपॉय'

त्या काळे यांच्या कृतीने मला आत्मप्रत्ययाचा आणि पुनःप्रत्ययाचाहि आनंद झाला. कारण मीहि असा सहासहा महिन्यांच्या अंतराने पांच-पांच मिनिटें किंवा क्वचित् पाच-दहा तासहि§ विडी न ओढण्याचें ठरवतो. त्याच वेळीं विड्यांची पेटी रिकामी करतो---आणि आता त्यांत आपण विड्या ठेवणार नाही म्हणून त्यांत पोस्टाचीं तिकिटें ठेवतो. पहिल्या-पहिल्यांदा मी अशा निश्चयाच्या वेळीं, त्या वेळीं हयात असलेल्या विड्या मोडून टाकीत असें. पण माझ्या निश्चयाच्या अनुभवाने मी आता विड्या मोडून टाकीत नाही; तर "राहूं देत ! आपल्याला ओढावयाच्या नसल्या तरी येणारा जाणाराला होतील !" अशी मनाची समजूत करून मी त्या अलीकडे तशाच राखून ठेवतो---आणि मग त्या पुनः माझ्या मलाच उपयोगी पडतात !

---आणि क्षणा दोन क्षणानेच श्री. काळयांमध्यें काही तरी विचाराने गतिमानता आली. त्यानी एक जाभई दिली. आणि स्निग्धपणाने माझ्या-कडे पाहत ओठांतल्या ओठात ते पुटपुटले, 'जोशीबुवा, आणा पाहूं जरा तुमची विडी---आज विडी ओढून पाहतों जरा !'

माझ्याजवळहि त्या वेळेला नेमक्या दोनच विड्या होत्या; तरीहि नाइलाजाने मी त्यातील एक विडी श्री. काळे यांस दिली. श्री. काळे यानी ती विडी पेटवून त्याचे एकदोन झुरके घेतले आणि कांही तरी आवेगाने त्यांनी ती विडी विझवून टाकली.

आणि कांही तरी आवेगाने त्यांनी आपल्या माणसाला हांक मारली आणि आपल्या खिशांतील एक कोरी करकरीत दहाची नोट बाहेर काढीत त्या माणसावळ देत काळे म्हणाले---

'एक गोल्ड फ्लेक पाकीट---आणखी एक सिगार, (ज्याला आम्ही चिरुट म्हणतों) ची पेटी आणि 'थ्री नन्स्' किंवा 'प्लेअर्सच्या' तंबा-खूचा टीन जलदी लाव !'

§ शाळेचे किंवा कॉलेजाचे तास. ते कधी कधी तीसपस्तीस किंवा फार तर पंचेचाळीस मिनिटांचे असतात.

तो माणूस निघून गेला. आणि काळे मला म्हणाले, ' हं जोशीबुवा, आमच्या मुलाखतीचा विषय काय ठरविला आहेत तुम्ही ? बाकी तुमची गेल्या अंकातील श्री. गोरे यांची मुलाखत एका प्राण्याला भयंकर झोंबली आहे. कळलच असेल तुम्हाला—'

" आल आहे कानावर माझ्याहि—पण तो तर आपल्या विद्वत्तेची शेखी मी ' सह्याद्रि ' वाचीत नाही अशी मारीत असे ! आणि आता म्हणतो आहे की, ' सह्याद्रींत ' त फक्त जोशी याच्या मुलाखती गलिच्छ असतात, बाकी अंक फारच चागला असतो ! मी मनांत समाधान मानल. की निदान माझ्या मुलाखतींमुळे हे जे बुरसलेले काही विद्वान ' सह्याद्रि ' कडे डोळे झांक करीत होते त्याचे डोळे उघडले हें काय थोड झालं ! इंग्लिश वाङ्मयाचे हे ब्लॉटिग पेपर मराठीकडे या निमित्ताने जरी डोळे उघडून पाहावयाला लागले, तरी माझ्या लिखाणानें फारच चागले काम केल अस मी समजेन ! "

' बर, माझ्या मुलाखतीचा विषय ?' काळे यानी उत्कंठेने विचारलें.

'तंबाखू !' मी शातपणें विडीचा झुरका ओढीत म्हटलें 'खरच, काळे, तुम्ही तंबाखू ओढायला केव्हापासून लागला ? पण कारण खरं सागा ह—मुलाखतींत छापून यायचं आहे म्हणून सजवून काही तरी सांगू नका ! "

काळे आळस देत म्हणाले, ' खरं सांगू. मध्यतरी मी रिकामा होतों—बऱ्याच वर्षापूर्वीची गोष्ट आहे ती—तेव्हा केवळ एकट्यानें वेळ काढण्याचें साधन म्हणून मी तंबाखू ओढावयाला लागलो. रिकामपणामुळें बहिर्मुख झालेलें मन अंतर्मुख करून चित्तस्वास्थ्य मिळविण्याचें तंबाखू हें जडसाधन आहे ! तंबाखूचा धूर डोळे मिटून तोंडांतून सोडतांना आपण केवळ पूर्णतेचे पुतळे आहो असा मनाला क्षणिक भास होतो. तंबाखू जरी थोडी अपथ्यकारक असली, तरी एकदा तंबाखूशीं आपण तादात्म पावलो की ती बौद्धिकताप्रधान असून विचारांची गतिमानता वाढविते हें प्रत्ययास येतें ! तंबाखूचें पान चालू असतां कित्येक मौलिक विचार सुचून त्या भरात लेखनांत आत्मप्रकटीकरणहि चांगलें होतें !'

' काळे' मला तुमचं म्हणणें पटलें ! कारण स्पष्टच बघा तुमच्या तोंडांत पाइप अगर सिगार नसल्यामुळे तुम्हाला जरीं आपण आत्मप्रकटीकरण

चांगलें करतों आहोंत असें वाटत असलें तरी माझ्या तें नीटसें लक्षांत येत नाही—तेव्हा आपल्या सिगार्स आल्यानंतर आपण आपली मुलाखत पुढें चालू करूं!'

तोंच काळ्यांचा माणूस सिगार सिगारेट्स व तंबाखू घेऊन आला. श्री. काळ्यांनी एक सिगार पेटविली--आता श्री के. ना. काळे खरें रंगांत आल्यासारखे मला वाटू लागले आणि त्यांनी मला विचारलें. 'खरंच, जोशी बुवा आपण केव्हा विड्या ओढूं लागला?'

'आपणाला माहीतच आहे की, माझें पूर्वायुष्य बरेंच अडचणींत गेलें आहे! आणि त्यातच मला लेखनाचा नाद लागला, तेव्हां माझ्या आप्तेष्टाची माझ्याबद्दलची होती नव्हती तीहि सहानुभूति नाहीशी झाली—आणि त्याच अवस्थेंत मी केव्हातरी सिगारेट ओढूं लागलो. वास्तविक व्यसन हें नेहमी स्नेह्यासोबत्याकडून लागतें—पण माझें विडीचें व्यसन माझें मीच लावून घेतलेलें आहे! मी सिगारेट्स ओढतों हें कित्येक दिवस माझ्या स्नेह्यांना देखील माहीत नव्हतें! आणि पुढे परिस्थितीनें सिगारेट्स परवडेनात तेव्हा मी विड्या ओढूं लागलों! आणि आता सिगारेट्स परवडणें शक्य आहे तरी विडीची चव तोंडांत बसली आहे—ती मजा सिगारेटमध्ये वाटत नाही—!

'बरं काळे, तुम्ही मध्ये सिगारेट काही दिवस सोडली होतीत--ती पुनः कां ओढायला लागलांत?'

'हं, त्याचं विश्लेषणहि करण्यासारखं आहे! काय होतं, आपण स्वतःच्या अशा कांही नीतिअनीतीच्या--न्यायअन्यायाच्या कल्पना ठरविलेल्या असतात—आणि त्याच्या विरुद्ध जर अनुभव आला--त्या वेळेला व्यावहारिकपणानं तो कटु अनुभव आपल्याला न बोलता सोसावा लागला--तर त्या वेळीं तंबाखू ओढणं ही एक परिस्थितींतून सुटका वाटते!'

'मलाहि अनुभव आहे त्याचा!' मी पटकन् बोलून गेलों. 'पण काय हो काळे, माझें नुसतं विडीवर भागतें आणि तुम्हांला सिगार, सिगारेट्स, पाइप इत्यादि त्रिविध साधनें लागतात तेव्हा आपल्याला सामाजिक अन्यायाशीं जास्त तोंड द्यावं लागतं अशी मी कल्पना करूं काय?'

'कल्पना केल्यास माझी कांही हरकत नाही! पण तसं कांही नाही! बरं पण जोशीबुवा, माझी मुलाखत 'विचारप्रवर्तक आणि मार्गदर्शक' होणार म्हणून अगोदरच जाहिरात केलीत आणि मुलाखतीकरिता विषय निवडलात तंबाखू—तेंव्हा माझ्या मुलाखतींत निदान एखादा तरी विचार यावा!' इतके बोलून श्री. काळे यानी आपल्या तोंडांतील सिगार विझवली, आपला आवडता पाइप बाहेर काढला, त्यांत तंबाखूची एक बारीकशी पुरचुंडी करून घातली आणि त्या तंबाखूला काडी लावीत व एका मागून एक धुराचे फवारे सोडीत काळे बोलूं लागले.

'मानवी जीवनात मनुष्यप्राण्याला अन्नवस्त्राइतकीच जर कोणत्या तिसऱ्या गोष्टीची जरूरी असेल, तर ती विसाव्याची! प्रत्येक मनुष्याला कामाइतकीच करमणुकीची आवश्यकता आहे! याबद्दल या विसाव्या शतकांत तरी कोणाचें दुमत होईल असें वाटत नाही! उद्योगप्राप्त ज्ञानामधून मानव जातीची भौतिक प्रगति झाली असली तरी करमणुकीसाठी काढलेल्या कल्पनांमुळें त्याच्या सांस्कृतिक विकासाचा मार्ग चोखाळला गेला आहे! उद्योगानंतरच्या विसाव्याच्या क्षणातून कलाचा जन्म झाला नसता, तर मानवी जीवनाला रुक्ष, नीरस आणि कंटाळवाण्या कलहापेक्षा वेगळें स्वरूप प्राप्त होणें अशक्यप्राय झाले असते! विज्ञनाने मनुष्याला सृष्टींतील शक्तींवर प्रभुत्व दिलें, तर कलांनी त्याच्या जीवनात सौंदर्य, सरसता आणि उत्साह यांची भरती केली! यामुळे ज्ञानाइतकीच कला हेंहि मानवी जीवनाचें एक अंग समजणें भाग आहे! म्हणून कलेचें पावित्र्य संभाळणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे! मनुष्यानी आपले विसाव्याचे क्षण वाटेल तसे उधळण्यापेक्षां—तंबाखू पीत घालविणें बरें! पण त्याहिपेक्षां दुसऱ्या कोणत्या तरी अतीव चांगल्या तऱ्हेने घालविणें जास्त श्रेयस्कर पथ्यकर—!'

'काळे,—मला हें तुमचें म्हणणें फार आवडलें पण यांत कांही म्हणीवजा इंग्लिश शब्दांचीं घुंगरं असतीं तर बरें झालें असतें! मला सध्या प्रा. फडक्यांच्या भाषणांतील 'लिटरेचर फॉर दी पीपल, बाय दी पीपल ॲन्ड ऑफ दी पीपल' या त्रिसूत्रीचीं घुंगर ऐकतांना फार कर्णमधुर वाटतात!'

'पण त्यांच्या पाठीमागे आत्मप्रत्ययाचा विशेष जोर नसल्यामुळे आमच्या मनावर त्याची मोहनी पडत नाही! आणि शिवाय ही त्रिसूत्री

पहिल्यांदा आब्राहाम् लिंकन् यांनी ज्या एका विशाल भव्य आणि समर-प्रसंगीं वापरली त्यांत फक्त एका शब्दाचा फरक करून—आब्राहाम लिंकनचें मूळ वाक्य आहे ' गव्हर्नमेंट फॉर दी पीपल, बाय दी पीपल ॲन्ड ऑफ दी पीपल ! '—'लहान मुलें अभ्यासाच्या पुस्तकातील चित्रांवर मिशा-गंध-किंवा लुगडे, चोळी वगैरे पेन्सिलीने काढून त्या चित्रांची दुर्दशा करतात त्याप्रमाणें प्रा. फडक्यानी त्या मूळ वाक्याचे हाल चालविले आहेत ! मला प्रा. फडक्यांबद्दल फार आदर आहे ! '

' असं होय, मग समजा मी उद्या तंबाखू या विषयावर व्याख्यान दिलें—आणि हींच शब्दाचीं घुंगरं 'टोबॅको फॉर दी पीपल, बाय दी पीपल, ॲन्ड ऑफ दी पीपल—हंऽहं ! असें म्हटलें तर चालेल काय ? '

'जोशीबुवा, मुलाखतीच्या शेवटीं आपण थोडें गंभीर वातावरण ठेवूं या ! '

ठीक आहे—मग तुम्ही दिग्दर्शक आहांत, मी लेखक आहे—तो वाद लढूं या आपण आता ! '

'पण त्याच वेळेला मीहि काही चित्रकथा लिहिल्या आहेत हें विसरू नका ! '

' काळे, तें मलाहि माहीत आहे ! आपण बी. ए. एल्एल् बी. आहांत नट आहांत, दिग्दर्शक आहात, कथालेखक, टीकाकार आहात, आपण पुरुषसूक्त आणि पुढेहि म्हटलेलें आहे आणि शिवाय विद्वान् आहांत —आणि तुमच्या बाबतींत तुम्हाला विद्वान् म्हणून मी फार घाबरतो ! माझ्या लेखनाच्या कांही कल्पना मी आपल्या विद्वत्तेत तपासून घेतलेल्या आहेत आणि त्याप्रमाणें आपल्या विद्वत्तेचा फार उपयोग होतो आणि झालेलाहि आहे ! आणि शिवाय आपण पूर्ण गृहस्थवृत्तीचेहि आहात. फार काय सांगावें ? काळे आपल्या लक्षात नसेल आपण माझ्या वादविवेचन-मालेचे वर्गणीदारहि आहांत ! पण आज आपण प्रसिद्ध आहांत प्रामुख्याने दिग्दर्शक म्हणून ! तेव्हा त्या बाबतींत मी कांही प्रश्नोत्तरें करतो ! '

' ठीक आहे ! ' श्री. काळे म्हणाले. त्यांनी चालू असलेलें आपलें धूम्रपान संपविलें—आणि एक नवा चिरूट पेटवीत ते इझिचेअरवर जरा गुर्मीत आल्यासारख्याच चेहऱ्यानें आडवे झाले.

'लेखक—दिग्दर्शक हा वाद दोन निरनिराळे मीडियम् तंत्र वगैरे शब्दांच्या धुमाकुळाने आपण जिंकू शकाल. पण तत्त्व आणि व्यवहार यांची जेव्हा फारकत होते—ते सोडा. मी तुम्हांला एक प्रश्न विचारतों. लेखकापेक्षा दिग्दर्शक श्रेष्ठ असतो हें मी पहिल्यांदा गमतीखातर कबूल करतो, पण—पगारी दिग्दर्शक आणि मालक दिग्दर्शक या दोघांनी दोन स्वतंत्र चित्रपट काढले, तर मालक दिग्दर्शकाचा जितका गवागवा आणि प्रसिद्धि होते तितकी पगारी दिग्दर्शकाची होते काय? त्यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट मालक दिग्दर्शकाच्यापेक्षा चांगला असला तरी? कलेच्या वजनमानानें? तुम्हांला या बाबतीत काय अनुभव आहे?"

"अहो जोशीबुवा. येवढें का जग सोवळं आहे—अहो, व्यवहार आहे हा!" श्री. काळे यांनी आणखी एक धुराचा फवारा सोडला.

"यापेक्षाहि मला स्पष्ट उत्तर पाहिजे!" मी आग्रह धरला.

श्री. काळे यांनी माझ्याकडे जरा त्रिरसटलेल्या दृष्टीनेच पाहिलें. डोळे जरा विचारप्रवर्तक दृष्टीनें फिरविले—तोंडानें हळूहळू धूर सोडणें चालू होतेंच.

मी शांतमनानें श्री. काळ्याकडे पाहात होतो.

पांच मिनिटें गेलीं—दहा मिनिटें गेलीं—आणि श्री. काळ्यांचे डोळे मिटल्यासारखे मला वाटले आणि एकदोन मिनिटांत तर त्यांचें घोरणेंहि मला चक्क ऐकायला यायला लागलें.


मला आता तिथून उठताहि येईना आणि धड तिथे बसताहि येईना—मी श्री. काळ्याकडे गंभीर दृष्टीनें पाहात बसलो आणि नंतर मलाहि केव्हा झोप लागली हे माझ्याहि लक्षात आलें नाही!

आणि नंतर मला वाटतें सुमारें अडीच तासांनी श्री. काळे यांच्या पत्नी सौ. शांताबाई, त्यांचे मुलगे—प्रमोद अशोक यांच्या हसण्याचा केवढा तरी आवाज ऐकून आम्ही दोघेहि जागे झालों—माझी नजर चटकन् समोरच्या घड्याळाकडे गेली—मी मुलाखतीचे कागद खिशांत कोंबीत जीना उतरूं लागलो.

श्री. काळे बसल्या जागेवरून मला चहा घेऊन जाण्याबद्दल आग्रह करूं लागले—पण मुलाखतीचा हाच गंमतीदार शेवट मला फार आवडला

आणि चहाकरिता थांबल्यास—आणखी कांही प्रश्नोत्तरें पुढं होतील या भीतीने मी तडक घर गांठलें.

माझे मित्र श्री. के. ना. काळे याची जेव्हां मी मुलाखतीकरिता निवड केली. तेव्हां मलाहि त्या मुलाखतीबद्दल फार आशा होती. पण प्रत्यक्ष ती मुलाखत लिहिण्याचा जेव्हा प्रसंग आला—तेव्हा माझी निवड चुकली असें मला वाटलें. कारण व्यवहार ! श्री. काळे यांच्या मुलाखतींत जे



माझ्या "मालक दिग्दर्शक" आणि "नोकर दिग्दर्शक" या प्रश्नावर श्री. काळे घोरूं लागण्यापूर्वी !

विचार आणि जीं मतें मला मांडायचीं होतीं—त्यांचे जे विशिष्ट अनुभव यावेत अशी माझी इच्छा होती—पण व्यवहार !

—ही मुलाखत म्हणजे व्यावहारिक कुचंबणेचा एक भयंकर नमुना आहे.

अखेर शेवटीं त्याच्या मुलाखतीकरिता मला 'तंबाखू' हा निर्जीव विषय निवडावा लागला. मी मनांत धरलेल्या प्रश्नांची श्री. काळे यांनीहि निर्भीड उत्तरें दिली असतीं—पण मलाच तें करणें बरें वाटलें नाही.

अखेर एकच सांगतों—सिनेमा दिग्दर्शकांच्या ज्या जातींबद्दल माझा रोष आहे, आणि जो एक नादान विद्वान् त्या जातीचा लाचारीने सध्या बुरख्याआडून पाठपुरावा करीत आहे, त्या जातींतले श्री. के. ना. काळे नाहीत—येवढेंच त्याच्याबद्दल आदराने सांगतो ! त्यांनी चित्रपटकथा लिहिल्या—त्या आपण लिहिल्या आहेत हें त्यांना आज सांगावें लागतें—पण त्या चित्रपटकथाचा दिग्दर्शक मात्र आपलें नांव गाजवून आहे. ही परिस्थिति अत्यंत चीड आणणारी आहे हें मात्र श्री. काळ्यांच्या परवानगी-शिवायहि येथें सांगून टाकतो !

श्री. गंगाधर भाऊराव निरंतर, एम्. ए. : : ८

मी माझ्या एका गोष्टींत एका तरुणाचें असें वर्णन केलें आहे—

'मी बी. ए आहें, बी. एजी. व बी. एस्सी. आहें! बी. कॉम्., जी. डी. ए. आहें. इंग्लिश मराठी शॉर्टहॅंड टाइपिस्ट आहें—यंदा एच्. पी. ला बसलों आहें आणि एच्. पी. चा निकाल लागेपर्यंत मी सध्या एका ओळखीच्या डॉक्टरकडे कंपाउंडिंग करीत असतों. एक परीक्षा पास होऊन तेवढ्यांत नोकरीचें कुठे जुळलें नाही तर मधल्या वेळांत मी कोणची तरी एक परीक्षा देतों—आणि आता एच्. पी. होऊनहि जर माझ्या नोकरीची कुठे सोय झाली नाही तर मात्र पुढे कोणच्याहि परिक्षेच्या नादीं न लागतां मी तालमींत जाणार आहें!'

माझे स्नेही श्री. निरंतर यांची मुलाखत घेण्याच्या विचारांत असतांना

वरील वाक्यें मला सहज आठवली. कारण श्री. निरंतर यांच्या आयुष्याशीं त्याचें बरेंच साम्य आहे !

श्री. निरंतर एम्. ए. आहेत. गेल्या वर्षी धादलीत ते एस्. टी. सी. लाहि बसणार होते आणि त्याप्रमाणें त्या शिक्षणाला जायला त्यांनी सुरवातहि केली होती. पण तें अपुरेंच राहिलें. पीएच्. डी. साठी 'फायलॉलजी' वर ते एक थीसीसहि लिहीतच आहेत—त्यास आज चार वर्षे झालीं ! आणि चालू वर्षी गांधी ट्रेनिंग कॉलेजमधून एक वर्षाची रजा घेऊन ते बी. टी. होण्याच्या तयारीला लागले आहेत !

या गृहस्थाची गांठ घ्यायची म्हणजे कोण पंचाईत ! भेटला तर दिवसांतून चार वेळ भेटेल आणि नाही म्हणजे सतत हेलपाटे घालून महिन्यामहिन्यात भेटणार नाही !

त्यांच्या घरावर 'आहेत' 'नाहीत' अशा पाट्या आहेत. कॉलबेल आहे—घरात माणस आहेत; पण—

'निरंतर आहेत का ?'

'अं हं—आज सकाळींच कुठे बाहेर गेले आहेत !'

'केव्हा परत येतील ?'

'तसं काय सांगावं ? काल सकाळीं गेले ते रात्रीं अकराला परत आले !'

—या गृहस्थाची मुलाखत मी या महिन्याला घ्यायचें ठरविलें आहे हें त्यालाहि माहीत होते—पण त्यांची माझी गांठच पडेना !

अखेर परवा सकाळपासून पिच्छा धरला. त्याच्या सर्व स्नेह्यांचीं घरें पालथीं घातलीं. गावात सभा कुठे कुठे आहेत तेथेहि पाहिलें—कुठेहि आस्थेने काम करण्याची या गृहस्थाची सवय पाहून आणि गांवांत सध्या लग्नसराई चालू असल्यामुळे, मला थट्टेने वाटलें, गांवांतील एखाद्या लग्नांत 'अत्तर गुलाब' वाटायला तर हा गृहस्थ गेला नाही ?

अखेर कंटाळलों आणि बादशाही बोर्डिंगांत चहा घेऊन परत घरीं यावें असें मनांत ठरविलें. बादशाही बोर्डिंगच्या एका स्पेशल रूमवर 'रिकामी' अशी पाटी होती—मी दार उघडलें.



श्री. गं. भा. निरंतर

—आणि प्यालेल्या चहाची कपबशी टेबलावर अस्ताव्यस्त पडली —आणि आमचे निरंतर महाराज अगदी रिकाम्या आणि शुष्क मनाने सिगारेटचे झुरके ओढीत बसले आहेत!

मला पाहून निरंतर दचकले. त्यांनी त्या धांदलींत माझ्याकरितां चहा मागविला. मी त्यांच्याकडे पाहून नुसता हंसलों!

'जाऊं द्या हो जोशीबुवा—कसली आली आहे मुलाखत! चहा घ्या—दोन विड्या ओढा—आणि जाऊं आपण आपआपल्या घरोबर! मला आज खरोखरच कंटाळा आला आहे!'

'बरं, मुलाखत राहूं द्या! मलाहि कंटाळल्यासारखें झालेंच आहे! फिरायला येतां आज कुठें तरी?—चला दोघेच जाऊं!' मी म्हटलें.

'कुठे जाणार फिरायला आता? चला फार तर एस्. पी. कॉलेजच्या ग्राउंडवर—कुठे तरी एकीकडे जाऊन बसूं!'

मी मानेनेच आपली संमति दर्शविली; आणि आम्ही दोघेहि तिथून उठून कॉलेज ग्राउंडवर अगदी कोपऱ्याला—जिथे आजूबाजूला कोणी फिरकणार नाही अशा ठिकाणीं—जाऊन बसलों.

पंधरावीस मिनिटें आम्ही इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या.

संध्याकाळचे साडेसात वाजून गेले होते. तो चांदण्याचा पंधरवडा होता. आजूबाजूला मोठी मजा दिसत होती.

आणि तशात मध्येच एखादी येणारी वाऱ्याची झुळूक—'काय समजलं ना?' असं जसं आपण एखाद्याला हलवून विचारतो त्याप्रमाणें ती मध्येच येणारी वाऱ्याची झुळूक आजुबाजूच्या सृष्टिसौंदर्याबद्दल 'काय समजल ना?' असेंच जणु म्हणत आहे, असें मला वाटत होतं!'

'निरंतर—तुमचे वडील गेल्याला दोन वर्षे होत आलीं नव्हे?' मी विचारलें.

'हं—' निरंतर एक निश्वास सोडीत म्हणाले.

'—आणि मला वाटतं तुमची सुधा गेल्याला?'

'वडिलांच्या अगोदर सहा महिने—नंतर वडील गेले—आणि नंतर सहाच महिन्यानी आमचा आजचा हसता खेळता अरुण जन्माला आला!'

'निरंतर—मला वाटतं तुमच्या आमच्या ओळखीला दहा बारा वर्षे तरी झालीं असतील; पण आपण तुमच्या खाजगी आयुष्याबद्दल कधीच काही बोलले नाही! आज तुमची लहर लागत असेल तर बोलूं या काही तरी!'

'खाजगी आयुष्य! काय करायचं आहे बोलून?'

'सहज गंमत म्हणून! तुमच्या जुन्या आयुष्यांतून पुन्हा तेवढीच एक फेरी मारून आल्यास तुमच्याहि मनाला जरा गंमत वाटेल! आणि मलाहि एक नवें आयुष्य कळल्याचा आनंद वाटेल! पण तुमचें खाजगी आयुष्य जर अगदीच भकास असेल तर मात्र माझा आग्रह नाही!'

'भकास!' निरंतर उत्तेजित स्वराने म्हणाले, 'अरे दोस्त, माझं ाजगी आयुष्य मोठं मजेदार आहे!' संपत आलेली सिगारेट जमिनीवर झवून, पाण्याच्या पृष्ठभागावर लहरी उत्पन्न करण्याकरिता आपण एखाद्या लाशयावर जसा खडा फेकतो त्याप्रमाणें तें विझवलेलं सिगारेटचं थोटूक मोर भिरकावीत आणि एकदम उठून उभे राहून एकदा मोठ्यादा हसत रंतर पुनः खाली बसले आणि म्हणाले—

"आमचे वडील—आम्ही त्याना 'भाऊ' म्हणत असूं—काय अभि- ानी होते! ते एक साधे मराठी शिक्षक होते! धड ना उजेड, धड ना ंधार अशा या आत्ताच्या वेळेवरून मला माझ्या आयुष्यातील एका सगाची आठवण होते आहे!—मला वाटतं त्या वेळीं मी मराठी चौथींत वा पाचवीत होतो. माझा थोरला भाऊ दादा, माझ्या तीन बहिणी आणि झी आई असे आम्ही घरांत बोलत बसलो होतो—तोंच माझे वडील हेरून आले. वडिलांच्या काहीशा ताठर आणि स्वाभिमानी मनोवृत्तीमुळे ही एका प्रकरणांत त्यांचा पगार थोडा कमी झाला होता!

वडील घरा येताच त्यांनी ही हकीकत घरांत सांगितली आणि आम्हां घां मुलाना हाक मारून ते म्हणाले, 'दादा-पंडित—मला माझे वडील पंडित' म्हणत—आजपासून सूर्यास्ताच्या आत घरांतील जेवणें झालीं हिजेत! आजपासून सूर्यास्तानंतर घरांत येणाराला जेवण बंद! आता ापल्याला काटकसरीने राह्यला पाहिजे! इथून पुढे घरात एकच दिवा ागेल आणि तोसुद्धा फक्त काही वेळ!'

त्या लहानपणांतहि मला माझ्या वडिलांबद्दल आदर वाटला! 'सूर्यास्ता- तर जेवण बंद!' ही आम्हांला शिक्षा न वाटता एखादें व्रत घेतल्या- ारखा आम्हांला आनंद वाटला!

—पण नंतर लगेच दोन चार दिवसांतच आम्हां दोघां भावांनाहि ाहेरून यायला उशीर झाला. आम्ही मुकाट्याने उपाशी पोटींच निजलों— रांत आमचें अन्न तयार होतें.आम्ही डोळे मिटून गुपचुप पडलों होतों!— ामची आई! आमच्या कानावर कांही वेळाने आई—वडिलांचा ंवाद पडला.

'आजच त्यांना उशीर झाला आहे—घालूं का त्यांना जेवायला!'

'हं !' वडिलांचा हुकार आला.

नंतर आईने आम्हा दोघानांहि हाक मारली. आमच्या आईचें आम्हांला संरक्षण असे; पण ते तत्त्वच्युतीचें नरक्षण नसे ! या प्रसंगावरून आमच्या आईची तुम्हांला काही कल्पना आली तर पाहा. आम्ही दोघेहि उठलो— आईने पानें माडली, आम्ही जेवलो—कोणीहि कोणाशीं शब्द बोललों नाही–त्या जेवणाची आठवण झाली की अजूनहि–"

—निरंतराचे डोळे पाण्याने भरून आले होते.

आमच्या वडिलांचें म्हणणं काय होतं की आम्ही शिक्षणाच्या नादी फार लागूं नये—पण दादाने शिकायचें ठरविलें—मोठ्या गणपतीच्या पाठोपाठ लहान गणपतीचीहि मिरवणूक निघते–अर्थात् मीहि शिकण्याचेंच ठरविलें. वडील म्हणाले, 'शिक्षणाकरिता माझ्याकडून तुम्हाला काही मदत मिळणें आपल्या परिस्थितीनेच अशक्य आहे. तेव्हा तुम्हांला कुठे तरी वार वगैरे लावून—मला वाटतं, तो अपमान सोसण्यापेक्षा—इथे होईल तेवढ्या शिक्षणावरच !—

—दादा आणि मी पुण्याला आलो. वार लावून शिक्षण सुरू केलें. मी आणि मला आज पितृतुल्य असलेले माझे दादा याच्या मनोवृत्तीची कल्पना येण्यासारखी एक गोष्ट सांगतो तुम्हाला—एका सुट्टींत आम्ही पुण्याला लवकर परत आलो–शाळा कॉलेज सुरू व्हायला अवकाश होता–शिक्षणाकरिता वार लावण्यांत आम्हांला कधीच कमीपणा वाटला नाही–आम्हाला त्या वेळींहि वाटे, आम्हीहि पुढे बरे दिवस पाहिले की आम्हीहि शिक्षणाकरिता वारकरी ठेवूं—

—पण शाळा सुरू व्हायच्या अगोदर चार–सहा दिवस आम्ही पुण्याला आलों होतो. घरून निघतांना आमच्या मनांत विचार आला नाही; पण इथे येतांच विचार आला, 'शाळा अद्याप सुरू नाही—मग त्या मुदतींत वाराने जेवण्याचा काय अधिकार आम्हाला ?' दादा मला म्हणाला, 'पंडित–चल आपण परत घरीं जाऊं–शाळा सुरू झाल्याखेरीज–' शाळा सुरू होईपर्यंत आम्ही वाराच्या घरीं जेवायला गेलों नाही. त्या वेळीं मी लहानसा मोठा होतों; तरीहि मी दादाच्या गळ्यांत मिठी मारली--आणि संपलें--आम्ही आपले दिवस काढायला सुरवात केली !

" वडिलांची व्यावहारिक आणि स्वाभिमानी वृत्ति मला आवडत होती; पण त्या वृत्तीविषयी मला कधी फारसें प्रेम वाटलें नाही. माझ्या थोरल्या भावाची–दादाची–जवळ जवळ वडिलांसारखीच मनोवृत्ति होती; पण त्याला मनमोकळेपणाच्या दिलखुलास खिडक्या आहेत! वडिलांच्या मनोवृत्तीला मी फणसाची उपमा देईन, तर दादाच्या मनोवृत्तीला मी रत्नागिरी हपूसच्या आंब्यांची उपमा देईन!

—माझ्या दादाचें शिक्षण पुरें होऊन तो पुढें इंदूरला नोकरीनिमित्तानें गेला; पण मला पुण्याच्या आयुष्याची गोडी लागली होती–व्याख्यानें, वर्तमानपत्रें, पुस्तकें–मी पुण्यालाच राह्यचें ठरविलें. दादानीहि परवानगी दिली—कारण कुणाच्या नादी लागून मी बिघडणार नाही ही माझ्या दादाची माझ्याबद्दल खात्री होती!

—मीहि आता मॅट्रिक पास झालो होतो—आणि दरपरीक्षेच्या वेळीं एक एक कसलें तरी पुस्तक लिहून मी एक एक परीक्षा दिली. 'विवेकानंदांचा सामर्थ्यवान् संदेश' हे माझें पहिलें पुस्तक—'हिंदुधर्मावरील कलंक'—स्वराज्यशिष्टाई'—'रशियाचे गांधी'—कांही रूपांतरित कांही भाषांतरित–कारण मला कांही त्या पुस्तकांनी नांव मिळवायचें नव्हतें–फक्त पैसे मिळवायचे होते—ते माझ्या अडचणींच्या कुवतीप्रमाणें मला मिळाले! दादाच्या मदतीवर मी निर्धास्त होतो! आणि अजूनहि आहें! आज मी आता बी. टी. करिता जात आहें—नोकरीबद्दल कधी अनिश्चितता वाटली तरीहि मी नेहमी बेफिकिरच असतो. कारण मला अंतर्यामींची खात्री आहे कीं, माझ्या कशाहि परिस्थितींत माझें प्रेमानें स्वागत करायला इंदूरला एका घराचें दार अहोरात्र उघडें आहे!

देवाबद्दल लहान मुलांना जशी भीति आणि आदर वाटतो त्याप्रमाणें माझी वडिलांच्याबद्दलची भावना होती आणि आहे!

—नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेंत माझे वडील हयात असतांना माझें एकदा 'रामायणांतील सीता' या विषयावर व्याख्यान झालें. वडील नाशिकला आहेत म्हणून तें व्याख्यान मी मुद्दाम पत्करलें होतें–मनांत सहज वाटलें की वडिलांना 'त्यांचा पंडित कसा बोलतो' तें एकदा दाखवावें—म्हणून मी व्याख्यानाची खूप तयारी केली.

—व्याख्यानाला निघतांना 'कोण कोण येणार?' म्हणून मी आशाळभूतपणाने विचारलें. बहिणी येणार होत्या. आई येणार होती; पण वडील? त्याची काहीच हालचाल दिसेना. त्याना 'चला' म्हणून म्हणण्याचें धाडसहि मला नव्हतें!

—माझा सर्व उत्साह मावळला. मला घरातून निघतांनाच गुदमरल्यासारखें झालें. व्याख्यानाला गर्दी बरी जमली होती—आईहि आली होती—बहिणीहि आल्या होत्या-पण ज्यांनी यायला पाहिजे होते ते माझे वडील मात्र आलेले नव्हते!

—व्याख्यानाला सुरुवात झाली. गर्दी बरी जमली होती. पण माझ्या व्याख्यानाला काही रंग भरेना-अशीं वीस एक मिनिटें गेली-मी भिरभिरत्या नजरेने सगळीकडे पाहात होतो—आणि नाशिकला यशवंतराव महाराजाचें देऊळ आहे ना, त्या देवळाच्या पायऱ्यावर माझ्या भिरभिरत्या नजरेला माझे वडील एकाग्रतेने माझे भाषण ऐकताना मला एकाएकी दिसले!

—चतुर्थीचा उपास सोडण्याकरिता जसें चंद्रदर्शन व्हावें लागतें—तसें माझें झालें. आणि मग काय माझ्या व्याख्यानाला रंग चढला!

—व्याख्यानाहून आई बहिणीसकट मी घरीं आलो. वडील अगोदरच घरीं येऊन बसले होते. आणि त्या दिवशीं आईला कसा धीर झाला कुणास ठाऊक? ती म्हणाली, 'पंडिताच्या व्याख्यानाला किती टाळ्या पडल्या आज?

वडील गंभीरपणाने म्हणाले, 'मीसुद्धां वाजवल्या त्यातल्या काही! पण या टाळ्याचा उपयोग काय? व्यवहारात त्याची कांही किमत आहे का?'

—म्हणजे वडिलांना बहुतेक असें म्हणायचें होतें, 'चागलें बोलला—चार ठिकाणीं अगत्याचीं आमंत्रणेंहि येतील--फार तर रेल्वे खर्च देतील—टांगाभाडें वगैरे किरकोळ खर्चाचा भूर्दंडच बसेल! एकदोन दिवस फुकट जातील! आणि त्या आर्थिक जखमेवर फुंकर म्हणून फार तर एखाद्या वर्तमानपत्रांत वाचाल--'श्री. निरंतर याचें अत्यंत उद्बोधक आणि परिणामकारक भाषण झालें!'

"माझे वडील अगदी जुन्या मताचे होते. त्यांना त्यांची स्वतःचीं कामें आम्ही त्याच्या मुलांनी केल्यासहि आवडत नसे. इतके ते स्वावलंबी होते!

पण आम्हा दोघां भावांवरहि त्यांनी कधी आपले विचार लादण्याचा प्रयत्न केला नाही! जसे ज्याचे त्याने आपले कपडे वापरावेत त्याप्रमाणेंच त्यांचें आचारविचाराबद्दल मत होतें!

—नंतर मी बी. ए. झालो. लग्न केलें. एम्. ए. झालों. मला फारशी शिकलेली बायको नको होती—ती माझी एक आवड होती—मला तशीच बायको मिळाली—मला अभिमान वाटतो—तिला सर्व व्यवहार कळतो—चांगलें वाईट कळतें—तिला मतेंहि आहेत—पण तरीहि त्या मतांमुळे आमच्या संसारांत कधी गैरसमजाचे दंगे निर्माण होत नाहीत!—लग्नानंतर माझ्या आनंदाला थोडी नवी पालवी फुटायला लागली होती—मी कौतुकाने माझ्या एका लहान मेहुणीला शिक्षणाकरिता—आणली आणि हाय! ती एक दिवस चुलीवरच्या फळीवरचें पातेलें काढण्याचा प्रयत्न करीत असतां कपडे पेटून जळून मेली!

—माझे मन पोळलें! तोंच मला एक मुलगी झाली—पुनः मी आनंदाने बहरलों—ती दोनतीन वर्षांची होऊन गेली—वडील वारले आणि मग आमचा सध्याचा अरुण जन्माला आला!

—शिक्षण संपल्यानंतर—कांही दिवस ज्ञानप्रकाशांत नोकरी केली—पुष्कळ वर्षे सेवासदनमध्ये काढिलीं—शिकवण्या केल्या—नंतर 'गांधी ट्रेनिंग कॉलेज'मध्यें सध्या आहे! एक नदीचा प्रवाह येतो—वाहून जातो—पुन्हा पुढच्या वर्षी पाऊस पडतो, रुळलेल्या मार्गाने पुन्हा निराळें पाणी वहात जातें आणि त्या दरवर्षी निरनिराळ्या पाण्याच्या रूपाने लोळण घेणाऱ्या ओघाला कांही तरी एका नदीचें नांव असतें. तसेंच निरंतर वाहणाऱ्या जीवनाच्या ओघांतील पाण्याची एक सर या निरंतरची आहे!




या सुधेचा लहानसा जीवनौघ मध्येंच आटला!

—आता या नदीच्या उपमेवरून पुनः सांगतों—काय योगायोग असतो पाहा—माझ्या मुलीचा, 'सुधेचा' मी एक हात धरून मी एकट्याने फोटो काढला होता—पण तो लहानगा जीवनौघ मध्येच आटला!—माझ्या अरुणाचाहि मी परवा तसाच एक फोटो सहज काढला—अरुणच्या फोटोंत मी आहेंच; पण त्याची आईहि मागे उभी आहे! आता मात्र तें चित्र पुरें वाटतें! आता आमचा अरुण कुठे आहे म्हणून मला कावरेंबावरे-पणानें 'सुधे'सारखें पाहावें लागणार नाही—तर कित्येक वर्षानंतर 'मी कुठे आहे' हें त्यालाच पहावें लागेल! आज अरुणच्या बाललीलांत आम्ही पुनःप्रत्ययाचा आनंद उपभोगीत आहोत!

—मला सध्या शेभर एक रुपये महिना सहज मिळतात—पण खूप वेळ जातो त्यांत! त्यात शिक्षणाकरिता आपण घेतलेल्या मदतीची फेड करण्यांतच माझे पुष्कळ पैसे खर्च होतात! मी आपल्या बहिणीच्या मुली शिक्षणाकरिता जवळ बाळगल्या आहेत!—कित्येक विद्यार्थ्यांना मी या ना त्या हाताने मदत करतों—करीत राहीनच. रॉयल एशियाटिक सोसायटीची वर्गणी—पुस्तक खरेदी—मी पुनः कफल्लकच आणि ओढाताणींतच! पूर्वी वार होते, सध्या घरीं जेवतो आहें!

—परवा सहज एका पौराणिक पुस्तकांत वाचलें—श्रीरामचंद्राने राम-रावण युद्ध संपल्यानंतर सर्वांना देणग्या दिल्या—त्यात हनुमंतालाहि एक रत्नमाला दिली—हनुमत त्यांतील प्रत्येक रत्न फोडून त्यांत 'राम' आहे का पाहूं लागला—तशी माझी वृत्ति झाली आहे! मला नक्की काय हवें आहे त जरी माझें मलासुद्धा कळत नसलें—तरी मला जे पाहिजे आहे तें या भोवतालच्या पसाऱ्यांत नाही येवढें मात्र माझ्या नक्की लक्षांत आलें आहे!

—माझ्या परिस्थितीची मला कधीच खंत वाटत नाही!—पण कांही वेळेला चीड येते! कशाची? परिस्थितीची नव्हे—अगोदरच जे मानाच्या आणि सुस्थितीच्या जागा पटकावून बसले आहेत—ते त्यात स्वतःची अनन्य-साधारण कर्तबगारी आहे असें समजून आमच्याकडे तुच्छतेने पहातात, त्याची चीड येते! मोठमोठ्या जागा आज रिकाम्या झाल्या तर बेकार तरुणांतसुद्धा त्या जागांचे खरे मानकरी सांपडतील!



आता मात्र हें चित्र 'पुरें' आहे

माझ्या मनांतून प्रोफेसर व्हायचें आहे! कशाकरिता? त्या पदवीकरिता नव्हे! त्या धंद्यांत रिकामा वेळ खूप मिळतो म्हणून! माझी सर्वात मोठी महत्त्वाकांक्षा काय आहे?—लांब लांब कुठे तरी एक मोठं घर असावं—मग तें भाड्याचं कां असेना—तिथे आपल्याला हवीं तीं सर्व पुस्तकें असावींत—कोरे कागद असावेत—जीवनाकरिता जें मूल्य लागतें तें फार थोडक्या श्रमांत मिळावें—आणि बौद्धिक आनंदांत कालक्रमणा करावी!

—मी किती लिहिलं आहे ?—कितीतरी लिहिल आहे !

—'मॅट्रिक गाईड '–' इंटर गाईड '–' भूगोल गाईड '—इतिहास—कादबऱ्या—' इब्सेनचीं नाटकं '—पण ते बहुतेक सगळं ज्ञानाचें वाढप—खरं मला अजून लिहायच आहे ! वेळ येईल तेव्हा खरी !

निरंतर पुढे म्हणाले—-

" असें आहे जोशीबुवा आमचं खाजगी आयुष्य ! आम्ही समजूतदार-पणाने वागतो त्याचा अर्थ आम्ही दुबळे आहोत असा काही लोक घेतात ! "

' बरं, मग मी आता याचीच मुलाखत तयार करतो ! ' मी म्हटलें.

एकदम एखादी पावसाळी मुगी चावावी अशा तऱ्हेने व्याकुळ होत निरंतर म्हणाले, ' छे: छे: जोशीबुवा, यात काय सांगण्यासारखं आहे ? '

'—सांगण्यासारखं नसलं तरी याच्यात पुष्कळांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळेल ! निरंतर, मी अनुभवाने पण थोडें व्यापक बोलतो, खऱ्या अर्थाने घरीं जेवणारे फार थोडे आहेत—वारकरीच फार आहेत ! आणि ज्याला ही अंतरींची जाणीव आहे तीं माणस मी सामान्यांतील असामान्य समजतो ! '

' पण इतकं खाजगी ? '

' जाऊं द्या हो, दुसऱ्यांचीं घाणेरडीं खाजगी आयुष्यं चव्हाट्यावर मिरवीत असतांना या स्वच्छ खाजगी आयुष्यांना निराळंच मोल चढेल ! '

'—पण इतक्यांत आमचा नंबर कशाला लावतां ? '

' त्याचं एक कारण आहे. माझ्या अनौपचारिक मुलाखतींना अनिच्छि-तपणें जातीयतेचा वास यायला लागला आहे ! आतापर्यंत मी सहा अनौप-चारिक मुलाखती लिहिल्या; पण त्या सहाहि ओळीनं कोकणस्थांच्याच निघाल्या ! आणि मींहि कोकणस्थच आहें हें आपण जाणतांच ! तेव्हा जातीयतेची पहिली पायरी ओलांडण्याकरिता मला कोणी तरी देशस्थ पाहिजे होता. तुम्ही देशस्थ नसलांत तरच फक्त या महिन्यांतून तुमची सुटका होईल ! '

' मी देशस्थच आहें ! ' निरंतर नाइलाजाने म्हणाले.

' मग तुमची सुटका करणें आता माझ्या हातांतील गोष्ट नाही ! ' हें बोलत असतांनाच आम्ही निरंतरांचे घरीं आलों. निरंतरांनी दिवे लावले आणि मी आश्चर्याने थक्क झालो—सकाळीं मी जिथे टेबल पाहिलें होतं



" या स्वच्छ खाजगी आयुष्यांना निराळंच मोल चढेल ! "

तिथे आता कपाट होतें ! खुर्च्या होत्या तिथे आता कॉट होती—थोडक्यांत म्हणजे सर्व सामानाची अदलाबदल झाली होती !

'हें हो काय निरंतर ?'

'—अरे परिस्थिति बदलत नाही तर निदान आठपंधरा दिवसांनीं सामान तरी इकडचें तिकडे करावें— नवें बिऱ्हाड केल्याइतका आनंद होतो अशाने !' निरंतर हसत हसत म्हणाले.

—आम्ही दोघेहि खूप मोठ्याने आणि मोकळ्या मनाने हसलों आणि त्याच तंद्रींत मी घरीं परतलो !

गोडबोले आणि गोंधळेकर : : : १

केशवराव गोडबोले याच्या स्टूडिओत प्रवेश करताच ऐकू आलेल्या मिस्किल आणि मनमोकळ्या हसण्याने मी त्याना हांक मारायचें विसरूनच गेलों. इतक्या सुंदर हसण्याच्या कारणाचा सुगावा लागावा, म्हणून हांक न मारताच मी गोडबोले यांच्या स्टूडिओच्या बाहेरच्या खोलीत उभा राहिलों. आणि मिनिट–दोन मिनिटात गोडबोले याना हांक मारण्याकरिता मी तोंड उघडणार तोच आतून ऐकू आलेल्या काही शब्दानी माझें तोंड आपोआपच मिटलें गेलें आणि त्यामुळे मी आल्याची चाहूल आंत लागूं नये अशी खबरदारी घेत मी बाहेरच्या बाजूला बसून राहिलो !


"काय राजे,–" गोडबोले श्री. छबुराव गोंधळेकर आर्टिस्ट यांना म्हणत होते. "– जोशीबुवा तुमचे अगदी एवढ्या ओळखीचे सांगता– आणि अद्याप तुमची मुलाखत कशी नाही ?"



श्री. केशवराव गोडबोले, बी. ए.

[अनौपचारिक मुलाखतींचे फोटोग्राफर]

" अरे बाबा, तसंच आहे तें ! एवढा इंग्लंडला जाऊन ' डिप्लोमा इन् आर्टस ' घेऊन आलों, तरी नोकरी—धंद्याचें कुठे नीट जमत नाही—मग मुलाखतीचं इतक्यांत कसं जमणार ? निदान जोशीबुवासारख्या माणसांनी ' माझें आतापर्यंत कां जमलें नाही ? ' या मुद्द्यावर तरी माझी मुलाखत घ्यायला पाहिजे होती ! सध्या आता ब्रिलियन्ट पिक्चर्समध्ये आर्ट—डायरेक्टर आहें तें सोडा—नाही तर मला जर फ्लूटचा आणि संगीताचा नाद नसता तर डिप्लोमा उशाशीं टांगून मी स्वस्थ काळ कसा काढला असता—काय केलं असतं मी कुणाला ठाऊक ! "



श्री. गोंधळेकर आर्टिस्ट

[आर्ट डायरेक्टर, ब्रिलियंट पिक्चर्स, पुणें]

" मग नक्की तुम्ही लेखक झालां असतां! दुसरें काय करणार? —बरं, मला आता जोशीबुवा भेटले, तर त्यांना सांगतों हं मी तुमची मुलाखत घ्यायला—" श्री. गोडबोले आश्वासनपर शब्दांत म्हणाले. मी आता जरा उत्सुकतेने कांचेंतून आंत पाहूं लागलों.

केशवराव गोडबोले उमेदवारांचे अर्ज 'साहेब' जसा वाचतो त्या ऐटींत आणि रुबाबांत तेथल्या एका आरामखुर्चीवर बसले. गोंधळेकरांनीहि जरा कांही तरी रुबाबांतच ' पोज ' घेतली आणि आपली कॉलर—नेकटाय साफसूफ केली!

" मला तुम्ही असं सांगा, गोंधळेकर — " केशवराव गोडबोले म्हणाले, " तुम्ही खरंच इंग्लंडला गेलां होतां का एथेच कोठे तरी नैनीताल

महाबळेश्वर, भांबुर्डा इत्यादि ठिकाणीं दिवस काढून, पत्रव्यवहाराने लंडन ‘ डिप्लोमा इन् आर्ट्स् ’ मिळविलात ? ”

“ आपणास अशी शंका यायचें काय कारण ? ” आता दोन अधिकाऱ्यानी एकमेकाच्या चुका काढण्याचा प्रयत्न करावा अशा रुबाबात त्या दोन मित्राचें बोलणें चालू झालें.

“ शंका यायचें कारण म्हणजे असें : आपण परत आल्याला कित्येक दिवस झाले—युरोपचें प्रवासवर्णन अद्याप आपल्या नांवावर छापून आलें नाही—त्यामुळें जरा शंका येते ! आपला सर्व प्रवास झोपेत झाला काय ? बोला, अद्यापपर्यंत आपल्या नांवावर प्रवासवर्णन का छापून आलें नाही ? ” केशवराव गोडबोले खुर्चीच्या दांडीवर जोराने मूठ आपटीत म्हणाले.

“ याचें कारण मी अजून प्रवासातच आहें असें मला वाटते आहे ! ज्या दिवशीं आयुष्याला स्थिरता येईल त्या दिवशीं प्रवास संपला असें मला वाटेल ! ” गोंधळेकरानी काही तरी प्रतीकात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

“ बरं, गोंधळेकर, इंग्लंडात गेल्यानंतर आपले लोक जास्त धर्मभोळे—भिकार हे आपणास पटलें किंवा नाही ? हिंदु धर्मावरील आपला विश्वास — ”

“ अद्याप कायम आहे ! कारण हिंदुस्थानातच कायम राहणें हें माझें ‘ ध्येय ’ होतें ! एखादें इंग्लिश पिक्चर जितक्या आत्मीयतेने आपण पाहतो तितक्याच आत्मीयतेने मी इंग्लंडमध्यें दिवस घालविले ! ” गोंधळेकर म्हणाले.

“ बरं, आपले लोक मागसलेले कां राहिले याचें कारण सापडलें काय तुम्हांला तिकडे इंग्लंडच्या प्रवासांत ? तिथे गेल्याबरोबर अशीं कारणं आपल्या लोकांना पटापट सापडतात असं ऐकतों ? बरं, त्यांची संस्कृति, विचार—” गोडबोले प्रश्नाचा गोंधळ करूं लागले.

पण गोंधळेकर अचंब्याने म्हणाले, “ मला नवल वाटतं या दुधखुळ्या लोकांचं ! हिंदुस्थानांत उभा जन्म घालवून हिंदुस्थानाविषयी ज्याना काही कळत नाही, ते इंग्लंडांत जातांच दोन–चार महिन्यांच्या किंवा वर्षांच्या

उपऱ्या कालखंडांत—बरं, गेलेले असतात कसल्या तरी एखाद्या विषयाच्या अभ्यासाकरिता! तेव्हा तिथं गेल्यावर—इंग्लंडला दिपून जाणं आणि हिंदुस्थानाबद्दल मत अधिक वाईट होणं यावरच तिकडच्या युनिव्हर्सिटीच्या पदव्या देतात की काय कुणाला ठाऊक! काही अजब आहे! जेऊन-खाऊन विडा खात बसलेले तिकडचे लोक—आणि मुद्दाम उपाशीं ठेवलेले आपले लोक! एखाद्या अडचणीत सांपडलेल्या किंवा कोंडलेल्या माणसानं श्रीमंताच्या ऐषआरामीपणाकडे थिजलेल्या शरमेनं पाहण्याचं कांहीच कारण नाही!"

"वा: वा:, गोधळेकर, तुम्ही तर अगदी जहाल देशभक्तासारखे बोलायला लागलांत! मग तुमच्या दृष्टीनं इंग्लंडात आणि हिंदुस्थानांत फरक काय आहे तो सांगा पाहू?"

"फरक एकच—ते लोक सशस्त्र आहेत; आपण निशस्त्र आहोत. त्यांच्या हातात सत्ता आहे—आपल्या हातीं नाही! म्हणून ते चांगले आहेत—आपण वाईट आहोत! आणि इतक्या कृत्रिम असहाय परिस्थितींत लो. टिळक—रानडे—सावरकर—गांधी—रवींद्र—रामन्—रे......"

तें गंभीर वातावरण कांही मिनिटेंच टिकलें आणि गोधळेकर हसत म्हणाले, "त्या डिप्लोमा इन् आर्ट्स्मध्ये थोडा वशिला लावून मी फ्ल्यूट वाजवितो असें लिहून आणलें असतं, तर मला वाटतं, गणेशोत्सवात आणि एरव्ही खूप कार्यक्रम मला मिळाले असते; पण गोडबोले, सध्या परिस्थितीच इतकी कोंडल्यासारखी झाली आहे की कर्तबगारीनं डोकं वर काढायला जागाच नाही! एखादा जातिवंत नाग आपलें रान आणि बिळ सोडून मनुष्यवस्तींत यावा—म्हणजे तो कितीहि जातिवंत आणि पाणीदार असो—मनुष्यवस्तींत एक तो ठेचला तरी जाईल किंवा स्वत:ची लहर सोडून एखाद्या टोपलीत त्याला बसावं लागेल आणि एखाद्या 'पुंगाणी'च्या नादावर डोलावं लागेल! तशी कित्येक कर्तबगाराची गोष्ट झाली आहे. मग मी तर काय.........बरं, गोडबोले, मी इंग्लंडात असतांना इकडे आपण काय काय केलेंत!"

"मी एक वर्ष प्रवासात घालविलें! जवळ जवळ सगळा हिंदुस्थान पालथा घातला! सारखा प्रवास आणि तोहि चैनींत चालविला होता!

हिमालयाचीं उत्तुंग शिखरें पाहिलीं, काश्मिरच्या नंदनवनांतहि कांही काल काढला आणि अखेर शेवटीं ताजमहालाचें सौंदर्य रोज नवें नवें दिसतें असें कळल्यावरून एक वर्ष आग्न्यालाच राहायचें ठरविलें! पण त्याच वेळीं माझ्या जवळचा सर्व पैसा संपला! घरून मागवावा तर तेवढ्याच पैशांत प्रवास आटपावयाचा असें मी माझ्या मनाशीं ध्येय ठरविलें होतें–"

"मग आग्न्याहून परत येतांना बिनतिकिटाने प्रवास केलात काय आपण?" गोंधळेकरानी विचारलें.

"नाही – एका अलौकिक योगायोगाने मला पैसा मिळाला! की ज्या योगायोगाला मुलाखतींत कर्तबगारीच म्हटलं जाईल! तो योगायोग असा–"


पण गोंधळेकर गोडबोल्यांचें भाषण थांबवीत म्हणाले–"हें पाहा आता तुमची मुलाखत सुरू झाल्यासारखं दिसतं आहे–तेव्हा मी ईझिचेअरवर बसतों आणि तुम्ही उभे राहा-"

—तसें झालें.

"एका चांदण्या रात्रीं मी ताजमहालच्या चौथऱ्यावर बसलों होतों–मागे यमुना नदी वाहत होती–वायुवीचि यमुना नदीच्या पाण्याशीं खेळत होत्या! माझ्या खिशांतले पैसे संपलेले असल्यामुळे आकाशांतल्या चांदण्या मला होत्या त्यापेक्षा जास्त दिसत होत्या! इतक्यांत एक धूसर अशी मनुष्याकृति माझ्याच रोखाने धिमेपणाने येत असलेली मला दिसली–माझे केस ताठ झाले पण त्याचा फोटो घ्यावा या इराद्याने मी आपला कॅमेरा सरसावला–पण कांही तरी भानांत कॅमेऱ्यात भरायची फिल्म मी चांदण्यांत अगोदरच उघडून पाहिली–त्यामुळे ती फिल्म फुकट गेली–आणि यमुना नदीला वाहून न्यायला एक छोटीशी चिंधी मिळाली! तेव्हा मी कॅमेरा पाठीवर टाकून माझ्या खिशांतलें पिस्तुल बाहेर काढलें आणि तें त्या धूसर मनुष्याकृतीवर-"

"काय पिस्तुल?–काय केशवराव–काल कोणती फिल्म पाहिली होतीत?"

"तें पिस्तुल साखरेचं होतं! आग्न्याला जसे चार–चार सहा–सहा आण्यांला संगमरवरी ताजमहाल मिळतात, त्याप्रमाणें अगदी खऱ्याप्रमाणें दिसणारीं साखरेचीं पिस्तुलंहि मिळतात! सिनेमा कंपन्यांना फार उपयोगी!



इंग्लंडच्या बोटीवर गोंधळेकर !

[नं. १ गोंधळेकर -- त्यांच्या गळयांत हार कां नाही ? त्याचें कारण आहे. हा फोटो ते इंग्लंडला गेले त्या वेळचा नव्हेच मुळी. श्री. गोखले, ज्यांच्या गळयांत हार आहेत, त्यांना पोहोंचवायला गोंधळेकर गेले होते. त्या वेळचा हा फोटो आहे. गोंधळेकरांचा असा फोटो घेतलेला नाही. म्हणून हाच वापरला आहे.]

इतर पिस्तुलें सीनकरिता वापरल्यानंतर निकामी पडून राहतात ! साखरेचीं पिस्तुलं वापरलीं की वाटेल त्या वेळीं मोडून खाता येतात ! पण आता तशीं पिस्तुलें आग्र्यालाहि मिळत नाहीत असें ऐकतों !...... " नंतर एक थोडासा मोठा उसासा टाकून गोडबोले पुनः पुढे म्हणाले, "-तेव्हा ताजमहालांत त्या चांदण्या रात्रीं ती भेसुर मनुष्याकृति माझ्यासमोर येऊं लागली—तेव्हा मी चटकन् तें साखरेचें पिस्तुल त्या व्यक्तीच्या अंगावर रोखलें —तेव्हा ती माझ्याजवळ येणारी व्यक्तीहि आपला वेग न थांबवितां पण गुदमरलेल्या आवाजाने म्हणाली ' हात खाली करा !— मित्र !— मित्र ! ! मित्र !!! तुम्हां आम्हाला जें पवित्र असेल त्याची शपथ घेऊन सांगतों, मित्र !-"



गोंधळेकर आणि गोडबोले

[स्वतःची काल्पनिक मुलाखत तयार करतांना]

" आणि मी पिस्तुलाचा हात खाली केला ! "

" ती व्यक्ति आता अगदी माझ्याजवळ आली ! तिचे डोळे कसल्या तरी भावनेने ओलेचिंब झाले होते—एका काळसर झग्याने त्या व्यक्तीचें अंग झांकलेलें होतें. मी शांतपणाने त्या व्यक्तीचा हात धरीत म्हटलें, ' —आपण कोण आहां ? ' मला वाटलें, कांही रोमान्स असेल—पण लष्करी धाटणीच्या पुरुषी आवाजांत त्या व्यक्तीने ताजमहालाकडे पाहत म्हटलें, ' या चांदण्या रात्रीं हा ताजमहाल किती भेसुर दिसतो आहे ! ' आणि हें म्हणत असतांनाच त्या व्यक्तीने आपल्या अंगावरचा तो काळा झगा काढून टाकला. आणि—ती व्यक्ति अगदी लष्करी पेहरावांत होती व्यक्तीच्या अंगावर तलवार -- बंदूक -- पिस्तुल सर्व होतें.

‘ ताजमहाल भेसुर दिसतो आहे आपल्याला ’ मी काव्यकौतुकानें विचारलें.

‘ हं -- निदान आज तरी तो मला भेसुर दिसतो आहे ! काय सांगावं, जर कदाचित् ईश्वरी संकेत असेल, तर हा ताजमहाल मला, उद्या सौंदर्यपूर्णहि दिसूं लागेल ! पण आपण कोण आहां ? ’ त्या व्यक्तीने एकदम चमकून माझ्याकडे पाहत व सलगीने माझा एक हात आपल्या हतांत घेत म्हटलें, ‘ संकटाच्या वेळीं मनुष्य एखाद्या कीडमुंगीपासूनहि सहाय्याची अपेक्षा करतो -- मी सध्या जीवनमरणाच्या अडचणींत आहे ! – कारण -- माझी कर्तव्यबुद्धि ! मी एका संस्थानिकाचा प्रायव्हेट सेक्रेटरी आहें; आणि प्रायव्हेट मित्रहि पण आहें ! आमच्या महाराजाचं एका बाईवर अत्यंत प्रेम बसलं आहे – पण त्या बाईनं एक अट घातली आहे ! ’

‘ मला नाही खरं वाटत ! प्रेमाकरिता अडायला किंवा उसासे टाकायला संस्थानिक म्हणजे काय एखाद्या कादंबरींतला नायक आहे ?—संस्थानिक काय वाटेल तें करूं शकेल ! ’

‘ नाही; पण आमचे महाराज मनाच्या बाबतींत फार हळवे आहेत ! प्रेम – प्रेम ! प्रेम ! ’ मी आणि तो दोघेहि प्रसंग विसरून थोडा वेळ ताजमहाल पाहण्यांत रंगलों. नंतर पुनः एक उसासा टाकून, ती व्यक्ति म्हणाली ‘ त्या बाईचं म्हणणं असं आहे की, चौदा फूट लांबीच्या वाघाची शिकार केलेला फोटो जेव्हा मी तुमचा पाहीन, तेव्हाच मी तुमच्याशीं प्रेमबद्ध होईन !—असा वाघ आयत्या वेळीं कुठे मिळणार ? खरंच, इतके कलावंत जगांत आहेत. कोणी हुबेहूब चौदा फुटी मेलेल्या वाघाचें कृत्रिम प्रेत तयार करून देईल का हो ? वाघनखं आणि सुळे मी मिळविले आहेत !’

‘ काय मोबदला मिळेल ? ’ मी अधीरतेने विचारलें.

‘ कमींत कमी पाच हजार रुपये – आणि शिवाय श्रीमंत शिकाऱ्यांना असल्या कृत्रिम वाघाची नेहमी जरूर लागेल. असा जर कोणी कलावंत आपल्या आढळांत असला तर—अहो वर्षाकाठीं त्याचे असे चार—पाच तरी कृत्रिम वाघ आणि सिंह मी खपवीन शिकारीच्या फोटोकरिता ! ’

‘ देव तुमच्या तोंडांत साखर घालो ! मी असा वाघ तुम्हांला तयार करून देतों ! मी ताडकन् उठून उभा राहिलो.’

'काय म्हणता ?' त्या व्यक्तीने जवळ जवळ गदगदून मला मिठीच मारली 'चौदा फुटी वाघ? जीते रहो! त्याच्या मीशासुद्धा आल्या पाहिजेत हं!'

'हो हो – मिशासुद्धा ! चौदा फुटी काय – माझ्याकडून सवा चौदा फूट घ्या !'

'पाणी मिळेल का हो इथे कुठे ? माझ्या घशाला आनंदाने कोरड पडली आहे !–पण पाण्याने कदाचित् घसा धरेल–साखरेचा खडा आहे काय तुमच्याजवळ ?'

—मी आपलें पिस्तुल बाहेर काढलें.

तो गृहस्थ चपापला.

'तुम्हांला साखर पाहिजेना ?' मी विचारलें.

'—मग ती काय या पिस्तुलात ठेवली आहे ?'

'छे: छे:, हें पिस्तुलच मुळीं साखरेचें केलेलें आहे !' मी पिस्तुल मोडून त्याचा एक तुकडा त्या गृहस्थाच्या हातावर ठेवीत म्हटलें. आणि नंतर चार-पाच वाघांच्या ऑर्डरी मला मिळाल्या. गोंधळेकरसाहेब, आपण ज्या वाघाच्या मुंडक्यावर हात ठेवून बसला आहा, तो आमचा अगदी पहिला 'ट्रायल पीस' ! —गोंधळेकर, आणखी एका कल्पनेचं मला पेटंट घ्यायचं आहे !"

"कोणत्या बुवा !"

"एखाद्या साप्ताहिकाच्या चित्रपटाच्या किंवा व्यक्तीच्या वाढदिवसा-करिता किंवा अशाच काही प्रसंगाकरिता आता अभिनंदनपर तारा-पत्रें लागत असतात ! आणि ती हुकमी तर कांहीं येत नाहींत तेव्हा पोस्टाने जशा सात-आठ आण्याच्या 'अभिनंदन' तारा काढल्या आहेत त्याप्रमाणें पोस्टानें '**येथें पत्रांच्या तारा करून मिळतील**' असें एक खातें उघडावें; म्हणजे काय–माणसाने टाकायचें पत्रच तिकीट लावून; पण त्यावर लिहायचें 'तारेच्या रूपाने धाडावें!' आणि एक आणा जादा लावावयाचा. पोस्टानें तें पत्र फक्त तारेच्या फॉर्मावर लिहून तारेच्या पाकिटांतून धाडायचें ! किती उत्पन्न वाढेल पोस्टाचें यामुळे !" आपल्या अभिनव कल्पनेच्यां तंद्रींत आनंदून गोडबोले म्हणत होते !

पण गोंधळेकरांनी त्यांना आयत्या वेळीं सुचलेली कल्पना सांगून चीत केलें !

" अहो गोडबोले–पण यांत पत्रे लिहिण्याकरितां तरी माणसें लागतील-चना ? तीं प्रत्येकाला कशीं मिळणार ? तसं नाही उपयोगी. पोस्टाने असं करावं–पाच रुपयात अडतीस तारा आणि चोवीस पत्रं–निरनिराळ्या काल्पनिक गावाची नाव घातलेली आणि निरनिराळ्या–काल्पनिक नांवाचीं–**इंगळे–पिंगळे–वागळे** वगैरे—जेथं कामुक औषधांच्या जाहिरातींतून **एस्. एम्. मुल्ला–तिरुपत्तीहून** लिहितात त्याप्रमाणें ! येवढेंहि तुम्हांला सुचूं नये ना ? तुमच्या बुद्धीची हाय हाय !!"

—आणि दोघेहि पुनः मोठमोठ्याने हसूं लागले—त्यांचें हसणें अगदी पहिल्या थरावर आलें. तो रहस्यमय संवाद ऐकून मी तर स्तंभितच झालों होतों—पण थांबा.

ते दोघे पुनः बोलूं लागले.

" बस्स, येवढेंच पुरे, गोंधळेकर. जोशीबुवांच्या अनौपचारिक मुलाखतींत जे सांगण्यासारखं होतं तें आता सर्व सांगून झालं असल्यामुळे काही तरी आपण जुळविल्या आहेत तशा चित्रविचित्र काव्यमय खोट्या थापा मारल्याशिवाय जोशीबुवांच्या मुलाखती रंगणार नाहीत ! ' मोठ्या दगडाखाली विंचू सापडतात–' या आधारावर ज्याला पदवी किंवा पैसा मिळाला आहे अशा कोणाहि माणसाला एखादा मुलाखतदार हलवतो; पण त्या प्रत्येकाखाली शहाणपणाचे विंचू वळवळतांना कसे दृष्टीस पडणार ?"

" बरोबर ! बरोबर !! " गोंधळेकर फ्ल्यूट वाजविल्यासारखें मुद्दाम कृत्रिमपणाने मंजूळ बोलत म्हणाले, " आता आपण जी आपली मुलाखत तयार केली आहे—ती जरी धडधडीत खोटी आणि उभयतांच्या विचारें तयार केली असली, तरी त्यांत आपली मतें चुकूनमाकून आलीं असतीलच की–आता भेटूं देत जोशीबुवा–"

पुनः ते दोघेहि हसूं लागले.

—मी मुकाट्याने उठून स्टूडिओच्या बाहेर पाऊल टाकलें.

—आणि घराकडे वळणार तोंच माझी छत्री स्टूडीओंत राहिल्याचें मला आठवलें, म्हणून मी परत स्टूडिओंत गेलो—आणि मोठ्यांदा हाक मारली ‘ अहो केशवराव गोडबोले—’

—माझा आवाज ऐकून गोडबोले आणि गोंधळेकर दोघेहि थोडे गोंधळले आणि दोघेहि एकदम बाहेर येत म्हणाले, “ का हो जोशीबुवा—आज इकडे कुठे ? ”

“ कांही नाही—सहज आलों होतों ! ” मी छत्री काखोटीला मारीत म्हटलें.

गोडबोल्यांच्या पाठीवर रेलून गोंधळेकरांनी विचारलें, “ काय जोशी-बुवा, या महिन्याला कुणाची मुलाखत ? ”


“ कांही ठरलं नाही अजून ! ” मी स्टुडिओंतल्या भिंतीवर टांगलेल्या कांही फोटोंकडे पाहत म्हटलें.

“ अहो तारीख पंधरा ना आज ? – मग या महिन्याची मुलाखत लिहिणार केव्हा ? त्यांतील फोटो केव्हा घेणार ? – त्यापेक्षां असें का करीत नाही तुम्ही ? – हे इथें अनायसे फोटो काढलेलेच आहेत—या फोटोंतलींच माणसें कां निवडीत नाही तुम्ही या महिन्याच्या मुलाखतीला ? ” गोंधळे-कर साळसूदपणाने म्हणाले.

—आणि केशवराव गोडबोले त्यांना सांथ देत म्हणाले, “ हें पहा गोंधळेकरांचे फोटो तयारच आहेत. काढूं काय खाली ? ”

“ नको; माझ्या मुलाखतीला अजून अवकाश आहे ! मुलाखतीला लागणारें फक्त पूर्वायुष्य माझे तयार आहे, कर्तबगारी अजून व्हायची राहिली आहे ! नाही म्हणायाला सह्याद्रि मासिकाच्या ‘ सुखी संसार ’ अंकावरील चित्र काढून मी कांही लोकांची धांदल उडविली—यापेक्षां जास्त आमच्या आयुष्यांत काय आहे ?—

“ या मोराच्या चित्राने (पृ. १२८ पाहा) मला बक्षिस आणि प्रसिद्धी मिळाली पण त्यांतहि केशवरावांचें बरेंच श्रेय आहे; कारण हें पेंटिंग सबंध माझें आहे—पण त्याचा फोटो या केशवरावानी काढलेला आहे ! ” गोंधळेकर निस्पृहपणाने म्हणाले.



[या मोराच्या चित्राचें श्रेय एकट्या गोंधळेकरांचें खास नव्हे. कारण हें पेंटिंग जरी गोंधळेकरांचें असलें तरी त्याचा फोटो श्री. गोडबोले यांनी काढला आहे.]

पण गोंधळेकरांना बाजूला सारीत केशवराव गोडबोले माझ्यापुढे मिस्किलपणाने गंभीर चेहरा करून उभे राहात म्हणाले, "खरं पाहिलं तर आता माणसांच्या मुलाखती घेण्यापेक्षा—परिस्थितींची मुलाखत घ्यायला पाहिजे—पण तरी सुद्धा माझी स्वतःची मुलाखत द्यायची माझी तयारी आहे. या बसा असे इझिचेअरवर—पहिल्यांदा मी आपली हकीकत सांगतों; आणि शेवटीं कोणच्या मुद्यावर मी मुलाखतीला 'इयू' आहें तें नंतर सांगतों. माझे वडील असिस्टंट कमिशनर होते—तरी अजून मी हॉटेलांत जात नाही—चहासुद्धां मी पीत नाही—मग पुढे काय? तालमीचा लहानपणापासून नाद—स्नेह्यासोबत्यांचा गोतावळा बेताचाच—सरकारी नोकरीची कधी कल्पनाहि केली नाही—सहज फोटोग्राफीचा नाद लागला—तोच पुढे धंदा झाला—कबूल करायला कांही हरकत नाही—माझ्या आयुष्याला कांही ध्येय नाही! नदीच्या ओघासारखें आयुष्य—पण प्रवाह संथ आणि धीमा! आमच्याहि आयुष्याचें आम्हांला एक महत्त्व वाटतें—गतिमान जगाला त्याच्या हाल-चाली मोजायला आमचीं आयुष्यें उपयोगी पडतील! —माझ्या आयुष्यांतील एकदोन प्रसंग सांगतों. माझे वडील १९३४ सालीं वारले. त्या पूर्वी पांच वर्षे अगोदर त्याना अर्धांगवायुचा झटका आला होता. त्यांत ते बरे झाले. चालूं हिंडूं लागले. पण त्याची वाचाशक्ति अजिबात गेली. तेंव्हा माझे विचार आणि बेत वडिलांना समजावून सांगायचे किंवा त्यांचें ऐकायचें हें मला सर्व खुणांनी करावें लागे. मी फोटोग्राफीचा धंदा करायचें ठरविल्यानंतर माझ्या वडिलांनी मला स्टूडिओकरितां स्वतंत्र इमारत बांधून दिली—तेंव्हा मी फोटो चांगले काढतों असें सांगितलें तर ती मी माझी जाहिरात करतो असें होईल काय?

"—आणि धंद्याचा म्हणून मी पहिला फोटो काढला तो एका मृत मनुष्याचा! आणि तो फोटो जिवंत मनुष्यासारखा निघावा अशी त्या मृत माणसाच्या घरच्या माणसांची इच्छा असणें अगदी साहजिक! म्हणून ते त्या मृताला आपुलकीने बसवीत होते—तो जिवंत दिसावा म्हणून त्याचे डोळे उघडे ठेवण्याचा प्रयत्न करीत होते! कला! कला! कलेच्या फाजील-पणाने माणसाचे फार हाल होतात!

" – दुसरें – एका साधारण सौभाग्यकांक्षिणीचा – मी एक सुंदर फोटो काढला—

" आणि एक दिवस तो फोटो हातीं घेऊन एक मनुष्य यवतमाळ ते पुणें इतक्या दरम्यानचा जाण्यायेण्याचा खर्च माझ्याजवळ मागूं लागला. त्याचें म्हणणें असें होतें, 'या तुम्ही काढलेल्या फोटोवर खूष होऊन मी या मुलीशीं लग्न ठरविण्याकरिता आलों—पण फोटोंनी माझ्या ज्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या त्या प्रत्यक्षांनी पुऱ्या होत नाहीत—'

" – अखेर त्या माणसाचाहि मी तसाच एक फोटो काढून दिला आणि तें भांडण मिटविलें !

" तसेंच आमचे हे गोंधळेकर—एके काळीं पुण्यातील छापखान्याचे 'राजे' अशा घराण्यांतील! **विचार आणि कला जवळ असून—मार्ग नसल्यामुळें आम्ही दोघेहि चिडून देशभक्त झालों नाहीं—किंवा बिलकूल वाह्यात वागायला लागलों नाही**—या मुद्द्यावर आमची मुलाखत घ्यायला काय हरकत आहे ? "

—मला लागणारे फोटो घेऊन—व अगोदर त्यांचें झालेलें बोलणें मी ऐकलें आहे, याचा त्या 'जोडगोळीला' अस्पष्टसुद्धां सुगावा लागूं न देता मी घरीं परतलों.

——आतां सह्याद्रि मासिकांत ही मुलाखत पाहून त्या दोघांचेहि चेहरे अगदीच अनौपचारिक होतील—पण देव भलें करो—कांहीं दिवस मी त्यांना भेटण्याचेच टाळणार आहे !